
KNOWLEDGE IS POWER

अजिंठा

नियतकालिक १९९९-२०००



'माझे जीवन हाच माझा संदेश'


सहस्त्रकातील महामानव



राष्ट्रीय संस्कृत परिषदेचे उद्घाटन करतांना-
पद्मश्री प्रा.व्ही. वेंकटाचलम् -
चेअरमन इंडीयन कौंसिल ऑफ
फिलॉसॉफीकल रिसर्च, दिल्ली



उद्घाटनपर मनोगत व्यक्त करतांना-
पद्मश्री प्रा.व्ही. वेंकटाचलम्



राष्ट्रीय संस्कृत परिषदेचे
बीज भाषण करतांना डॉ. व्ही. एन्. झा
संचालक - प्रगत संस्कृत अध्ययन केन्द्र,
पुणे विद्यापीठ

मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव

अजिंठा

नियतकालिक

१९९९-२०००

संपादिका

प्रा. सौ. यु. एस. मानुधने

अजिंठा

अंतरंग....

- संपादकीय
- प्राचार्यांचे मनोगत
- मराठी विभाग
- संस्कृत विभाग
- हिंदी विभाग
- इंग्रजी विभाग
- महाविद्यालयीन वार्ता-
  - स्तुत्य उपक्रम
  - अहवाल
  - संशोधनाच्या दिशेने
  - प्राध्यापकांचे विशेष कार्य
  - अभिनंदनीय वाटचाल -
- विविध गुणवत्ता आणि शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी

सदर नियतकालिकातील मते व विचार प्रत्येक लेखकाचे व्यक्तिगत असून प्रकाशक, महाविद्यालय अथवा संस्था त्यास सहमत असेलच असे नाही.

KNOWLEDGE IS POWER

मुळजी जेठा महाविद्यालय, जळगांव

अजिंठा

नियतकालिक

१९९९-२०००

संपादक मंडळ

प्राचार्य अनिल राव
उप प्राचार्य पी. एल. कोल्हे
उप प्राचार्य एम्. डी. बोंडे
उप प्राचार्य डॉ. एस्. एस्. राणे

प्रा. सौ. यु. एस. मानुधने (प्रमुख संपादिका)
प्रा. डॉ. किसन पाटील
प्रा. सुरेश तायडे
प्रा. आर. टी. चौधरी
प्रा. डॉ. सुवर्णा शेट्टे
प्रा. डॉ. विद्या व्यवहारे
प्रा.ए.बी.पाटील.
प्रा. सौ. रजनी बोंडे
प्रा. डॉ. पी. टी. चौधरी
प्रा. सौ. सुजाता देशपांडे
प्रा. पी. बी. चौधरी
प्रा. एन. डी. चौधरी

संपादकीय

प्रा. सौ. मानुधने
संपादिका

अजिंठा या नियतकालिकाचा हा वार्षिकांक आपल्यापुढे सादर करीत असतांना मला मनस्वी आनंद होत आहे. आपणा सर्वांना नववर्षाच्या शुभेच्छा! 'हे नवे संवत्सर आपणांस सर्वार्थाने सुख-समृध्दीचे, उत्कर्षाचे अन् स्वास्थ्याचे जावो.'

संक्रमणकाळातून आपली वाटचाल सुरु आहे. नव्या सहस्त्रकाने आपल्यासमोर जी नवी आव्हाने उभी केली आहेत. ती आव्हाने समर्थपणे पेलण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व आवश्यक बाबी प्राप्त करुन घेण्यासाठी सिध्द होऊ या.

आपणा सर्वांना अभिमान वाटावा अशा एका घटनेचा उल्लेख येथे प्रकर्षाने करावासा वाटतो. ही घटना म्हणजे वैश्विक स्तरावर प्रातिनिधिक स्वरुपात 'सहस्त्रकातील महान व्यक्ती' आणि 'शतकातील-झुंजार स्त्री' याबाबत जी पाहणी करण्यात आली त्यातून आलेल्या निष्कर्षाद्वारे अनुक्रमे - पू. महात्मा गांधी आणि भारतरत्न इंदिरा गांधी या व्यक्तींच्या नावाला प्राप्त झालेली मान्यता होय. आम्हा भारतीयांच्या दृष्टीने ही घटना अत्यंत महत्त्वपूर्ण आणि अभिमानास्पद अशी आहे. पू. महात्माजी आणि स्व. इंदिरा गांधी यांनी देशाची अत्यंत निरलसपणे केलेली सेवा, असीम त्याग, बलिदान आणि आयुष्यभर केलेली दैदिप्यमान कामगिरी यांचाच हा गौरव आहे. आपणही त्यांचा आदर्श ठेवून आपआपल्या परीनं राष्ट्रकार्य करीत राहण्याची प्रतिज्ञा या निमित्ताने घेऊ या!

हे नियतकालिक म्हणजे महाविद्यालयीन विश्वात घडणाऱ्या विविध घटनांचे, उपक्रमांचे, प्राध्यापक, विद्यार्थी यांनी वर्षभर केलेल्या कार्याचे, राबविलेल्या विधायक उपक्रमांचे आणि विविध क्षेत्रात संपादित केलेल्या यशाचे 'ओझरते दर्शन' आहे. या नियतकालिकाचे माध्यमातून महाविद्यालयाने गेल्या वर्षभरात केलेल्या सर्वांगीण प्रगतीचा आलेख आपणांसमोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

नियतकालिकाचा हा अंक सर्वार्थाने आगळा आणि वेगळाही आहे. आसपासच्या विश्वात घडून येत असलेल्या घटना-घडामोडींबाबत आजचा महाविद्यालयीन युवकही किती सजग अन् संवेदनशील असतो याचा प्रत्यय या अंकातील विद्यार्थ्यांनी केलेल्या लिखाणातून येऊ शकेल. कारगील-युध्द, पर्यावरण अंधश्रध्दा आणि विज्ञान, राजकीय-क्षेत्रातील वातावरण ढवळून टाकणाऱ्या विविध घटना यांना स्पर्श करुन जाणारे विद्यार्थ्यांचे लिखाण हे या अंकाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणता येईल.

इ.स. २००१ हे वर्ष महिला पुनरुत्थान वर्ष म्हणून जाहीर झाले आहे. आजची स्त्री जीवनातील विविध आघाड्यांवर अग्रभागी असल्याचे दिसून येत असले तरी अद्यापही समाजात तिच्या वाटचाला येणारे दुर्ग्यम स्थान, तिच्यावर होणारा अन्याय, अत्याचार, शोषण याबाबत जाणवणारी खंत ही या अंकातील लेखांमधून काही ठिकाणी व्यक्त झाली आहे.

आपल्या महाविद्यालयात काही वर्षे अध्यापनाचे कार्य करणारे आणि नंतर पुण्याच्या स.प. महाविद्यालयाच्या प्राचार्य पदाची धुरा यशस्वीपणाने सांभाळणारे प्राचार्य डॉ. ह. श्री. साने यांचे दि. ८ एप्रिल रोजी दुःखद निधन

झाले. महाराष्ट्रातील मराठी-साहित्याच्या क्षेत्रात महनीय कामगिरी करणाऱ्या विख्यात कवयित्री श्रीमती संजीवनी मराठे यांनाही नुकतीच देवाज्ञा झाली. १८ महाराष्ट्र बटालियनचे कर्तव्यदक्ष मेजर शुमराम यांचेही आपले कर्तव्य बजावीत असतांनाच दुःखद निधन झाले. या सर्वांच्या निधनामुळे आपणा सर्वांची मोठी हानी झाली आहे. या सर्वांना आमची भावपूर्ण श्रध्दांजली! त्यांच्या कुटुंबियांसाठी आमची सहवेदना प्रकट करीत आहोत.

हा अंक सर्वार्थाने नेटका व्हावा यासाठी अनेकांचे सहकार्य लाभले. मा. प्राचार्य, उपप्राचार्य यांचे वेळोवेळी लाभलेले मार्गदर्शन. संपादक-मंडळ, सहकारी प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी-प्रतिनिधी, लेखक-मित्र यांच्या उत्स्फूर्त, सहकार्याबद्दल आभार !

सातपुडा ऑफसेटचे श्री संजय वाणी यांनी अंक सुबक आकर्षक व्हावा या दृष्टीने दिलेल्या सहकार्याबद्दल हार्दिक आभार अंक सर्वार्थाने परिपूर्ण, वाचनीय, आकर्षक व्हावा या दृष्टीने सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. काही त्रुटी असतीलही त्याबद्दल कृपया क्षमस्व!

जीवने यावदादानं स्यात् प्रदानंम् ततोऽधिकम्।

इत्येषा प्रार्थनाऽस्माकं भगवन् परिपूर्यताम्।।

''जीवनात जेवढे आपण घेऊ त्यापेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात इतरांना देऊ असे होऊ दे'' हे परमेश्वरा आमची ही प्रार्थना पूर्ण कर-

हा संदेश आपल्या जीवनात आणण्याचा अन् त्यानुसार आपले आचरण व्हावे या दृष्टीने प्रयत्न करण्याचा संकल्प करु या!

मृत्तिका धातु पाषाणादिक। ऐसि या प्रतिमा अनेक।
बहुतेक लोकांचा दंडक। प्रतिमा देवी॥

नाना देवांचे अवतार। चरित्रे ऐकती ऐक नर।
जप ध्यान निरंतर। करिती पूजा॥

एक सकळांचा अंतरात्मा। विश्वी वर्ते जो विश्वात्मा।
द्रष्टा साक्षी ज्ञानात्मा। मानिती एक॥

-संत रामदास

प्राचार्यांचे मनोगत

प्राचार्य अनिल राव

प्रिय विद्यार्थी मित्रांनों,

शैक्षणिक वर्ष १९९९-२००० हे सर्वार्थाने विविधतापूर्ण ठरले आहे. २१ व्या शतकाची चाहूल तशी गेल्या ४-५ वर्षापासूनच सगळ्यांना लागली होती. त्यामुळे सर्वच क्षेत्रात ''२१ व्या शतकातील आव्हाने'' हा शब्द परवलीचा झाला. तांत्रिकदृष्ट्या १ जानेवारी, २००० रोजी नवीन सहस्त्रकाचा प्रारंभ झालेला नसला तरी मानसिकदृष्ट्या सर्वजण २१ व्या शतकात आणि नव्या सहस्त्रकांत पोहोचले आहेत. अशावेळी अंतर्मुख होऊन आजपावेतो केलेल्या प्रगतीचा विश्लेषणात्मक आढावा घेणे, आत्मपरिक्षण करणे आणि भविष्यातील वाटचालीचा विचार करणे आवश्यक आहे.

२० व्या शतकात माणसाने सर्वच क्षेत्रात अभूतपूर्व अशी प्रगती केली आहे. वैज्ञानिक प्रगतीमुळे मनुष्याच्या कार्यकक्षा विस्तारलेल्या आहेत. औद्योगिक क्रांती ते माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील क्रांती हा प्रवास थक्क करणारा आहे. संगणकशास्त्रापासून जैविकशास्त्रापर्यंत सर्वच क्षेत्रात माणसाने नवनवीन पल्ले गाठलेत. इंटरनेट मुळे जग हे आता एक ''खेडं'' झालयं. ह्या सर्व विकासाची व्याप्ती आणि वेग पाहिला की आश्चर्य वाटणं सहाजिकच आहे. परंतु सद्यस्थितीचे अवलोकन करता, सर्व क्षेत्रातील हा विकास निव्वळ भौतिक स्वरुपाचा तर नाहीना, असा प्रश्न मनात उभा राहतो. चंगळवाद, उपभोगवाद, सर्व ठिकाणी प्रबळ झालेला दिसून येतो. 'व्यक्तिगत स्वार्थापलिकडे माझे काही कर्तव्य आहे' असा विचार लुप्त झाला की काय असचं वाटतं.

दोन महायुध्दे, लाल क्रांती, साम्यवादाचा उदय, हिरोशिमा व नागासाकीचा विध्वंस, दोन महासत्तातील शीतयुध्द, विकसित, विकसनशील व अविकसित राष्ट्रातील वाढणारी दरी, विकसित पाश्चिमात्य देशाची आर्थिक दादागिरी अशा अनेक विविध घटना व प्रश्न मनांत घर करुन बसतात. अन् मन विषण्ण होतं.

आपल्या देशाचा ह्यादृष्टीने विचार करता एका मातृभूमीच्या झालेल्या क्लेशदायी विभाजनाची बोच कायम ठेवून १५ ऑगष्ट, १९४७ रोजी आपण स्वतंत्र झालो. स्वातंत्र्य प्राप्त करुन ५२ वर्षे लोटली. गेल्या पन्नास वर्षातील आपली सगळ्यांची वाटचाल कशी आहे ? स्वातंत्र्यासाठी झटणाऱ्या सर्व स्वातंत्र्य सैनिकांना, हौतात्म्य पत्करलेल्या वीरांना, महात्म्यांना अभिप्रेत असलेले राष्ट्र आपण उभे केले कां ? त्यांच्या स्वप्नांची पूर्तता खरंच झाली कां ? अशा प्रश्नांची खरी उत्तरं देताना क्लेष तर वाटत नाही ना ?

अर्थात आपण गेल्या पन्नास वर्षात अनेक क्षेत्रात भरीव प्रगति केली आहे. ह्याबद्दल शंकाच नाही. कृषिक्षेत्रात हरीत क्रांती करून आपण स्वावलंबी झालो. शुभ्रक्रांतीचा यशस्वी प्रयत्न आपण करुन दाखवला. वैज्ञानिक क्षेत्रातील भारतीय शास्त्रज्ञांची वाटचाल इतर प्रगत देशांनी नोंद घेण्याइतपत चांगली झाली आहे. भारतीय उद्योग, व्यापार, आर्थिक क्षेत्र, शैक्षणिक क्षेत्र ह्या सर्वच क्षेत्रात आपण चांगली प्रगति साधू शकलो आहोत. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात तर आपला क्रमांक पहिला असु शकतो. देशात समता, बंधुभाव ह्या मुलभूत संकल्पना आता रुजलेल्या आपण पहातो आहोत.

परंतु आजही, आपल्या ह्याच प्रगतिशील देशात श्रीमंत-गरीब, सवर्ण-दलित, शिक्षित-अशिक्षित, स्त्री=पुरुष, ग्रामीण-शहरी अशा स्वरुपाची तफावत

असलेलं विदारक चित्र आपल्याला पहायला मिळतं.

प्रांतवाद, भाषावाद आजही प्रकर्षाने जाणवतात. ईशान्येकडील आणि काश्मिरमध्ये देशविघातक शक्ती, अतिरेकी कारवाया, त्यांना ठराविक परकीय देशांचे पाठबळ, हा चिंतेचा विषय नाही का ? देशात भ्रष्टाचार, स्वार्थ सगळ्यांना भेडसावत आहेत. स्वराज्य मिळाल्यानंतर सुराज्याची कल्पनाचित्रं सगळ्यांनी रंगवलीत पण आता मात्र मिळालेलं स्वातंत्र्य सर्वार्थानं टिकवण्यासाठीच उपाययोजना करावी लागणार आहे, असं दिसतयं.

ज्यांना सर्व जगाने सहस्त्रकातील महामानव म्हणून मान्यता दिली त्या महात्मा गांधीजींच्या विचारांची आता आपल्या सगळ्यांना गरज आहे. गांधीजी नैतिक मूल्यांना महत्व देत. भौतिक प्रगति कितीही मोहक असली तरी नैतिक विकासाला महत्व द्या असे बापूजी म्हणत. 'प्रेयस' आणि 'श्रेयस' ह्या दोन वृत्ती उपनिषदात सांगितलेल्या आहेत. विषयांचे सुख देणारे प्रेयस आणि आत्म्याचे सुख देणारे श्रेयस. यापैकी कोणता मार्ग आपण स्विकारावा हे प्रत्येकाने ठरविले पाहिजे. गांधीजींनी श्रेयाचा मार्ग निवडला होता. गांधीजींची जीवनपध्दती ही त्या अर्थाने आपल्याला संदेश म्हणून स्विकारुन आत्मसात करणे आवश्यक आहे. गांधीजी म्हणत- 'तत्त्वा विना राजकारण, श्रमाविना संपत्ती, चारित्र्याविना शिक्षण, नीतीविना व्यापार, विवेकाविना विलास, मानवा विना विज्ञान, त्यागाविना पूजा' व्यर्थ व म्हणून वर्ज्य होय. त्यांनी जी विविध मूल्याधिष्ठीत जीवनसूत्रं सांगितली आहेत त्यांचा स्विकार करून ती आचरणात आणलीत तर सध्याच्या भेडसावणाऱ्या प्रश्नांची योग्य उत्तरं आपल्याला सापडतील.

''लाखो दीन दुबळ्यांच्या हृदयांत दडलेल्या ईश्वरा खेरीज मी दुसरा ईश्वर ओळखत नाही. सत्य ह्याच माझ्या ईश्वराची मी पूजा करतो आणि लाखो दलितांची सेवा हाच माझा पूजाविधी आहे.'' हे त्यांचे विचार आपण सगळ्यांनी लक्षात घेतले पाहिजे.

भारतरत्न ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या मते तिसऱ्या जगातील महासत्ता हे भारताचे आता स्वप्न नसून वास्तविकता आहे. अशावेळी 'विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या सामर्थ्याने मानवतेचा होणारा संहार टाळायचा असेल तर सर्वत्र एकात्मतेची भावना बळावली पाहिजे.' गांधीजींच्या मते, ''राजकारण व सांप्रदायिक धर्म यांचे युग संपले असून आता विज्ञान व अध्यात्म यांचे युग उदय पावले आहे अध्यात्म म्हणजे एकत्वाची भावना'' म्हणून आपण सगळ्यांनीच ह्या विचारांचा खऱ्या अर्थाने स्विकार करणे गरजेचे आहे.

गांधीजींचा भर व्यक्तिगत सुधारणेवर होता. शिस्त, संघटना, राज्यपध्दती, कायदा या सर्वांचे महत्त्व ते ओळखीत असत. पण त्या सर्वांचे यश व्यक्तीच्या गुणवत्तेवर अवलंबून आहे असे ते मानीत. कोणतीही समाजव्यवस्था चांगली किंवा वाईट ठरणे हे त्यातील व्यक्तीवर अवलंबून असते. चांगली माणसे वाईट समाजव्यवस्थाही चांगल्या प्रकारे वाचवू शकतील आणि अखेरीस त्या व्यवस्थेलाही चांगले स्वरूप देतील असा त्यांचा विश्वास होता. या दृष्टीने चारित्र्य निर्मिती करणाऱ्या शिक्षणाला ते अधिक महत्त्व देत. ह्या दृष्टीकोनातून शिक्षण प्रक्रिया विकसित केली पाहिजे. विल ड्युरंट यांनी म्हटल्याप्रमाणे "Knowledge is the eye of desire and can become the Pilot of a sow'.

चला आपण सारेच बापूजींच्या जीवनातून योग्य संदेश घेऊन एकात्म बंधुभाव, मानवता, सत्य, प्रेम, देशभक्ती यांचा आपल्या शिक्षण प्रक्रियेत समावेश करू या. असे ज्ञानच खऱ्या अर्थाने आपल्याला मार्गदर्शक ठरेल. विद्यार्थी मित्रांनों, मला खात्री आहे की तुम्ही सर्वजण ह्या दिशेने ठाम निश्चयाचं पहिलं पाऊल टाकाल अन् त्याच वाटेने भविष्यात सतत मार्गक्रमण कराल. गुणवान व्हा, यशस्वी व्हा. आपल्या राष्ट्राला आणि संपूर्ण मानवजातीला अशाच युवकांची गरज आहे.

नव्या सहस्त्रकाच्या हार्दिक शुभेच्छा.



संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बॅरीस्टर
डॉ. एन. पाटील यांचा वयाचे शतक पूर्ण
झाल्याबद्दल सत्कार प्रसंगी व्यवस्थापन
मंडळ सदस्य (दिनांक २-१-२०००)



फोर्ड फाउन्डेशन अंतर्गत प्राध्यापकांच्या
हिवाळी शिबीराच्या
समारोप प्रसंगी मार्गदर्शन करतांना
प्रा. डॉ. नवलगुंदकर,
(पुणे विद्यापीठाचे माजी प्र. कुलगुरु)



फोर्ड फाऊन्डेशन अंतर्गत
हिवाळी शिबीर प्रसंगी मार्गदर्शन करताना
डा. के.बी. पाटील -
(प्राचार्य-जयहिंद महाविद्यालय धुळे)
सोबत श्री. अशोक जैन,
(अध्यक्ष जैन उद्योग समूह)



राष्ट्रीय संस्कृत परिषद - उदघाटन प्रसंगी कुलगुरु डॉ. एस.एफ. पाटील यांचा सत्कार करताना संस्थेचे अध्यक्ष श्री. बाबूसेठ चौधे



राष्ट्रीय संस्कृत परिषदेच्या स्वागत समारोह- सोहळ्यात आपले विचार व्यक्त करताना सुप्रसिध्द उद्योगपती श्री. भवरलालजी जैन



राष्ट्रीय संस्कृत परिषद पूर्व भारतीय-काव्य संस्कृत निबंध स्पर्धेच्या बक्षिस वितरण समारंभात मार्गदर्शन करताना. शेजारी संस्कृत कवी श्री. [illegible]



मराठी विभाग

जो आज्ञेचे पालन करणे जाणतो तोच आज्ञा देणे ही जाणतो.
प्रथम आज्ञेचे पालन करावयास शिका.

– स्वामी विवेकानंद

अनलकी फेस

कु. मानसी राजे

नेहमीप्रमाणे अनामिका बेडरुमच्या खिडकीकडे गेली. घाइघाईने तिनं खिडकी उघडली. सकाळच्या कोवळ्या उन्हाची तिरीप तिच्या डोळ्यावर आली. खरं तर आज उठायला उशिरच झाला होता तरीसुध्दा आजुबाजूच्या इमारतीतल्या हालचाली निरखत गरमागरम चहाचे घोट घेतल्याशिवाय तिला तिचा दिवस सुरु झाल्यासारखा वाटला नसता. टेबलावर ठेवलेला चहाचा मग घेवून तिने गरम चहाचा आस्वाद घ्यायला सुरवात केली, इतक्यात तिचे लक्ष समोरच्या बिल्डिंगकडे गेले, 'अरे साठे काकूंच्या ब्लॉक मध्ये कोणीतरी रहायला आलेल दिसतय!' साठ्यांच्या ब्लॉकच्या उघड्या खिडक्या पाहून अनामिका स्वत:शीच म्हणाली. मनातल्या कुतूहलाला दटावत तिची नजर पुन्हा पुन्हा त्या उघड्या खिडक्यांकडे वळत होती. तेवढ्यात एक उंच देखणा तरुण खिडकी जवळ आला. त्याचही लक्ष खिडकीत उभ्या असलेल्या अनामिकाकडे गेल. क्षणभर दोघांची नजरानजर झाली. त्याबरोबर झरकन ती मागे वळली. घड्याळात पाहिल तर साडे आठ वाजले होते. अर्ध्यातासाच्या आत तिला तयार होवून बाहेर पडायच होत. आजपर्यंतच्या करिअरमध्ये ती कधी ऑफिसला लेट गेली नव्हती त्यामुळे तिने डबा करुन घेण्याचा बेत रद्द केला. आज बाहेरच लंच घेवू असा विचार करुन ती आंघोळीला पळाली. नेहमीपेक्षा जास्त झोप झाल्यामुळे की काय कोणास ठावूक पण आज हालचालींना वेगच येत नव्हता. कशीबशी तयारी आटपून घराला कुलूप लावून अनामिका धावतपळत निघाली.

नेहमी बरोबर दहाच्या ठोक्याला पोचणारी अनामिका आज चक्क पंधरा मिनिटं उशिरा आली होती. राजू शिपाई मस्टर साहेबांच्या कॅबीन मध्ये घेवून जाण्याच्या तयारीतच होता. इतक्यात अनामिका धापा टाकत मस्टरच्या टेबलापाशी गेली. राजूच्या हातातून तिनं मस्टर जवळ जवळ हिस्कावून घेतलं. पर्समधलं पेन काढून सही केली आणि 'हुश्श' करीत आपल्या टेबलासमोर जावून बसली. समोरच्या टेबलावरचे वागळे आपल्या टकलावरुन हात फिरवत तिच्याकडे बघत होते. साहेबांची रिसेप्शनीस्ट रिटा आरश्यात बघून आपल्या बॉबकटच्या बटा सावरण्याचा बहाणा करत होती आणि चोरुन अनामिकाकडेच पहात होती. हेडक्लर्क काझीचाचा मात्र तिच्याकडे पाहून गोड हसले, 'क्यूं बेटी आज तबियत कुछ ठिक नही है क्या?' अनामिका चपापली. सगळ्याच स्टाफची नजर तिला बोचरी वाटत होती आणि स्वत:ला अपराधी असल्याची खंत वाटत होती. तिनं उसन हसू आणित उत्तर दिलं, 'कुछ नही चाचाजी आज सुबह जरा आँख खुलनेमें देर हो गई और सारा टाईम टेबल कुछ डिस्टर्ब हो गया!' नेहमी उशीरा येणारे सपकाळे सुध्दा आज तिच्या आधी आले होते. 'होता है.. होता है! चाचा!' सपकाळे खोचकपणे म्हणाले. बरोबर आहे नेहमी उशीरा येणाऱ्या सपकाळ्यांकडे अनामिका एकच कुत्सित कटाक्ष टाकायची. त्या नजरेचा बदला घेण्याची संधी सपकाळे बरे सोडतील!

तिने आपल्या कॉम्प्युटरच्या स्क्रिनवरच कव्हर काढल. ड्रॉवर मधली फाईल काढली आणि त्यातले मॅटर टाईप करायला सुरुवात केली. आज तिला लंच पर्यंत एक महत्वाची फाईल तयार करायची होती. तिची बोट वेगाने कीजवरुन फिरु लागली पण का कोणास ठाऊक

आज तिला कशातच उत्साह वाटत नव्हता. कामाला वेग येत नव्हता. रोज भराभरा कामाचा फडशा पाडणारी अनामिका आज पुन्हा पुन्हा चुका करत होती. गेल्या पाच वर्षात कधीच असं घडलं नव्हत.

कामाच्या व्यापात साडेबारा कधी वाजले ते कळलच नाही. टेबलावरचे टाईप झालेले कागद तिने गोळा केले फाईलला व्यवस्थीत लावले आणि ती साहेबांच्या केबिनमध्ये गेली. आज तिच्या कामातल्या चुका बघून साहेबही आश्चर्यचकित झाले. 'Miss Anamika, are you all right? Today it is very strange that you have made such silly mistakes'. "Sorry Sir'. अस म्हणून ती आपल्या टेबलापाशी आली. सगळ्या चुका दुरुस्त करुन पुन्हा फाईल तयार करता करता दुपारचे चार वाजले. साडेपाच पर्यंत ऑफिसमध्ये थांबण्याची तिच्यामध्ये शक्ती नव्हती. आज ती सकाळच्या एक कप चहावर होती. नाश्ता, जेवण सगळ कामाच्या व्यापात राहून गेलं होतं. तिने एक तास कन्सेशनचा ॲप्लीकेशन साहेबांकडे पाठविला आणि ऑफिसमधून बाहेर पडली.

चर्चगेट स्टेशनजवळच्या रसना मध्ये आली. नेहमीच्या टेबलावर बसली आणि उतप्पा आणि वडा-सांबार ह्या तिच्या आवडीच्या डिशेश तिने ऑर्डर केल्या. ऑर्डर येईपर्यंत तिच्या मनात विचार आला, आज सकाळी आपण त्या साठेकाकूंच्या नवीन भाडेकरुच तोंड पाहीलं... नक्कीच... आणि तिला लहानपणी वाचलेल्या बिरबलाच्या गोष्टीची आठवण झाली The Unlucky Face अशुभ चेहरा..! आणि तिचं तिलाच हसू आलं! त्याचा चेहरा बघण्यापूर्वी आपण ब्रश करतांना आपलाच चेहरा आरशात पाहिला होता की!.. इतक्यात वेटर तिची ऑर्डर घेऊन आला आणि तिच्या विचारांची साखळी तुटली. पोटभर नाश्ता करुन आणि गरमागरम स्पेशल चहा घेवून झाल्यावर ती ताजीतवानी होवून गाडीत बसली.

अजून ऑफिसेस सुटली नव्हती, त्यामुळे लेडिजमध्ये फारशी गर्दी नव्हती. अनामिकाला खिडकी जवळची सिट मिळाली. चला आता पार्ल्याला उतरे पर्यंत आरामशीर प्रवास होणार म्हणून तिने समाधानाने खिडकीच्या चौकटीवर डोक टेकलं. गार वारा आणि भरपेट नाश्ता यामुळे तिचे जडावलेले डोळे केव्हा झोपेच्या आधिन झाले हे तिचे तिलाच कळल नाही. प्रत्येक स्टेशनला गाडी थांबली की, गलक्यामुळे तिला जाग येत होती. मध्येच कोणत्यातरी स्टेशनवर रुमाल विकणारी मुलगी चढली. 'लेडिज रुमाल पाचला तीन, जेन्टस रुमाल दहाला तीन' अस ओरडत संपूर्ण डबा फिरुन आली आणि अनामिकाच्या शेजारी येवून बसली. पुन्हा एकदा अनामिकाचा डोळा लागला. गाडीने वेग घेतला. पुढच्या स्टेशनसाठी गाडी स्लो झाली इतक्यात बाजूची रुमालवाली झटकन उठली. अनामिकाच्या मांडीवरची पर्स उचलून डब्याच्या दरवाजाकडे धावली आणि प्लॅटफॉर्मच्या विरुध्द बाजूला उडी मारुन पळाली. काय झालय हे अनामिकाला समजेपर्यंत ती मुलगी दुसऱ्या प्लॅटफॉर्मवरच्या गर्दीत मिसळली. क्षणभर काय करावं हे अनामिकाला सुचेना. ती फक्त 'चोर चोर' ओरडली. तिच्या भोवती डब्यातल्या आठ-दहा बायका गोळा झाल्या. त्यातल्या चांगल्या किती आणि त्या चोरट्या मुलीच्या साथीदार किती हे कळण शक्य नव्हत त्यामुळे त्या बायकांशी पर्स आणि पर्समधल्या वस्तूंबद्दल चर्चा करण टाळल. शांत बसून तिने विचार करायला सुरुवात केली. सर्वात महत्वाच म्हणजे तिचा आठवड्यापूर्वी काढलेला तीन महिन्याचा अंधेरी ते चर्चगेट पास आणि टेलिफोन नंबर, पत्ते वगैरेची डायरी गेली होती. काल तिच्या पर्समध्ये दोन शंभरच्या आणि एक पंन्नासची नोट होती जि तिने रसनामध्ये खर्च केली होती. आणि शिवाय शंभर रुपयांची नवी पर्स! पुन्हा एकदा तिच्या डोळ्यासमोर तो सकाळचा Unlucky चेहरा तरळून गेला. 'हॅट आपणच मुर्ख! अस कस आपण मांडीवर पर्स ठेवून झोपलो? रोज आपण किती सावध असतो. आजच आपण कस काय बिनधास्त राहिलो ?' विचार करता करता विलेपार्ले केव्हा आल कळलच नाही. पार्ल्याला उतरणाऱ्या दोन-तीन बायकांसोबत ती उतरली. त्यांना स्टेशन बाहेर पडेपर्यंत सोबत राहण्याची विनंती केली. नशिबाने बाहेर पडेपर्यंत

टि.सी. नव्हता. सावकाश चालत ती बिल्डिंग पर्यंत आली आणि तिच्या लक्षात आल की. पर्सबरोबर आपली घराची किल्ली पण गेली. तिला स्वत:चाच खूप राग आला. चरफडत ती अे विंग मधल्या कॉलनीच्या सेक्रेटरींकडे-दामलेंकडे गेली. तिने त्यांच्या दारावरची बेल वाजवली. आता 'पर्स पुराण' सांगाव लागणार म्हणून अनामिका वैतागली कारण तिला माहित होतं की, हे तोंडाळ दामले वहिनींकडून सगळ्या कॉलनीभर पसरणार आणि सगळ्या रिकामटेकड्या बायका मिळून तिला मूर्ख ठरवणार ! इतक्यात दामले वहिनींनी दार उघडल, 'अग बाई आज तू कशी काय? इकडे कुठे वाट चुकली?' दामले वहिनींची उचकट मुक्ताफळ सुरु झाली. त्यांच्या रटाळ बडबडीला आवर घालण्यासाठी ती म्हणाली, 'अहो वहिनी! आज चुकून ऑफिसच्या ड्रॉवर मध्येच किल्ल्या विसरले. जरा माझ्या ब्लॉकची डुप्लीकेट किल्ली देता का?' दामले वहिनींनी किल्ल्यांच्या जुडग्यातून सी-१३ नंबरची स्टीकर असलेली किल्ली अनामिकाला दिली. दामले वहिनींच इतर संभाषण सुरु व्हायच्या आत अनामिकाने काढता पाय घेतला आणि ती विंग मधून संभाषण आवरतं घेत बाहेर पडली. तर समोरुन साठेकाकूंचा 'तो' भाडेकरु येत होता. तो हसला- 'हॅलो मी आनंद साठे. काकांच्या फ्लॅटमध्ये नुकताच रहायला आलोय. तुम्ही समोर सी-१३ मध्ये राहाता नं?' अं.. हो.. मी अनामिका... अनामिका जोग. तुमच्या समोरच्या सी-१३ मध्ये राहते... चला नं माझ्या घरी चहा घेऊ' अनामिका औपचारीकपणा दाखवत म्हणाली. 'नको आज नको पुन्हा केव्हांतरी. आता नेहमीच भेटू. तुमच्यातच रहायच आहे.' 'ओ.के.' म्हणत अनामिकाने काढता पाय घेतला. आज तिची कोणाशीच गप्पा मारण्याची इच्छा नव्हती. आज शारीरिक आणि मानसिक थकवा फार जाणवत होता.

अनामिका घरी आली. तोंडावर पाण्याचे शिडकावे मारले आणि पलंगावर स्वत:ला झोकून दिलं. पडल्या पडल्या तिच्या डोळ्यासमोरुन गेल्या पंचविस वर्षांचा इतिहास चित्रपटासारखा झरझर सरकू लागला.

अनामिका खर तर तिच हे नाव कोणी फाळण्यात घालतांना ठेवलेल नव्हत. तिच तिनेच स्वत:ला धारण केल होत. जन्माच्या वेळेपासूनच दुर्दैव तिच्या मागे हात धुवून लागल होत. तिच्या जन्माच्या वेळेस काहीतरी कॉम्प्लीकेशन्स होवून तिची आई तिला पोरक करुन गेली होती. तेव्हा पासून 'बारकी' हे नांव तिच्या साठी रुढ झाल होत आणि आजीच्या जिभेने तिला 'अवदसा', 'कुलक्षणी' असे सन्मान बहाल केले होते. जेमतेम वर्षाची झाली असेल नसेल आजीला पॅरेलेसिसचा ॲटॅक आला आजी-आजोबा आपल्या गावी लातूरला गेले. जातांना बारकीला सावत्र आई आणून गेले. तीन-चार वर्ष ठिक गेली. एकदा खंडाळ्याला जातांना त्यांच्या गाडीला अपघात झाला. आई-बाबा काही वाचू शकले नाही. पण बारकी मात्र वाचली. आजोबा तिला घेवून लातूरला आले. तिथे तिचा सांभाळ धाकू आणि हंसा यांनी केला. धाकू आणि हंसाला अजून मूल बाळ नव्हत. त्यामुळे हंसा बारकीचे सारे करीत होती. भूतकाळातल्या भयानक जखमा काळाच्या मलमाने हळू हळू भरुन निघत होत्या. एस.एस.सी. चा फॉर्म भरतांना आजोबा म्हणाले, 'आपल्या इथल्या खेड्यातल्या शाळेत 'बारकी' नाव चालू राहील पण आता कॉलेजात बारकी नांव यायला नको. फॉर्मवर 'अनामिका अविनाश जोग' अस लिही. तेव्हापासून कागदोपत्री 'बारकीच' नांव 'अनामिका' असे झाल.' गणपती विसर्जनाच्या रात्री लातूरला झालेल्या भूकंपात आजोबा-आजी, हंसा-धाकू सारे जमिनीखाली गेले. ती सुध्दा अर्धीअधिक मातीच्या ढिगाऱ्या खाली गेली होती, पण आजोबांची आराम खुर्ची तिच्या डोक्यावर टोपली सारखी उपडी पडली म्हणून डोक्याला मार लागला नाही आणि तिचा जीव वाचला. त्या भयानक हाहाःकारातून जेवढे वाचले त्यांच्या बरोबर काही महिने ती राहिली. सावरली. तशातही अभ्यास केला आणि एस.एस.सी. ची परीक्षा दिली. आता तिला कळून चुकल होत की, जीवनातले मोठ्यात मोठे निर्णय सुध्दा तिचे

तिलाच घ्यायचे आहे त्यामुळे परीक्षा झाल्यावर पंधरा दिवसांच्या आत तिने पार्ल्याला आपल्या वडिलांच्या फ्लॅटमध्ये रहायला येण्याचा निर्णय घेतला. सामानाचा काही प्रश्नच नव्हता घर भरलेल होत. तेव्हा पासून अनामिका पार्ल्याच्या कॉलनीत एकटीच राहत होती. लातूरचे एक आजोबांचे मित्र रिटायर्ड सरकारी वकील तिला आर्थिक सल्ला देत होते. अठरा वर्षाची होईपर्यंत तिचा शिक्षणाचा खर्च त्यांनीच केला. वडिलांचा फंड वगैरे होता. दरम्यान ती कॉमर्सला गेली. कॉलेज सांभाळून टायपिंग, कॉम्प्युटर शिकली आणि बी.कॉम. झाल्यावर तिला ह्या Legal Advicing Agency मध्ये नोकरी मिळाली.

आपण आजीच्या म्हणण्याप्रमाणे खरच कुलक्षणी, अवदसा आहोत हा तिचा पक्का समज होता त्यामुळे ती कुणातही फारशी मिसळत नव्हती. आपण बर आपल ऑफिस बर की आपल घर बर! आज कोणीतरी तिच्या आयुष्यात डोकवायचा प्रयत्न करीत होत. आणि तिचं कटू मन त्याच्या बद्दलही दुराग्रही होत होत. तिच तिच्या मनाला समजावयाचा प्रयत्न करीत होती की, नाही. कोणीच कुलक्षणी नसत. ज्याच त्याच त्याच्यापर्यंतच मर्यादित असत. कोणीही कोणत्याही चांगल्या किंवा वाईट घटनेला जबाबदार नसतं!

दारावरच्या बेलने अनामिका विचारांच्या तंद्रीतून जागी झाली. तिने घड्याळात पाहिले रात्रीचे आठ वाजले होते. दोन अडीच तास ती विचार करत होती. तिने भितभीत दार उघडल. तोच "Unlucky Face' 'तिच्या दारात उभा होता तिला जवळजवळ ढकलून तो घरात शिरला. 'मिस अनामिका I am very happy today. मला कंपनी तर्फे मस्कतला पाठवत आहे. मी पेट्रोलियम इंजिनीअर आहे. गेले सहा महिने कोणाला पाठवायच या बाबतीत वाद चालू होते आज त्यांचे फायनल डिसीजन झाल. मी माझी ability prove करु शकलो. आज मी सकाळी तुमच तोंड पाहिलं... म्हणूनच पहिले पेढे तुमच्यासाठी आणले. या रविवारी काका-काकूंना भेटायला पुण्याला जाईन पण जाण्यापूर्वी मी एक रिक्वेस्ट करण्यासाठी आलोय. तुमचा लकी चेहरा मला रोज सकाळी उठल्या बरोबर दिसावा अस वाटत... बघा माझ्या offer चा विचार करा.' अस म्हणून घाई घाईने मिठाईचा बॉक्स टेबलवर ठेवून आनंद साठे निघून गेला ती ज्या चेहऱ्यावर Unlucky चा शिक्का मारत होती त्याच Unlucky चेहऱ्याने तिच्यावरचा Unlucky चा डाग धुवून टाकला होता.

कारगीलच्या वाटेवरती

– हेमांगिनी सनांसे
टी.वाय.बी.ए.

कारगील एक तीर्थक्षेत्र
सर्व तीर्थांना सामावून घेणारं
करोडो भारतीयांच्या कपाळावर
दिमाखानं शोभणारं ।।१।।

कारगील एक धर्मक्षेत्र
सर्वधर्मसमभावाची दिशा देणारं
अधर्माने वागणारांना
धर्मशिखरावरुन कडेलोट करणारं ।।२।।

कारगील एक कुरूक्षेत्र
महाभारताची आठवण करून देणारं
भारताची मान उंचावणारं
भारताला 'महान' बनवणारं ।।३।।

कारगील एक परमोच्च सत्य
''सत्यमेव जयते'' चा मंत्र जपणारं
सदैव सत्याचा आग्रह धरणारं ।।४।।

कारगील एक दिव्यक्षेत्र
असंख्यांचे डोळे दिपवणारं
दिव्यत्वाची प्रचीति आणून देणारं ।।५।।

खेळ कुणा दैवाचा कळला !

प्रणिता किसन पाटील
(K.L.T.) किमान कौशल्य.
(मु.जे.महाविद्यालय, जळगाव)

दुपारची वेळ ऊन सतत आपल्या अस्तित्वाची जाणीव करुन देत होत. अप्पा झोपायला जाणार तेवढ्यात दार वाजलं आणि त्या घरासाठी अगदी अनपेक्षित आवाज आला.

'पोस्टमन... अप्पाऽ तुमचं पत्र.'

कुतूहलानं आप्पांनी दार उघडलं. एरव्ही लोकांच्या दारातच पत्र टाकून निघून जाणारा पोस्टमन, अद्याप तिथचं उभा होता. त्या गावात आप्पांना सगळे लोक खूप मानत. त्यांच्या तत्वशील आणि प्रामाणिक वृत्तीचे दाखले देत. म्हणूनच कदाचित त्या सदगृहस्थाचं दर्शन घेण्यासाठी तो पोस्टमन थांबला असावा. अप्पा पत्र घेवून घरात आले. डोळ्यांवर चष्मा चढवून वाचू लागले. त्यावेळी त्यांच्या चेहऱ्यावरचा बदललेला भाव पाहून समोरच वाती वळीत बसलेल्या माईही अस्वस्थ झाल्या.

'कुणाचं पत्र आलय?' त्यांनी विचारलं.

अप्पा मात्र काहीच बोलले नाहीत. त्यांनी ते पत्र माईंच्या हातात दिलं. त्यानंतरची काही मिनिट शांततेत गेली. वाचून झाल्यावर माई उदगारल्या.

'असं कसं अचानक पत्र पाठवलं हो अविनाशनं?' अप्पा पुन्हा निरुत्तरीतच! अविनाश त्यांचा एकटाच मुलगा. त्याचं ते पत्र होतं त्याने आपल्या आईवडिलांना तातडीने त्याच्या घरी मुंबईला बोलावलं होतं. अप्पांच्या मनात काहीतरी वेगळच चाललं होतं. पण ही दोघं मुलाच्या पत्राने का बरं एवढी अस्वस्थ झाली? त्याला कारणीभूत तो प्रसंग ठरला होता. तो ५-६ वर्षांपूर्वीचा प्रसंग आठवला आणि अप्पांच्या समोरचं विचारांचं धुकं अधिकाधिक गडद होत गेलं.

त्यावेळी अप्पा नुकतेच रिटायर्ड झाले होते. तेव्हा पुढचं आयुष्य मुलानातवंडाबरोबर सुखानं घालवावं या साध्या, सरळ अपेक्षेने ते मुंबईला अविनाशकडे जाऊन राहीले. पण त्यांच्या तिथे जाण्याने त्यांचा नातू ऋषीकेश यालाच काय फक्त तो आनंद झाला. पण त्यांच्यामुळे आपल्याला स्वातंत्र्य गमवावं लागतयं असं त्यांची सून माधुरी व अविनाशलाही वाटत असावं. माधुरी तर त्यांच्याशी जुळवूनच घेत नव्हती. तिचा ऋषी त्या आजी-आजोबांच्या लाडाने बिघडतोय, हट्टी होतोय अशी एक ना दोन कारणं शोधून ती त्या म्हाताऱ्यांशी वाद घाली. एके दिवशी घरी ऋषीकेशच्या वाढदिवसाच्या पार्टीत अविनाशने त्याच्या बिझनेस सर्कल मधील मोठमोठ्या लोकांना बोलावलं, त्यांच्यासमोर ह्या खेड्यातल्या आईवडीलांची अडचण, छे... त्याला लाजच वाटली. आणि म्हणून त्याने त्यांची रवानगी गावी केली. आणि आजच हे पत्र इतकं सगळं झाल्यावर का? तातडीनं घालवलं तसचं तातडीचं बोलावणं का म्हणून? याच प्रश्नाचा विचार अप्पा आणि माई शोधत होते. पण दैवाचा खेळ कुणाला कळलाय का कधी? या नशिबाने पुढे आणखी काय वाढून ठेवलय, हे त्या दोघांनातरी कसं कळेल मग? पण माईंच्या मातेच्या मनाला वाटलं. उमगली असेल चूक स्वत:ची म्हणूनच बोलावलं असणार. त्यांना असही वाटून गेलं की काही संकट तर ओढावलं नसेल ना. बस असं वाटलं आणि त्या अस्वस्थ झाल्या. आप्पांचा स्वाभिमान त्यांनी आयुष्यभर पाहिलेला, पण तरी त्या त्यांच्याशी बोलला, त्यांची समजूत काढली आणि चार दिवस भेटायलाच जायचं असं कबूल करवून घेतलं. शेवटी आप्पांच्या स्वाभिमानावर त्यांच्यातल्या पित्याने मात केली. स्वत:ची चूक मुलाला कळली आहे. असं गृहीत धरुन ते मुंबईला जायला निघाले.

अविनाश त्यांचा एकुलता एक मुलगा. त्यांच्यावर चांगले संस्कार करायचे, त्याला खूप शिकवून मोठा माणूस बनवायचं म्हणून त्या मायबापांनी जिवाचं रान केलं. खूप कष्ट करुन त्याला त्याच्या आवडीने मॅनेजमेंटचं शिक्षण दिलं. त्यानंतरही त्याला स्वत:चा उद्योग सुरु करण्यासाठी गावातली जमीन विकून पैसे उभे केले. आणि इतकं करुनही, 'त्यांच कर्तव्यच ते' असं म्हणून अविनाशनेही आता मान फिरवली. एकूण अविनाशने त्यांच्या पदरी निराशाच टाकली. पोटच्या पोराच्या या चुका पदरात घालता घालता त्या प्रेमळ मात्यापित्यांच्या पदराला ठिगळं जोडण्याची वेळ आली असेल. पण तरी आणखी एक चूक माफ!

यावेळी मुलगा व सुनेने त्यांचे चांगले स्वागत केले. अगदी प्रेमानं (?) वागत होती ती दोघ त्यांच्याशी. दोन दिवस ऋषीकेशच्या सहवासात फुलपाखराप्रमाणे भुरकन उडून गेले. त्यादिवशी आप्पा व माई झोपायच्या तयारीत असतांना अविनाश आणि माधुरी त्यांच्याजवळ येवून बसले. थोडं इकडचं तिकडचं बोलून झालं, मग अचानक आठवलं असं दाखवित अविनाश बोलला.

'अप्पा तो आनंद देशमुख आठवतोय का तुम्हाला? तोच हो, आपल्या शेजारच्या मामांचा भाचा. माझ्याच वर्गात होता. तुमच्या मदतीमुळेच तो शिक्षण पूर्ण करु शकला, आणि आज मोठा अधिकारी झालाय, खूप उपकार केलेत तुम्ही त्याच्यावर!'

'उपकार करणारा मी कोण रे? त्याच्या दैवाची साथ त्याला मिळाली. दुसरं काय! नशिबात होतं तेच मिळालं. नाहीतर आईबापा विना पोर तो... असो. त्याच काय? अप्पांनी विचारलं.

'महिन्याभरापूर्वी इकडे मुंबईला बदली झालीय त्याची, मला कळताच मी त्याला भेटायला गेलो. म्हटलं अश्या मोठ्या पदाधिकाऱ्यांच्या ओळखीचा उपयोगच होतो व्यवसायात. तो तुमच्या बद्दल विचारीत होता. तेव्हा... मी त्याला तुम्ही... माझ्याकडेच राहता असं सांगितलं. उद्या तो भेटायला येणार आहे तुम्हाला.' आप्पांनी अविनाशकडे पाहिले. त्याक्षणी त्याची मान खाली गेली. तोच माधुरी म्हणाली,

'हे पहा, अप्पा, तो उद्या इथे आला म्हणजे तुम्ही त्याच्याकडून आमचं एक काम करुन द्या.' माधुरी.

'काम, कसलं? काय रे अविनाश?' माईंनी विचारलं.

'आप्पा त्याचं काय आहे की, काम माझ्या व्यवसायासंबंधी आहे. महिन्याभरापूर्वी फॅक्टरीत स्फोट झाला. तेव्हा काही मजुरांच्या नातेवाईकांनी केस केलीय भरपाईसाठी. म्हणून मग... त्याच्या वशिल्याने ती मिटवता येईल,'.. तुम्ही सांगाल ना त्याला.' अविनाश बिनदिक्कतपणे म्हणाला.

'आणि तुमचं तर ऐकेलच ना तो, उपकारांची आठवण करुन द्या त्याला.' माधुरी न कचरता बोलून गेली. आणि ते निघून गेले. आप्पा मात्र ऐकतच राहीले. माईही अवाक झाल्या. त्यांना वाटल आपल्या संस्कारात काही कमी पडलं का? वडिलांच्या प्रामाणिकपणाबद्दल माहीत असूनही आपल्या बापाचा असा वापर करण्यात याला काहीच कसं वाटलं नाही. त्यांना कळून चुकलं की, आपला मुलगा ह्या स्वार्थी जगाने आपल्यापासून पुरता हिरावलाय. पण आप्पा असल्या फसव्या क्षणांशी झगडतच वाढले होते. ते आपला तोल ढळू देणाऱ्यातले नव्हते.

दुसऱ्या दिवशी अप्पा विचारात गढलेले असतांनाच दारात एक मोटार थांबली. आनंद त्यातून उतरला व घरात आल्याबरोबर त्याने प्रथम अप्पा आणि माईंना नमस्कार केला. त्यांच्याशी तो भरभरून बोलला. त्याच्या प्रत्येक शब्दातून कृतज्ञता ओसंडून वाहत होती. त्याला आप्पांनी परिस्थिती कथन केली. आणि निर्णय सर्वस्वी तुझा आहे. तुझ्या मनाला पटेल तसच तू करं असं त्याला अप्पांनी सांगितलं. आनंद शांतपणे म्हणाला,

'अप्पा तुम्ही आणि माईंनी लहानपणापासून माझे आईवडील बनून, मला आपलाच समजून माझं मन संस्कारीत केलं. तुमची तत्व माझ्यात रुजवली. अविनाशच्या बरोबरीने मला शिक्षण दिलं. आणि आज जर मी तुमचे ते संस्कार, तत्व सोडून वागलो तर तुमचा अपमान नाही का होणार? आणि ते मी कधीच मान्य करणार नाही, तेव्हा मला माफ करा...

'अरे, माफी कसली मागतोस, आज या मतलबी जगापुढे तू माझे संस्कार जपलेस, तत्व जगवलीस, मला समजून घेतलं. यातच मला समाधान आहे.' अप्पा कृतार्थपणे त्याचा हात हातात घेवून बोलत होते. त्यानंतर आनंद निघून गेला.

'तुम्हाला जर हे काम करायचं नव्हतं तर आधीच....'

त्याला (अविनाशला) थांबवत माई गरजल्या.

'थांब, एक शब्दही बोलू नकोस, सगळं लक्षात आलयं माझ्या, म्हणून इथे बोलावलं ना आम्हाला, आणि आम्ही वेडे समजत होतो की..., पण नाही दैवाने खूपच मोठा दगा दिला आम्हाला. चला हो, आता इथे क्षणभरही थांबायचं नाही मला.' माईंच्या डोळ्यात पाणी तरारलं होतं.

ती दोघ निघणार तोच छोटा ऋषीकेश त्यांना 'जाऊ नका नां,' असं म्हणत बिलगला. पण त्याला ओढून घेत माधुरी म्हणाली,

'कसले आजी-आजोबा. थोडही कामी आले नाहीत आपल्या, गेलेलेच बरे ते इथून.'

अविनाश आणि माधुरी झरकन आत निघून गेले. ऋषीकेशकडे एक कटाक्ष टाकीत अप्पा आणि माई गावी परतले. नशिबाने आयुष्यभर नुसता खेळ खेळला होता त्यांच्याशी. या स्वार्थांच्या आगीत त्यांची मनं पार होरपळून गेली होती. त्या जखमा घेवून ती दोघं जगणार होती. एकमेकांसाठी, फक्त मरण येईपर्यंत! शेवटी खरयं ना खेळ कुणाला दैवाचा कळला, दैवलेख ना कधी कुणा टळला!

प्रश्न

– रूपाली बारस्कर
एस.वाय.बी.ए.

घरात टाकताच पाय
एखादा टोकदार प्रश्न
करतो स्वागत
टाळले कितीही तरी
त्याची ऐकावीच लागते कैफियत.
कधी प्रश्न असतो
दुखण्याचा, महागड्या उपचारांचा
प्रवेशासाठी फी चा, नोकरीसाठी
भोवळ आणणाऱ्या देणगीचा.
तर कधी ....
मुलीच्या योग्य स्थळासाठी
जीव कुरतडणाऱ्या हुंड्याचा
पुन्हा पळता येत नाही
मला माझ्या प्रश्नांपासून दूर
जुने प्रश्न सोडवतांना
नवे प्रश्न किंचाळतात बेसूर !

मागणे

– सीमा गोडसे,
पदव्युत्तर 'मराठी'

जीवन मार्गावर मागते मागणे तुला
एकाकी हातात माझ्या
देशील तुझा हात
आणि कधी न तुटणारी साथ ?
जीवन मार्गावर मागते मागणे तुला
हाक देणारा माझा आर्त नाद
देशीलन त्याला तू अखंडसाद ?
जीवन मार्गावर मागते मागणे तुला
रूक्ष जीवनात मी एक मरूस्थान
फुलवशील का तिथं तू उद्यान ?
जीवन मार्गावर मागते मागणे तुला
सागरात हेलकवणारी मी असहाय होडी
किनाऱ्याची दाखवशील का सहानुभूती थोडी ?
जीवन मार्गावर मागते मागणे तुला
मीच आहे मीरा तुझी, पिऊन टाकीन जहर
स्वीकार करून माझा आणशील का बहर ?

'गुरु - शिष्य'

कु. प्रतिभा हिलाल पाटील
एम.ए.प्रथम वर्ष (मराठी)

'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वर:
गुरु: साक्षात परब्रह्म तस्मै श्री गुरवे नम:'

खरचं! आपल्या भारतीय संस्कृतीत गुरुचे फार मोठे महत्व मानले गेले आहे. व ते मानले गेलेच पाहिजे. कारण गुरु हाच आपल्या जीवनाच्या गाडीला योग्य अशी दिशा देवून जीवनातील खरे मर्म उलगडून दाखवित असतो. प्रत्येक थोर व्यक्तिमागे कोठे तरी श्रेष्ठ असा गुरु मार्गदर्शक असतो. त्याचबरोबर गुरु-शिष्य संबंध सुध्दा आपल्या संस्कृतीत पावित्र्याच्या उच्च स्थानी आहे. उदा. जनकाचा गुरु-याज्ञवल्क्य, शुक्राचार्याचा गुरु-जनक, ज्ञानेश्वरांचे गुरु-निवृत्तीनाथ, कबीरांचा गुरु-रामानंद स्वामी. असे हे संबंध शब्दांनी वर्णन करता येणार नाही. म्हणूनच अशा सदगुरुंचे वर्णन करावयास वाणी तोकडी पडते.

खरा गुरु आपल्या पुढे जाणाऱ्या शिष्याचे कौतुकच करतो. शिष्याकडून पराजय होण्यात गुरुला अपार आनंद होतो. कारण शिष्याचा विजय हा गुरूचाच विजय असतो. परंतु, शिष्याने देखिल गुरुंकडून नम्रतेनेच विद्या ग्रहण केली पाहिजे. अशा नम्रतेने व शालीनतेने अर्जुन आपले गुरु द्रोणाचार्य यांच्याकडून धनुर्विद्या ग्रहण करुन श्रेष्ठ असा धनुर्धारी झाला. गुरु हाच आपले ध्येय मानले पाहिजे. कारण, तोच आपल्याला परमेश्वराचे निराकाराचा आकार व निर्गुणाचा सगुणत्व दाखवित असतो. गुरुच आपल्याला परमेश्वराशी एकरूप होण्यास मदत करीत असतो. अर्थात जीव-शिवाचे तत्व आपल्याला सांगत असतो. म्हणून जर परमेश्वरांच्या सान्निध्यात आपणाला राहावयाचे असेल तर आधी मनोभावे व विनयेने गुरूची खरी सेवा करून, त्यांना शरण गेले पाहिजे. म्हणूनच की काय संस्कृतमध्ये एक वचन आहे. -

'शिवे क्रुध्दे गुरुस्त्राता, गुरौ क्रुध्दे, शिवो न हि
तस्मात सर्व प्रयत्नेन श्रीगुरु शरणं व्रजेत'

अर्थात, जर परमेश्वर आपल्याशी नाराज (रुष्ट) झाले तर गुरु आपले संरक्षण करू शकतो. जर गुरुच आपल्यावर नाराज झाले तर आपले संरक्षण कोणीच करू शकत नाही. म्हणून सर्व प्रयत्नपूर्वक श्रीगुरुंना आपण शरण गेले पाहिजे.

'गुरु म्हणजे उचंबळणारा ज्ञानसागर!' असे साने गुरुजी म्हणतात. सच्छिष्याचा मुखचंद्र पाहूनच गुरु हेलावत असतो. गीतेमध्ये ज्ञान प्राप्त करण्याचे प्रकार सांगितले आहेत. त्यातील एक असा -

'तद्विद्या प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया'

अर्थात, ज्ञान हे प्रणामाने, पुन्हा-पुन्हा विचारण्याने व सेवेने प्राप्त करून घ्यावयास हवे.

जगात शास्त्रांचा कितीही विकास झाला, तरी जोपर्यंत जीवनकला माणसाला साधत नाही. तोपर्यंत सारे व्यर्थ आहे. कारण जीवन किती जगले यापेक्षा जीवन कसे जगलो याला जास्त महत्व आहे. जीवन जगण्याची सुध्दा एक कला असते. परंतु, ती कला सर्वांनाच जमत असेल असे मात्र मुळीच नाही. मात्र जीवन कला ही एक नसून अनेक प्रकाराने व्यक्ति जीवन जगत असतो.

त्या आधी समाजात परस्परांशी कसे वागायचे ते शिका. असे टॉलस्टॉयचे मत आहे. आधुनिक यंत्रामार्फत संगीत ऐकून संसारात संगीत येणार नाही. किंवा इतर टाकंटिक्यांनी रडका संसार मधुर होणार नाही. म्हणून खरे जीवन संगीत आपल्या अंत:करणात निर्माण झाले पाहिजे. व अंत:करणात संगीत, नाद निर्माण करणे हे फक्त सद्गुरुच्या हाती असते. म्हणजे आपले अंत:करण उलगडून त्यात सात्विक गुण निर्माण करणे हेच गुरुचे खरे कर्तव्य असते. परिश्रमाने मिळविलेले ज्ञान आपणाला शिक्षक देत असतात. परंतु, गुरुजवळ प्रणाम व सेवा हेच ज्ञानाचे दोन मार्ग असतात. व त्यातल्यात्यात शिष्याजवळ एक आवश्यक असा गुण असला पाहिजे. तो म्हणजे नम्रता. कारण नम्रता हा ज्ञानाचा खरा आरंभ आहे. कारणही तसेच आहे काही उच्च कोटीतील वस्तु मिळविण्यासाठी नमावे तर लागतेच. म्हणण्याचा अर्थ एवढाच की, गुरु जवळून ज्ञानार्जन करतांना आपल्यातील कोणताही अवगुण मध्ये आडवा व्हावयास नको. त्यातल्यात्यात 'अहंकार' तर मुळीच नको.

गुरूची पूजा म्हणजे सत्याची पूजा, ज्ञानाची पूजा, अनुभवाची पूजा. जोपर्यंत मनुष्याला ज्ञानाची तहान आहे. ज्ञानाबद्दल आदर आहे, तोपर्यंत जगात गुरूभक्ती राहणार आहे. ज्ञानासाठी अनुभवाची गरज असतेच व ते अनुभव आपल्याकडे कमी असल्यामुळेच आपल्याला चांगला अनुभवी मार्गदर्शकाची गरज भासते. म्हणूनच म्हटले जाते की, ज्ञानार्जनामुळे (केवळ अनुभवशुन्य) मनुष्य पोपटासारखा बोलायला व वाद-विवाद घालण्यास शिकतो. परंतु, अनुभवामुळे मनुष्य गरूड बनतो, अर्थात त्याची दृष्टी ही जगाकडे पाहण्याची व्यापकदृष्टी ठरते.

मात्र, गुरु-शिष्यांमध्ये 'मी' पण नसावे. या 'अहं' भावामुळे दोघांचाही नाश होवू शकतो. दोघांपैकी एकाच्याही मनात जर स्वत:च्या विद्येविषयी गर्व असला तर त्याचा नाश निश्चितच असतो. यासाठी आपण थोडक्यात एक गोष्ट बघूया-

एका आश्रमात गुरु-शिष्य राहत होते. ते दोघेही रोज माधुकरी मागण्यासाठी नदीच्या पलिकडील गावात जात असत व आपले पोट भरल्यावर नदीपार करून परत आश्रमात येवून गुरू आपल्या शिष्याला ज्ञान देत असे. असा त्यांचा नित्यक्रमच होता. परंतु, एके दिवशी अचानक गुरू आजारी पडले. त्यामुळे शिष्य एकटाच नदीपलिकडे माधुकरी मागण्यासाठी गेला. तो सोबत गुरुंसाठीही काही खाण्याचे घेवून आला. येतांना मात्र, नदीला खूप पूर आलेला होता. आता शिष्याला मोठा प्रश्न पडला की, नदी पार करायची कशी? इकडे गुरु आपल्या आश्रमातून शिष्याची गंमत पाहत होते. की, आपला शिष्य आता ही नदी कशी पार करणार? परंतु, शिष्याने न घाबरता मनोभावे आपल्या गुरूचे नामस्मरण करत-करत पुढे पाऊल टाकले. नदी केव्हा पार झाली याचे शिष्याला देखील नवल वाटले. गुरू शिष्याला म्हणाले, तू एवढी नदी कशी पार केलीस? तर शिष्याने खरे तेच सांगितले की, मी तुमच्या नामस्मरणाने पार केली. गुरु फारच आनंदीत झाले अशीच विरुध्द घटना घडून शिष्य आजारी पडला व गुरूला एकटेच भिक्षा मागण्यासाठी नदीपार जावे लागले. परत येतांना नदीला तसाच खूप पूर आलेला होता. गुरूला असे वाटले की, आपल्या शिष्याने अशा संकटावेळी आपलेच तर नाव घेतले होते. म्हणून त्याने स्वत:च्या नावाचे स्मरण करीत पुढे पाऊल टाकले. साहजिकच, ते गुरू आश्रमापर्यंत न पोहचता मध्येच पाण्यात बुडाले. त्यांच्या या नाशाला त्यांचा स्वत:चा 'अहं' भाव कारणीभूत ठरला. तसे मात्र कोणत्याही गुरु किंवा शिष्यात नसावे हेच खरे. सुदैवाने जर आपल्याला चांगला, उत्तम असा गुरू लाभला तर जन्माचे सोने व्हावयास काहीच वेळ नाही. मात्र शिष्यानेही त्याप्रमाणे आपले आचार-विचार अटळ ठेवले पाहिजेत. अर्थातच शिष्य हा चारित्र्यशील असला पाहिजे. यासाठी (अर्थात ज्ञानार्जनासाठी) आपण आधी स्वत:लाच ओळखले पाहिजे. आत्मपरीक्षणाशिवाय ज्ञानाची अपेक्षा करणे चुकीचे आहे.

अशाच पध्दतीचे आपण चांगदेवाचे उत्तम असे उदाहरण देवू शकतो. तो १४०० वर्ष जगून सुध्दा त्याने आपले आत्मपरीक्षण केले नव्हते. त्याच्या ज्ञानाला अहंकाराची साथ होती. याच अहंकाराला 'मुक्ताई' ने मुळातून काढुन टाकले व एवढ्या महापुरूष चांगदेवाला आपल्या मुलीप्रमाणे असणाऱ्या 'मुक्ताई'ला गुरू मानावेच लागले. अर्थात गुरूला वयोमर्यादा नसते व शिष्यालाही ज्ञानार्जनासाठी वयोमर्यादा नसते. ज्ञानेश्वरांनी देखील ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायात आपल्या गुरुविषयी वर्णन केले आहे. आपल्या वडिल बंधूंना त्यांनी आपले गुरू मानले होते. पुष्कळांना या गुरूभक्तीतील महान अर्थ

समजत नाही. दंभाचा पसारा सर्वत्र वाढल्यामुळे, दिखाऊपणाचे स्तोम जिकडे-तिकडे माजल्यामुळे थोर गुरुभक्तीचे महान तत्व आज धुळीत पडले आहे.

गुरू म्हणजे केवळ शिक्षक नव्हे, केवळ आचार्य नव्हे, शिक्षक किंवा आचार्य त्या-त्या विशिष्ट ज्ञानाशी आपला थोडाफार परिचय करून देत असतात. त्यांचा हात धरुन आपण ज्ञानाच्या अंगणात येतो. परंतु गुरू आपणास ज्ञानाच्या गाभाऱ्यात घेऊन जातो. त्या-त्या ध्येयभूत ज्ञानाशी गुरु आपणास एकरूप करून टाकतो. असे साने गुरूजी म्हणतात. म्हणूनच म्हणतात की काय, की जीवनात प्रत्येकाने आपला गुरू केलाच पाहिजे. 'गुरु बिना ज्ञान नहीं' असे संत रामदास सत्याच्या आधारेच म्हणतात. कारण गुरूच आपल्या जीवनाचा उध्दार करून मोक्षाकडील वाटचालीत मार्गदर्शक बनत असतो. कधी-कधी तर काहींच्या जीवनात काळच गुरु बनतो. व काळापासून बोध घेवून सावधगिरीने जीवनात यशस्वी वाटचाल करीत असतात. म्हणजेच प्रत्येकाच्या जीवनात एकदा तरी आपला गुरू भेटतो. पण, त्याला ओळखण्यासाठी आपल्याला व्यापक दृष्टी हवी. परन्तु ही व्यापक दृष्टी नसलेल्या व्यक्तिला गुरूची मदत हवीच. हेच चक्र आपल्या जीवनात घडत असते. मात्र, आपण बहुतेक लोक या वास्तव गोष्टीकडे दुर्लक्ष करीत असतो. म्हणून तसे न करता आत्मपरीक्षण केल्यानंतरच ज्ञान प्राप्त होते

खानदेश स्त्रोत्र

नमो खानदेशा नमो वंद्य देशा।
नमो भव्य देशा नमो स्तव्य देशा।
नमो उज्जवला थोर संपन्न देशा।
नमो निर्मला निस्तुला वैभवेशा।।१।।

तुझी धूळ माथा पवित्रा धरावी।
तुझी कीर्तीबापा मुखी ती वसावी।
तुझे नाम ओठी असो पुण्यधाम।
तुझ्या सेवनाचा असो एक काम।।२।।

महान भास्कराचार्य ज्योतिर्विदांनी।
दिगंती तुझी किर्ती नेली तयांनी।
नसे बुध्दिमान जाहला तत्समान।
असा रे तुझा थोर लौकिकमान।।३।।

इथे जाहले शूर ते कोळी गजे।
इथे जाहले शूर गोपाळ गजे।
इथे जाहले शूर ते भिल्ल गजे।
सदा शौर्यधैर्य तुझी भू विराजे।।४।।

मुसलमान हिंदूत एकी करावी।
कळा खानदेशास ती दिव्य यावी।
नको भांडणे शूद्र ते मोह सोड।
महाभाग्य सौभाग्य स्वातंत्र्य जोड।।५।।

नको ब्राम्हणा-ब्राम्हणी क्षूद्र वाद।
उठोनि करा शक्तीने सिंहनाद।
मनी साठवा देशभक्ती अलोट।
करावी कृती धीट मोठी अचाट।।६।।

असो येथ श्रध्दा असो येथ बुध्दी।
असो ऐक्य येथे असो चित्तशुध्दि।
असो भाग्यसंवृध्दि स्वातंत्र्यलब्धी।
असो अंतरंगी समस्तांस शुध्दी।।७।।

सदा वैभवे खानदेशे सजावा।
यशोगंध त्याचा दिगंतात जावा।
सदा शुध्द स्वातंत्र्य स्वर्गात नांदो।
कदा आपदा दीनता ती न बाधो।।८।।

-पूज्य साने गुरूजी

स्वामी विवेकानंद

कु. अर्चना नारायण भोळे
टी.वाय.बी.एस.सी.

स्वामी विवेकानंद हे समाजाला नवचैतन्य देणारे कुशल, संघटक, उत्तम संगीत जाणकार, समाजसेवक, योध्दा, संन्यासी होते. स्वामी विवेकानंदांनी वेदांतांचा अभ्यास केला होता. त्यांना साहसी, धाडसी असे तरूण अपेक्षित होते. सजीव माणसावर प्रेम करा. पूजाअर्चा करा व त्यांची सेवा करा. त्याचप्रमाणे चला उठा जागे व्हा असे त्यांनी सांगितले. समाजसेवा व देशसेवा यावरूनच माणूस पुढे जाऊ शकतो. कोणतेही राष्ट्र किंवा धर्म स्त्रियांना शिक्षण दिल्याशिवाय पुढे जाऊच शकणार नाही, असे त्यांनी सांगितले त्याचप्रमाणे सर्वधर्म समभावही त्यांनी सांगितला.

स्वामी विवेकानंद यांचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी झाला. त्यांचे नाव नरेंद्रनाथ दत्त होते त्यांच्या वडिलांचे नाव विश्वनाथ दत्त व आईचे नाव भुवनेश्वरी देवी होते. त्यांच्या मोठ्या भावाचे नाव रामचंद्र दत्त होते. स्वामी विवेकानंद हे रामकृष्ण परमहंस यांचे शिष्य होते. परमहंसाना स्वामी खूप खूप आवडायचे. प्रथम त्यांचा देवावर विश्वास नव्हता. परमहंसांनी त्यांना ईश्वराबद्दल व धर्माबद्दल खूप शिकवले. एके दिवशी परमहंस त्यांना म्हणाले, 'बाबा नरेंद्रा, देण्यासारखे सारे ज्ञान मी तुला दिले' हाच नरेंद्र स्वामी विवेकानंद म्हणून जगापुढे आला. धन्य ते गुरु-शिष्य.

स्वामी विवेकानंद हे १८७९ साली मॅट्रीक पास झाले नंतर त्यांनी पुढील शिक्षण पूर्ण केले. बी.ए. ची परीक्षा दिली होती. निकाल येण्याआधीच त्यांचे वडील विश्वनाथ दत्त वारले. डिसेंबर १८९२ मध्ये ते कन्याकुमारीला आले तेथे त्यांनी धर्मासाठी खुप कार्य केले.

अमेरिकेत शिकागो येथे ११ सप्टेंबर १८९३ रोजी विश्वधर्म संमेलन होते. विवेकानंदाना हे समजलं व त्यांनी अमेरिकेत जाण्याचे निश्चित केले. त्यांची काही तयारी झालेली नव्हती. भाषण तयार नव्हते. आपला धर्म त्यांना कळला पाहिजे म्हणून आपण गेलेच पाहिजे असे त्यांना वाटले. स्वामी विवेकानंदाचे त्या वेळेचे वय होते फक्त ३० वर्ष. अमेरिकेतील शिकागो शहरी एका भव्य सभागृहात ते संमेलन आयोजित केले होते. संमेलनासाठी आलेल्यांची संख्या ७००० च्या वर होती. जिकडे तिकडे सर्व धर्माच्या पताका फडकत होत्या. व्यासपीठावर ख्रिस्ती, यहुदी, इस्लामी, हिंदू इत्यादी धर्माचे प्रतिनिधी बसले होते.

सभेला सुरूवात झाली. आरंभी प्रार्थना म्हणण्यात आली. मग स्वागतपर भाषण झाले. नंतर एक एक धर्म गुरू पुढे येवू लागले. अध्यक्षांनी एका तरूण हिंदू संन्याशास बोलण्यास सांगितले, श्रोत्यांमधून एका कोपऱ्यातून तो संन्यासी पुढे आला. लोक आश्चर्याने त्याच्याकडे पाहू लागले, कोण होता तो हिंदू संन्यासी? ते होते स्वामी विवेकानंद! पायघोळ भगवी कफनी, डोक्यास त्याच रंगाचा भरदार फेटा असा त्यांचा पोशाख होता. स्वामी बोलण्यासाठी पुढे आले. त्यांना फक्त पाचच मिनिटे बालण्यास मिळाली होती. कारण त्यांना सभेचे आमंत्रण नव्हते. स्वामी विवेकानंदांनी बोलण्यास सुरूवात केली, 'Hy Brothers and Sisters in America' असे वाक्य त्यांच्या तोंडातून बाहेर पडताच टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. सारी सभा आनंदाने फुलून गेली. स्वामींनी साऱ्या लोकांची मने जिंकली. 'बंधु-भगिनिंनो हे शब्द त्या सभेतील लोकांना नवीन होते. 'सभ्य स्त्री-पुरूषहो' असे बोलण्याची त्यांची पध्दत होती. स्वामिजींच्या बोलण्यात सर्व जगाविषयीचा बंधुभाव भरला होता. स्वामी म्हणाले, 'माझा जन्म हिंदू

धर्मात झाला व मला माझ्या धर्माचा अभिमान आहे. माझा धर्म कोणत्याही धर्मास कमी लेखत नाही. सर्वधर्म सारख्याच योग्यतेचे आहेत. असे माझा धर्म सांगतो आम्ही सर्व धर्माना पूज्य मानतो. आणि सर्व धर्मातील लोकांना बंधू समजतो. परत टाळ्यांचा कडकडाट झाला. पाच मिनिटे केव्हाच संपली होती. त्याचे कुणालाही भान राहिले नाही. स्वामी बंधुभावाबद्दल बोलत गेले सारेजण ऐकत गेले.

अमेरिकेतील लोकांना स्वामींबद्दल फार आदर वाटू लागला. तेथील लोकांच्या आग्रहाखातर स्वामी दोन वर्ष अमेरिकेत राहिले. तेथे त्यांना अनेक शिष्य मिळाले. इंग्लंडमधील कुमारी मार्गारिट नौथल ह्या त्यांच्या शिष्या झाल्या. त्या भारतात आल्या. पुढे त्यांनी हिंदु धर्म स्विकारला. स्वामींनी त्यांचे नाव नवेदिता ठेवले. लोक त्यांना भगिनी 'नवेदिता' म्हणू लागले. अखेरपर्यंत त्या भारतातच राहिल्या. पुढे त्यांनी स्वामी विवेकानंदांचे कार्य केले.

स्वामी विवेकानंदांनी भारतात रामकृष्ण मिशनची स्थापना केली. त्यानंतर न्युयार्क, पॅरीस, लंडन, लॉस एन्जलीस इ. देशात सुध्दा रामकृष्ण मिशनची स्थापना करण्यात आली.

४ जुलै १९०२ या दिवशी त्यांचे एकादशीचे व्रत होते. स्वामी विवेकानंदांनी त्यांच्या हातून शिष्यांना जेवण घातले व हात धुतले. नंतर मंदिरात गेले. मग आपल्या कोठडीत जावून काही वेळानंतर त्यांचा मृत्यू झाला.

जीवन

- कु. चित्रा गणेश पाटील
इ. १२ वी (कला)

जीवन ना खेळ ना गंमत
व्हावे लागेल याच्याशी सहमत.
जीवन खरोखर आहे आव्हान एक
शोधले तर मार्ग मिळतील अनेक.
जीवनाशी करू नका थट्टा
जीवन तर एक अटळ सट्टा.
मार्ग चुकलात तर मिळेल अपयश
पण प्रयत्नांती मिळेल सुयश.
खरं तर तडजोडीचेच नाव जीवन
त्यातच होते परमेश्वराशी मिलन.
जीवन नाही भातुकलीचा खेळ
हा तर अतुट सुख-दुःखाचा मेळ.
प्राप्त परिस्थितीत जो असतो समाधानी
जीवनात त्याचीच खरी आमदानी.

"सवय"

- राजेंद्र सिदु भुकन
इ. ११ वी (कला)

मित्रा ! अशी कशी रे ! ती
मागे लागायला तिला वेळ लागत नाही
लागली तर सुटत नाही
चांगली असेल तर ती-
नेते यशाच्या उंच शिखरी.
वाईट असेल तर ती
लोटते माणसाला खाईत
ती पाहत नाही कधीही वय
तिचेच नाव आहे 'वाईट सवय'.
ती बनते माणसाचे अभिन्न अंग
माणसाला ती चांगलेच करते तंग.
म्हणून सांगतो अहो-रात्र-प्रहरी
जाऊ नका कुणीही तिच्या आहारी
जाऊ नका कुणीही तिच्या आहारी.

'खान्देशकन्या बहिणाबाई'

विनोद भिला शिवदे
तृतीय वर्ष कला.

सुप्रसिध्द कवी सोपानदेव चौधरी यांच्या मातोश्री म्हणजे 'बहिणाबाई'. महाराष्ट्राच्या काव्य रसिकांना बहिणाबाईंची कविता अपरिचीत राहिलेली नाही.

बहिणाबाईची कविता म्हणजे पूर्णार्थाने खानदेशी कविता. बहिणाबाई एका शेतकरी कुटुंबात जन्मल्या आणि दुसऱ्या शेतकरी कुटुंबाशी त्यांचे नाते जोडले गेले. शाळेचे तोंड त्यांना पाहवयास मिळाले नाही. म्हणून त्यांना शाळेविषयी आस्था नव्हती. असे नाही. त्यांच्या कवितेत शाळेविषयीचे जे उल्लेख येतात त्यावरुन त्यांचा शिक्षणाविषयीचा दृष्टिकोन दिसून येतो. फुलातील सुगंधाला जशी वाटाड्याची गरज नसते तशी बहिणाबाईंच्या अंतरीच्या उमाळ्यांना कशाचीही गरज नव्हती. ती सर्वस्वी स्वतंत्र व स्वयंपूर्ण आहे.

बहिणाबाईंचे जीवन पूर्णपणे निसर्गमय होते. तशीच त्यांची कविताही निरामय, निरागस होती. आपली कविता कशी फुलते हे सांगतांना बहिणाबाई म्हणतात.

'अरे घरोटा घरोटा
तुझ्यातून पडे पीठी
तसं तसं माझं गानं
पोटातून येतं व्होटी!'

बहिणाबाईंच्या मनावर कोणतेही साहित्य शास्त्रीय संस्कार झालेले नव्हते. संतकवी तुकाराम म्हणतात.

'अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी
बोलीता हे बोली बोलवेना.'

साक्षर असोत की निरक्षर असोत सारेच प्रतिभावंत अखेर एकाच मार्गाने जात असतात. याचाच पुरावा नाही काय? बहिणाबाईंची सारीच कविता पोटातून ओठावर आलेली कविता आहे. ही कविता त्या कुठे शिकल्या हेही त्यांनी सांगितले आहे.

राजसं आत्या, बहिणाबाईसारख्याच अडाणी त्यांना कविता रचता येत नव्हती. बहिणाबाईंनाच हे सारं कसं जमत हे राजसं आत्याच्या मनाचे औत्सुक्य शेवटी एकदा त्यांनी विचारलच 'तुला एवढं शिकवतो कोण?' माझ्या सारखीच तू न शिकलेली, ना पढलेली, तुला ही गाणी सुचतात तरी कशी? ही बोली तुला कोण शिकवतो? बहिणाबाई लगेच म्हणाल्या-

'माझी माय सरसोती
माले शिकवते बोली
लेक बहिणाच्या मनी
किती गुपीत पेरली!'

बहिणाबाई कविता शिकल्या त्या अशा! त्यामुळे त्यांची कविता ही जीवनाशी एकरूप झालेली कविता आहे. बहिणाबाईचे नित्याचे बोलणे ही काव्यमय असे. गद्य जीवन जगता जगता त्यांनी ते सर्व क्षण काव्यमय करुन टाकले आहेत.

बहिणाबाईंनी आयुष्यभर शेतीची कामे केली. परंतु या कष्टाच्या कामात त्यांच्या ओठांचे गाणे कधी थांबले नाही. उलट गाण्याने श्रम होतात हलके अशी केशवसुतांप्रमाणे असलेली काव्यदृष्टीच त्यांच्या जवळ असावी. श्रमाची लाज त्यांना वाटली नाही. संकटांनी त्या कधी डगमगल्या नाहीत. माणसांना समजून घेण्याची एक जबरदस्त ताकद त्यांच्याजवळ होती. अपूर्व सांमजस्य त्यांच्याजवळ होते. सुख-दुःखाचे स्वागत सारख्याच पद्धतीने करणारी समतोल वृत्ती होती.

जरी फुटल्या बांगड्या
मनगटी करतुन
तुटे मंगयसुतर
उरे गयाची शपत

एका स्त्रीने स्वत:च्या कतृत्वावर दाखविलेला हा प्रचंड आत्मविश्वास कितीतरी स्त्रियांना प्रेरक ठरावा. संतांच्या मुखात हरिनामाशिवाय दुसरे काहीच नसते तसे बहिणाबाईंच्या मुखात गाण्याशिवाय दुसरे काहीच नसते पहाटे घरोट्यावर (जात्यावर) बसल्यापासून त्यांच्या मुखातून ही काव्यपुष्पे बाहेर पडायला सुरूवात होई ती रात्रीची झोप लागे पर्यंत घरोट्याचा खुंटा हातात धरताच त्या गाऊ लागत त्या गाण्यातून जीवन ओसंडू लागे.

अरे जोडता तोडल
त्याले नातं म्हणूनही
ज्याच्यातुन येतं पीठ
त्याले जातं म्हणूनही.

असे गाता गाता दळण असे मग चुल्हा पेटवावा लागे. तो पेटता पेटत नसे सारा धुरच धूर बहिणाबाई त्याचाही सुर पकडतात चुल्हा पेटवत भाजायला सुरूवात करत पण त्याच्या अगोदरच हाताला चटके बसत असत बहिणाबाईचे संसारविषयक तत्वज्ञान त्या चटक्यातून फुलू लागे.

अरे संसार संसार
जसा तवा चुल्ह्यावर
आधी हाताला चटके
तव्हा मियते भाकर.

भाकरी तयार होतात मग शेताकडे जावे लागे, जातांना वाटेत जे जे भेटत असे ते ते काव्यरुप धारण करी.

ह्या साऱ्या गीतातून बहिणाबाई केवळ वर्णन करीत नाहीत. त्यांच्या प्रत्येक शब्दाला अनुभूतीचा आणि जीवनाचा सुगंध येत असतो. पूर्वी मळणी बैलाच्या पायाखाली केली जात असे बहिणाबाई म्हणतात.

पाय उचल रे बैला
कर बापा आता घाई
चालू देरे रगडनं
तुझ्या पायाची पुण्याई.

बहिणाबाईचे अंतरंग असे कृतज्ञ आहे. तसेच ते परमेश्वर चरणी वाहिलेले आहे. देव अजब गारोडी आहे तो माणसांच्या मनात असून आभाळाच्या पार आहे. तसेच तो पंढरीला विटेवर उभा आहे. त्याच्यादारी क्षणभर उभी रहाणारी बहिणाबाई म्हणते.

माझं इट्ठल मंदिर
अवघ्याचं माहेर
मधि इट्ठल रुख्माई
उभे इटेवर.

अशी आहे बहिणाबाईची कविता ती घरातून, शेतातून, कामातून, घामातून, मातीतून, मळ्यातून, मंदिरातून सारखी फुललेली आहे. बहिणाबाईचे हे जीवन गाणे त्यांच्या नातेवाईकांनी वेळीच टिपून ठेवले व मराठी रसिकांचे भाग्य उजळले. हे गाणे हीच त्यांची अमर कविता. अक्षर ओळख नसलेल्या बहिणाबाईची ही अक्षर कविता! बहिणाबाईच्या दैनंदिन जीवनातून ती उमललेली आहे.

शिक्षणाचा माझा अर्थ भिन्न आहे हे लक्षात घ्या. त्यामध्ये अक्षरज्ञान व भाषाज्ञान हे तर आहेच, पण खऱ्या शिक्षणाचे सार म्हणजे मानवता प्रगट करणे, मर्यादशील असणे, अंतर्बाह्य स्वच्छता राखणे. आणि धैर्याने व साहसाने आपले कुटुंब व कुटुंबाच्याद्वारे शेजारी, गाव, समाज आणि देश या सर्वांना सुख-शांती देऊन आनंदित करणे हे होय.

-महात्मा गांधी



सौ. सुलभा वर्दे - माजी विद्यार्थीनी म.जे.महाविद्यालय, मार्गदर्शन करतांना त्यासपीठावर माजी प्राध्यापिका श्रीमती लता पाटणकर



श्री. रविंद्र पिंगे - सुप्रसिध्द ललित गद्य लेखक आपले विचार मांडतांना



महाविद्यालयाचा विद्यार्थी सचीन शामाणीचा सी.ए. झाल्याबद्दल सत्कार करतांना श्री. मिलींद चंपानेरकर



प्राचार्य डॉ. एम.आर.करूप,
वझे कॉलेज मुंबई-
एन.ए.ए.सी. संदर्भात प्राध्यापकांना
मार्गदर्शन करतांना.



सुप्रसिध्द हृदयशल्य चिकित्सक
डॉ. सैफी आरसीवाला
विद्यार्थ्यांना व्यवसाय मार्गदर्शन करतांना



नियोजन मंडळाच्या वतीन आयोजित
Reserve Bank of India-
"Friend, philosopher and guide"
या विषयावर व्याख्यान देतांना,
रिझर्व बँकच अधिकारी
श्री. दीपक नामजोशी

शेअर्स एक अभ्यासपूर्ण गुंतवणूक

– स्वाती भिकनराव शिरूडे
द्वितीय वर्ष कला (अर्थशास्त्र)

पूर्वीच्या लोकांचा विचार करण्याचा दृष्टिकोन वेगळा होता. त्यांना राजकारणाचं, नाटकाचं, गप्पांचं, सोहळ्यांचं आणि कीर्तनाचं वेड होत. मना वासना दुष्ट कामा नये रे ! असे म्हणणाऱ्याला जास्त पैसे मिळवणे दुष्ट वासनेसारखे वाटायचे त्यामुळे हे मनाचे श्लोक सोडून धनाचे श्लोक मुखोद्गत करावयास मराठी मन तयार होत नव्हतं. दासबोधाइतकाच द्रव्यबोधही महत्वाचा आहे हे त्यांना पटण्यासारखं नव्हतं ज्ञानेश्वरीबरोबर धनेश्वरीच्या ओव्या म्हणायची त्यांची आकांक्षा नसायची. 'संशयकल्लोळ' नाटकाबरोबरच प्रत्यक्ष आयुष्यात 'संचयकल्लोळ' हवा हे त्याला शेअर्समध्ये इतरांना चार पैसे मिळायला लागल्यावर भावू लागलं संशयात्म्याचं रूपांतर संचयात्म्यात झालं. सुरवटांच फुलपाखरू झाल्यावर ते जसं अनेक फुलांकडे आकर्षित होत तसं चित्र गुंतवणुकीबाबत निर्माण झालं.

साधारणपणे गेल्या वीस - पंचवीस वर्षात जग बरचसं बदललं आहे. १९७५ सालापासून अनेक कंपन्या, अनेक उद्योग स्थापन झाले. शेअर बाजारात त्यांची खरेदी-विक्री होऊ लागली. १९८०-८१ च्या सुमाराला त्या शेअर्सच्या किंमती वर गेल्यावर बऱ्याच जणांना चांगली प्राप्ती होऊ लागली. नवीन कंपन्यांच्या शेअर्सला लोक अर्ज टाकू लागले व तिथेही बऱ्याच जणांना फायदा झाला. १९९१-९२ मध्ये शेअरबाजाराचा निर्देशांक पतंगाप्रमाणे आकाशात भरारी मारू लागला. आणि गप्पांचं वेड असणारं हे मराठी मन शेअर्स खरेदी-विक्रीच्या गप्पा मारू लागलं.

बचत आणि गुंतवणूक यात फरक असतो. संचयापेक्षा गुंतवणुकीला जास्त भिती असते. सोने, चांदी, जमीनजुमला यातील बचतीवर दैनंदीन खर्चासाठी व्याजासारखं काही उत्पन्न मिळत नाही. याशिवाय अशा प्रकारच्या बचतीत काही धोकेही असतातच. काही आकस्मिक खर्च करण्याची वेळ आली तर तेव्हा लगेचच अशा प्रकारची बचत उपयोगात येऊ शकत नाही. आणि सर्व अडचणींवर मात करणाऱ्या गुंतवणुकीच्या वाटा हल्ली शोधाव्या लागतात.

गुंतवणूक हे एक शास्त्र आहे, एक कला आहे, आणि एक खेळही आहे. बुध्दीबळ हा ब्रिजमधील चिकाटी, हुतूतू वा टेनिसमधील चापल्य आणि क्रिकेटमधील रोमांचकता या तिन्हींचा अनुभव या खेळात येतो. विशेषत: क्रिकेटशी त्याची तुलना केल्यास ती जास्त समर्पक वाटेल क्रिकेटमध्ये एक दिवसीय सामनेही असतात व पाच दिवसाची कसोटीही असते एक दिवसीय सामन्यात धडाख्याने धावा जमवायच्या असतात व दिवस अखेरीस निर्णयही लागलेला असतो. मॅचचा रंग क्षणाक्षणाला बदलत असतो. यात नाणेफेकीचं दैवही आपल्या बाजूला असावं लागतं, तर कसोटी सामन्यांत अनिर्णित अवस्था अनेकदा दिसते पाय रोखून ठेवणारा फलंदाज त्या ठिकाणी हवा असतो. चिकाटी व संयम हे सद्गुण ठरतात. शेअर्समधील गुंतवणुकीबाबतही एक-दोन महिन्यांसाठी बाजाराचा कल किंवा मिळालेली माहिती याच्या आधारावर झटपट स्वरूपाची गुंतवणूक असते. किंवा कंपनीची ऊर्जितावस्था चार-पाच वर्षे बघण्याची तयारी ठेवून वर्धिष्णू कंपन्यांमध्ये केलेली गुंतवणूकही असू शकते. या दोन्ही प्रकारात निवडायच्या कंपन्या वेगळ्या असतात.

किंबहुना यापैकी कुठल्या प्रकारात जायचं हे गुंतवणूकदाराच्या भावी गरजा, फायद्याच्या अपेक्षा, वय, जबाबदाऱ्या, एकूण उत्पन्न वगैरे बाबींवर ठरतं. वय वाढतं तसा मनुष्य जास्त सावधाचित्त होत असतो. जलद गोलंदाजाची भेदकता व वेग पुढे कमी-कमी होतो,

तसचं गुंतवणुकीबाबत होऊ शकत. काही जणांना जुगार, सट्टा झटकन श्रीमंत होण्याचीही हाव असते. अशावेळी त्यांना लाभ आणि लोभ यातील एका मात्रेचा फरक उमगत नाही. तर काही जण 'महाजनो येन गत: स पन्थ:' म्हणणारे असतात. खरा गुंतवणूकदार हा 'शूचिनां श्रीमतां गेले' जन्मणाऱ्या योगभ्रष्ट्रासारखा असावा व हे सरावाने अभ्यासाने शक्य होते.

कुठलीही कला व खेळ यात सराव, सातत्य आणि अभ्यास महत्वाचा असतो. जगप्रसिध्द खेळाडू होऊनही सचिन तेंडूलकरला नेट प्रॅक्टिस करावी लागते. तसंच गुंतवणूक करणाऱ्यालाही पाक्षिक, नियतकालिकं याचं वाचन करून स्वत: अभ्यास करावा लागतो. आयुष्यात नेहमी गुरू हे असावेत स्वत: दत्तात्रेय गुरूदेव असूनही त्यांनी चोवीस गुरू केले होते. गुंतवणूकीत आपल्याला 'मया दत्त' असं कुणी म्हणत नाही. त्यासाठी आपल्यालाच वण्नेस् व्हावं लागतं.

शेअरबाजारात दोन प्रकारे गुंतवणूक करता येते. पहिली म्हणजे, वेळोवेळी विद्यमान वा नव्या कंपन्या भांडवलविक्री करतात तेव्हा त्यासाठी अर्ज टाकणे किंवा ज्या शेअर्सची शेअरबाजारावर नोंद झालेली आहे. त्यांची दलालामार्फत खरेदी करणे. पहिल्या प्रकाराला प्राथमिक बाजार म्हणतात तर दुसऱ्या प्रकाराला दुय्यम बाजार म्हणतात. दुय्यम बाजारात दलालामार्फतच शेअर्स घ्यावे वा विकावे लागतात म्हणून असा दलाल हा विश्वसनीय असणे आवश्यक असते.

कंपन्यांच्या शेअर्सच्या बाजारभावावर परिणाम करणारे अनेक घटक असतात. कंपनीचं व्यवस्थापन, वय, स्थैर्य, उद्योगाचा प्रकार, उत्पादनाचा प्रकार, देशातील विक्री व निर्यात यांची खात्री, कंपनीचा लाभांश, हक्कभाग, बक्षिसभाग या सर्वांचाच विचार करावा लागतो. त्यासाठी मौलिक विश्लेषण आणि तांत्रिक विश्लेषण अशा दोन अभ्यासांचा आधार घेता येतो. मौलिक विश्लेषणात कंपनीच्या शेअरचे पुस्तकी मूल्य किती आहे, तिची भागागणिक नफ्याची किती मिळकत आहे तिच्या एकूण भांडवलात बक्षिसभागाचे प्रमाण किती, गेल्या वर्षात कंपनीच्या भावाची कमाल व किमान पातळी किती होती, सध्याच्या भावाशी तिच्या शेअरगणिक मिळकतीची टक्केवारी किती पडते. किंवा भाव मिळकतीच्या कितीपट आहे, व्यवस्थापन भागधारकांचा नफा होईल असेच लाभांश, हक्कभाग, बक्षिसभागाबाबत धोरण आखते ना ! याचे परिशीलन असते. तर तांत्रिक विश्लेषणात सध्या ह्या कंपनीबाबत अन्य गुंतवणूकदारांचा काय कल आहे. बाजारातील तेजीमंदीचा त्या शेअरवर किती प्रमाणात परिणाम होतो, गेल्या तीस, पन्नास, शंभर दिवसांतील भावांचा आलेख कसा निघतो, त्यात काही ठराविक आकृत्या निर्माण झाल्याने भावी किंमतीबद्दल ठोकताळे आखता येतील का याचा अभ्यास असतो.

शेअरबाजारातील भाव, अनेकांचे कंपनीच्या विक्री नफ्यावगैरेबद्दलच्या अगर अन्य राजकीय, शासकीय, सामाजिक घटनांबद्दलच्या अफवा व आंतरिक माहिती या चार खांबावर आधारित असतात. याची जाण मात्र सदैव असणे गरजेचे असते.

एवढं सगळं करण्याऐवजी सोपी गुंतवणूक हवी असेल तर आज अनेक म्युच्युअल फंडांचा विचार उत्तम ठरतो ! पण म्युच्युअल फंडातील गुंतवणूक व स्वत: अभ्यासपूर्वक केलेली ही गुंतवणूक यात फरक असतो. व तो कळला की, गुंतवणुकीचा योग्य मार्ग डोळ्यासमोर उभा राहतो.

जीवन फूल

– अंजली शर्मा
प्रथम वर्ष, कला

तत्वांचे पराग
सत्याचा गंध
मर्यादेच्या पाकळ्या
अन् सुखाचा मध
जीवनाचे फूल हे भावदेठांनी सजलेले
विकारांच्या भुग्यांनी मात्र आतुन पोखरलेले
क्लेशांचे काटे अन् विचारांचे फाटे
जीवनसुमन मज आगळेच वाटे

विज्ञान व अंधश्रध्दा

– सुवर्णा अशोक सूर्यवंशी
इ. ११ वी (कला)

''कशावर तरी श्रध्दा असणे !'' हा मन व आत्म्याचा स्वाभाविक धर्म आहे, कारण श्रध्दे शिवाय कृती नाही. ''श्रध्दा म्हणजे आत्म्याचा निश्चित विचार''! आणि हा निश्चित विचार अधिक घासून पुसून काढण्यास विज्ञान मदत करत असते, आणि त्याला अधिकाधीक सत्याप्रत नेण्याचे काम विज्ञान करते. म्हणून श्रध्दा कशी असावी हे विज्ञान सांगते, आणि आपोआपच ते आपल्याला अंधश्रध्देपासून दूर करते. म्हणूनच आजवरची झालेली प्रगती म्हणजे शास्त्रोक्त श्रध्देचेच फळ होय. त्यासाठी आपल्या दैनंदिन जीवनात भिनलेल्या अंधश्रध्दा तपासून त्या फोल कशा ? हे वैज्ञानिक दृष्ट्या तपासणे अधिक आवश्यक आहे.

(निरनिराळ्या अंधश्रध्दा) जुन्या लोकांना काकतालीय न्यायाने चार-पाच अनुभव आले आणि त्यांनी मोघम काही नियम केले. ते नियम ''बाबा वाक्यं प्रमाणं'' या न्यायाने पुढच्या पिढींनी तसेच स्विकारले, आणि पुढे त्या रूढी, अंधश्रध्दा या रूपाने रूजल्या, परंतु त्यांची शहानिशा करणे, सत्यता पडताळून पाहण्यासाठी प्रयोग करणे, असा प्रयत्न कधीही करण्यात आला नाही. पूर्वजांनी सांगितले म्हणून केले किंवा पाळले, परंतु ''साक्षात्कारातूनच अनुभव पक्का होतो.'' हे विज्ञानाला अभिप्रेत असलेल सत्य कधीही पडताळून पाहण्याचा प्रयत्न केला नाही. पर्यायाने अंधश्रध्देच पीक फोफावत गेलं जसे, घरातून निघतांना मांजर आडवे येणे, कुत्र्याचे विव्हळणे, घूबडाचे ओरडणे, रस्त्यात गाय आडवी येणे, पापणी फडफडणे, रस्त्यात अंत्ययात्रा भेटणे, घराच्या दारावर मिरच्या लिंबू बांधून ठेवणे, पाण्याने भरलेली घागर डोक्यावर घेतलेल्या ललना भेटणे, लहान बालक शिंकणे, नवसाला देव पावणे, देवीला संतुष्ट करण्यासाठी बोकड कापणे, नदीचा पूर ओसरावा म्हणून तिला साडी-चोळी अर्पण करणे, तसेच अंगातील ताप जावा म्हणून तावीत, धागेदोरे घालणे, अंगात देवी येणे, भूताची बाधा असणे इत्यादी शुभ-अशुभ कल्पनांचे काकतालीय न्यायाने ठोकताळे लावून त्या कल्पना पुढच्या पिढींना प्रसृत झाल्या आणि त्या अंधश्रध्दा म्हणून रूजल्या.

प्रत्यक्ष प्रयोग, निरिक्षण व निष्कर्ष काढणे या दिशेने विचार करणे म्हणजेच वैज्ञानिक निष्ठा. शुध्द श्रध्दा म्हणजे खरी भक्ती आणि सत्याप्रत पोहोचण्याचा मार्ग होय हे विज्ञान सांगते. अशा वैज्ञानिक दृष्टीकोनातून जे, जे लोक वरील अंधश्रध्दा पडताळून पाहतात, त्यांना त्या अंधश्रध्दा कुचकामी वाटतात व वाटतीलही ! असे जेव्हा आपण जागरूक वृत्तीने पाहू तेव्हा, पूर्वजांनी त्या घटनांचे सोयीस्कर अर्थ लावल्याचे दिसते आणि तेच संस्कार पुढील पिढ्यांना झाले. परंतू ज्यांनी ज्यांनी आपल्या आत्म्याचा गुण तेवत ठेवला. त्यांना समाजाचा विरोधही झाला. मार्टिन ल्यूथर किंग, अरिस्टॉटल अशा कितीतरी शास्त्रज्ञांची नावे घेता येतील या विद्वानांनी चालत आलेल्या अंधश्रध्दा तशाच स्विकारल्या असत्या तर आजवरची झालेली प्रगती आणि सुखी झालेले मानवी जीवन तसेच अंधश्रध्देत बुडले असते.

योग्य विचार करणे, इंद्रियांद्वारा कुठलाही अनुभव पडताळून पाहणे यासाठीच परमेश्वराने डोळे, कान, त्वचा, जीभ या चार इंद्रियांबरोबरच पाचवे मन व आत्मा दिलेले असावे. हे आत्मतत्व सतत जागृत ठेवा, हेच विज्ञान सांगते. ''अंतरिचा दिवा मालवू नको रे'' हाच संदेश जणू हे विज्ञान देत असावे. परंतु कुठलीही प्रचिती न घेता जेव्हा आपण दुसऱ्याचे अनुभव जसेच्या तसे स्विकारतो तेव्हा ती अंधश्रध्दाच नव्हे काय ? म्हणूनच नव्या सहस्त्रकात प्रवेश करतांना आपण या अंधश्रध्दा टाकून देवून नव्या वैज्ञानिक दृष्टीने या निसर्गातील अनाकलनीय गूढ सत्ये बघू या ! कदाचित अनेक

खजिने उघडकीस येतील आणि आपल्या सर्वांची प्रगती अधिकाधीक होऊन मानवी जीवन सुखी होईल. कारण विज्ञान हे देवापासून गवसलेले प्रभावी शस्त्रच होय. तिसरा डोळाच तो, जो सांगतो

''योगक्षेमं वहांम्यहम्''

पण अशी ग्वाही अंधश्रध्दा देत नाही, म्हणून यातील सीमा रेषाच ओळखता यायला हव्यात.

'स्वातंत्र्यानंतर....!'

– शिंपी गणेश मुरलीधर
एम. ए. प्रथम (मराठी)

स्वातंत्र्य मिळून पन्नास वर्ष लोटली
गरिबी मात्र झोपडीतच गोठली !
श्रीमंत अधिक श्रीमंत झाले
गरीब आणखीच गरीब झाले !
आभाळात उडणाऱ्या पक्षांना खरं स्वातंत्र्य मिळाले
घामाच्या प्रत्येक थेंबातून रक्त सांडणारे भूमीपूत्र मात्र बेभान झाले !
आठवण राहावी म्हणून हुतात्मा चौक झाले
चौकात मात्र देशद्रोही राहू लागले !
मात्र, पांढरे कपडे घालून किती शुध्दता दाखवाल ?
पापाचा घडा भरला की आपल्याचं खुर्च्यांना रंगवाल !
एकदा बेभान फडकणारा तिरंगा
आपल्याच आधारकडे पाहून निराश झाला !
आता मात्र ....
माणसांना श्वास विकत घ्यावे लागत आहेत
घाणीच्या साम्राज्यात मात्र झाडांना नाश व्हावे लागत आहे !
एकदा प्रेमाने भरलेली आपली नौका
माणसे असूनही निर्मनुष्य झाली !
हिंदुस्थान मात्र भारत झाला
लंका मात्र श्रीलंका झाली !
स्वातंत्र्याची पन्नास वर्षे अशी लोटून गेली
स्वातंत्र्याची पन्नास वर्षे अशी लोटून गेली !

स्वतंत्र भारताचा इतिहास

– कु. भारती रामदास वैष्णव,
एम. ए. द्वितीय (राज्यशास्त्र)

स्वतंत्र भारताचा हा इतिहास आहे,
रामराज्य कसले हे यमराज्य आले
धर्माधांनी देशाचे वाटोळे केले
शांतीचे कबूतर केव्हाच उडाले
गुंडाच्या तोंडात भूखंडाचा घास आहे
शुध्द तुपाला येथल्या गोड्या तेलासा वास आहे
।।१।। स्वतंत्र भारताचा .....
देश कुणाचा काही कळेना
परकियांचा लोंढा टळेना
गरिबांना येथे अन्न मिळेना
आजचा तरूण उदास आहे
बेरोजगारीचा मात्र विकास आहे
।।२।। स्वतंत्र भारताचा .....
नेत्यांमध्ये आज नेताजी नाही
सर्वत्र माजली झोटींगशाही
अश्रू ढाळतेय लोकशाही
चित्र समाजाचे भकास आहे
दोन नंबरचा धंदा झकास आहे
।।३।। स्वतंत्र भारताचा .....
जिथे-तिथे गटबाजी आहे
राजकारण पाजी खेळत आहे
घाल जगदंबे जन्माला पुन्हा शिवाजी
सत्याचाच गळ्याला इथे गळफास आहे
अटळ या देशाचा विनाश आहे
।।४।। स्वतंत्र भारताचा .....
महाभारत इथे रोजच घडते
कौरवांना नित्य धुंदी चढते
वासनेला कुणी बळी पडते
आंधळेपणाचा हा सारा फार्स आहे
भर बाजारात द्रौपदीचा निवास आहे
।।५।। स्वतंत्र भारताचा .....

'या वसुंधरेला वाचवा !'

– मंगेश महाजन
बी.सी.जे.

अलिकडेच ओरिसा राज्याला महाचक्रीवादळाने तडाखा दिला. या वादळात अनेकजण मृत्यूमुखी पडले. हजारो बालके अनाथ झाली. हजारो माणसं बेघर झाली. शेकडो गाव उध्वस्त झाली. या घटनेचा जेव्हा आम्ही गांभिर्याने विचार करतो तेव्हा लक्षात येत की पर्यावरणाची अपरिमित हानी आपण केली, त्याचाच परीणाम म्हणून निसर्ग आमच्यावर कोपला आहे आमच्या देशातच नव्हे तर संपूर्ण जगात अशा अनैसर्गिक घटनांची जणू काही लाटच आली आहे. उदा. मेक्सिको शहराला चक्री वादळाने झोडपून काढलं. कॅनडातील मच्छी माऱ्यांना मासळीत आढळलेला एक अज्ञात रोग, इंडोनेशियाच्या इतिहासात दुर्दैवी घटना म्हणून ज्या घटनेचा उल्लेख करतील तो जंगली कावा.

ज्याच्या नावातच शांतपणा आहे असा प्रशांत महासागर मृत्यूचे तांडव करतोय या साऱ्या घटनांचा आम्ही जेव्हा गांभिर्याने विचार करतो, संशोधन करतो. बारकाईने अभ्यास करतो तेव्हा शास्त्रज्ञांनी दिलेला तो इशारा पुन्हा पुन्हा विचार करायला लावतो. तो इशारा म्हणजे १३ नोव्हेंबर २०२६ रोजी जगाचा अंत होईल. जगात घडणाऱ्या या अनैसर्गिक घटना भविष्यात येणाऱ्या प्रलयाची चाहूल देऊन मानवाला सावधानतेची जाणिव करून देत आहेत. सतर्क राहण्याची जाणीव करून देत आहे. एकंदरीत सावधान मानवा तुझा अंत जवळ आहे आतातरी स्वत:ला जपण्यासाठी वृक्षारोपण कर असे तर सांगत नाही ना !

मानवाने स्वत:च्या स्वार्थासाठी पर्यावरणाचा ऱ्हास केलाय याचे गंभीर परिणाम आम्हाला भोगावे लागतात. ज्या राजस्थान मध्ये पूर्वी चित्तोड, जयपूर जोधपूर वनराईने नटलेला प्रदेश होता, जो प्रदेश शिकाऱ्यांचे नंदनवन म्हणून ओळखला जाई त्या प्रदेशाचा ताबा आता थरच्या वाळवंटानी घेतला आहे. वृक्षतोड अशीच चालू राहीली तर प्रत्येक राष्ट्राचं राजस्थान सारख वाळवंट झाल्याशिवाय राहणार नाही. तसेच प्रत्येक किनारपट्टीला ओरिसा सारखे चक्रीवादळ आल्याशिवाय राहणार नाही.

अरूणाचल प्रदेशाच्या वनसंपत्तीला ग्रहण लागलंय हिमालय जणू एक उघडी टेकडी झालाय काश्मिरच सौंदर्य नष्ट झालंय, महाबळेश्वरचे नैसर्गिक वैभव नाहीस झालयं. मुंबई जवळचे माथेरान भकास होत चाललंय कर्नाटकात अनेक विसन्न वाटेल ती वृक्ष तोडत आहेत. वन संपत्तीने नटलेल्या कोकणात कोकण रेल्वेच्याच साह्याने लाकडी मोळ्या इतरत्र पाठविल्या जातात हिच परिस्थिती जर कायम राहिली तर मानवाचा अंत जवळ आलेला आहे.

परिस्थिती निराशाजनक असली खेदजनक असली तरी अजून वेळ गेलेली नाही. अजूनही परिस्थिती सुधारू शकते. फक्त गरज आहे वनीकरणाच महत्व लक्षात घेण्याची गरज आहे. वृक्ष लागवड करण्याची वृक्ष संवर्धन करण्याची चराईबंदी, कुऱ्हाडबंदी करण्याची प्रत्येकान वनीकरणाचं महत्व लक्षात घेण्याची नदी काढी पडीक जमिनीवर वृक्षारोपण करण्याची, ओसाड जमिनीवर नंदनवन फुलविण्याची, गावात, शहरात औद्योगिक परिसरात इमारतीच्या परिसरात वृक्ष लागवड करण्याची वृक्षाला संरक्षण देण्याची धार्मीक संदर्भ देऊन वृक्ष वाचविण्याची पूजा, अर्चा, सण यासारख्या पतीव्रता सावित्रीचा वड सांभाळण्याची, सीतेच्या अशोक वृक्षाला संरक्षण देण्याची, दत्तात्रेय प्रभूचा औंदूबर वृक्ष लावण्याची, गोपालकृष्णाची तालवन, मधुवन, वृन्दावन, महावन यासारख्या वनांना संरक्षण देण्याची या वनाची जोपासना करण्याची वनस्पती टिकविण्याची गरज आहे. महादेवाला बेल, गणपतीची जास्वंदी, रूख्मिणीचा

पारिजात, शबरीची बोर, संत ज्ञानेश्वरांचा अजनवृक्ष सांभाळण्याची, हे वृक्ष आपल्या परिसरात लावण्याची पर्यावरणाचा ऱ्हास थांबविण्यासाठी गरज आहे. आदिवासींचे पुनर्वसन करण्याची, वनशेतीतून ग्रामविकास साधण्याची, फलोत्पन्न करून विकास साधण्याची युवकांना वनशेतीतून रोजगार उपलब्ध करून देण्याची गरज आहे. प्रत्येक राष्ट्राने जपान सारखी वनसंपत्ती टिकवून राष्ट्रविकास साधण्याची पर्यावरण संरक्षणासाठी जे उपाय राष्ट्रीय पातळीवर चालू आहेत ते तळागाळापर्यंत पोहचविण्याची, पडिक जमिनीवर फुलबाग फुलविण्याचा सानेगुरूजींचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन कृती करण्याची चिपको आंदोलन तळागाळात रूजविण्याची, आपल्या मुला प्रमाणे वृक्षाचे संगोपन करण्याची, बिळोई महिलांचा आदर्श घेण्याची, प्रत्येकाने सुंदरलाल बहुगुणांचे वृक्षप्रेम निर्माण होण्याची, पर्यावरण वृक्षप्रेमी वसंत ठाकरे, प्राणी संरक्षण करणाऱ्या मनेका गांधी, पक्षी रक्षण करणारे डॉ. सलीम अली या सारख्या व्यक्तींची मानवाला स्वत:चे अस्तीत्व टिकवायचे असेल या वसुंधरेला वाचवायचे असेल तर गरज आहे प्रत्येकाने वृक्षरोपण करण्याची, वृक्ष संवर्धन करण्याची.

माझा देश महान आहे

- कु. देवयानी माधव गाढे
एफ.वाय.बी.ए.

गांधी नेहरू टिळकांच्या
आदर्शावर आम्ही चालतो
तरीही भरदिवसा महापुरूषांच्या
पुतळ्यांना चपलांचे हार घालतो
माणुसकीची शिकवण घेतो
तरीही स्त्रियांना जिवंत जाळतो
देवीचे स्थान तिला देतो
आणि तरीही भर चौकात
चाकूचे वार करतो
आणि म्हणतो माझा ....
देशभक्तीची गीते आम्हीच गातो
समानतेची शिकवण घेतो
आणि स्वत: मात्र जातीच्या
नावाने दंगली करतो
तरीही म्हणतो माझा ....
इथल्या मातीला प्रेमाचा सुगंध आहे
नात्यांना मायेची बंधन आहे
तरी स्वत:च्याच बांधवाचे पाय खेचणे
हा आमचा धर्म आहे
आणि तरीही माझा देश महान आहे

स्वप्ने उद्याची

- सुरेश देवरे
एम. ए. प्रथम (मराठी)

मी पाहतोय स्वप्नं उद्याची
होतील का ती खरी ?
अयोध्या, पंजाब व काश्मीर
पेटत आहे भारत मातेचे मंदिर
भ्रष्टाचार बनतोय शिष्टाचार
होतोय महागाईचा भडिमार
वाढतोय लोकसंख्येचा भस्मासूर
तरूणांनो, मिटवा हे प्रश्न मिळुनी सारे
पाहतोय स्वप्ने उद्याची होतील कां ते खरे ?
एकाच मातेचे पुत्र आम्ही
करू मिळुनी तिचे संरक्षण
घेऊ अखंडतेचे दर्शन
व्रतासाठी तन, मन, धन करू अर्पण
मातेच्या तुकड्यापेक्षा तिचे सौभाग्य बरे
पाहतोय स्वप्न उद्याची होतील कां ते खरे ?
येणारा दिवस सौजन्याचा असेल
प्रत्येक भारतीय त्यासाठी झटेल
भेदभाव जातीयतेला थारा नसेल
असे एक सुंदर 'स्वराज्य' वसेल
बांधवांनो, प्रयत्न करूया तुम्ही-आम्ही सारे
पाहतोय स्वप्न उद्याची होतील का ते खरे

स्त्री - काल, आज आणि उद्या

- कु. वृषाली विजय पाठक
प्रथम वर्ष, कला (मराठी)

२० वे शतक संपून २१ व्या शतकाचे जोरदार स्वागत करत असतांना का कोणास ठावूक पण एक प्रश्न सारखा माझ्या मनात घोळत होता. तो प्रश्न अंतर्मूख व विचार करायला लावणारा आहे - खरचं आजची स्त्री स्वतंत्र आहे का ?

पूर्वी वेदकाळात स्त्रिया वेदाध्ययन करतांना दिसतात. तसेच भरसभेत बोलणाऱ्या स्त्रिया मैत्रेयी, गार्गी यांचे उदाहरण देता येईल. नंतरच्या काळात स्त्रियांना देवतेचे स्वरूप देण्यात आले.

''स्त्री ही आदिशक्ती, आदिमाता म्हणून तिची पूजा केली जायची'' पण तिलाच आपण आता पायदळी तुडवितो. उदा. अंबाबाई, पार्वती, भवानीआई इ.

नंतर पुराणकाळात स्त्रिची प्रतिमा ही सत्वशील, पतिव्रता स्त्रीची आहे. तसेच, त्याकाळी मुलींवर खूप बंधने होती. लहान वयातच त्याचं लग्न केल जायचं, तसेच ती बालविधवा झाली की, परत लग्न करण्याचा अधिकार स्त्रिला नव्हता, पण पुरूषांना मात्र दुसरे लग्न करण्याची परवानगी या समाजाने दिली होती. यातच भयंकर आणि नाव काढताच अंगावर काटे आणणारी 'सतीची चाल' ही प्रथासुध्दा आपल्याकडे होती. जिवंतपणी मेलेल्या नवऱ्याबरोबर त्या विस्तवात आपल्याला झोकायचे. ही काही साधी-सुधी गोष्ट नव्हती, आणि त्या बाईने आरडा-ओरड केली तर तिथं ढोल-ताशे इ. वाद्ये वाजवले जाई. यातून सावित्रीबाई, रमाबाई रानडे, आनंदीबाई जोशी यासारख्या महिलांसुध्दा समाजाच्या अत्याचाराला बळी पडल्या.

कृषीसंस्कृतीमधील स्त्रिची प्रतिमा ही माहेरवाशिण, सासुरवाशिण अशी आहे. कारण जन्म झाल्यावर लग्न होईपर्यंत पिता, लग्नानंतर नवरा हा नंतर मुलगा यांचा तिला सतत आधार घ्यावा लागतो.

म्हणूनच कृषीसंस्कृतीमधील स्त्रीया मुलगी न होण्यासाठी देवाची प्रार्थना करीत-

'अस्तुरीचा जल्म, नको घालू श्रीहरी
संवसारी येऊन, परायाची ताबेदारी ।।

कारण जन्मापासून पिता, पती, सासरा, मुलगा यांच्या अधिपत्याखाली राहण्याची समाजाने, कुटुंबाने, धर्माने, रूढीने तिला सक्ती केली होती.

स्त्रीला आपले दु:ख मोकळेपणाने व्यक्त करण्याचाही अधिकार नसावा. यासारखे स्त्रीचे दुर्दैव कोणते ? आपल्या मनातील सुखदु:खाच्या भावनांना मग ती गीताच्या माध्यमातून व्यक्त करते, शब्दांशी जवळीक साधून ती आपल्या भावना गुंफते. शब्दांनाही करूणा यावी, शब्दांनाही पाझर फुटावा अशी दु:खे आपल्या मनात साठवून ठेवते.

महात्मा ज्यो. फुले म्हणतात की, ''भारतीय स्त्री ही पुरूषसत्तेची बंदीवान आहे. तिच्या अनेक प्रकारच्या श्रमाला समाजाकडून योग्य मूल्य दिले जात नाही.''

तसेच, डॉ. आंबेडकराच्या मते, ''जात म्हणजे एक बंदिस्त वर्ग असून जातीसंख्येचा उगम स्त्रियांवर बंधने लादूनच झाला.''

पण आजचं काय ....?

आज परिस्थिती बदललेली आहे, आज स्त्रियांना सुध्दा समान वागणूक दिली जाते असे सांगण्यात येतं, पण खरचं ही वस्तुस्थिती आहे का ?

आज मारे लोक बोलतात की, आम्ही आमच्या मुलांना समान हक्काने वागवतो, तरी घरात मात्र चित्र

वेगळेच पहायला मिळते. एका मुलाला इंजिनिअरींगकडे व मुलीला कॉमर्स किंवा आर्टस्चे शिक्षण देतात आणि मुलगी हुशार असेल तरी ''इंजिनिअर'' होवून काय करणार घरचं सांभाळणार ना ! हे झाले घरातले.

चूल आणि मूल एवढेच क्षेत्र मर्यादीत न ठेवता स्त्री बाहेरच्या जगात पाऊल ठेवते. बाहेरच्या विश्वात ती आत्मविश्वास, आपल्याजवळची क्षमता, ज्ञान यांचा उपयोग कसा करायचा याचा प्रयत्न करते.

पण कामकाजानिमित्त बाहेर जाणाऱ्या स्त्रिला तरी स्वातंत्र्य कुठे ? आज स्त्रिया जरी ऑफीसमध्ये उच्चपदभार सांभाळतात तरी काही वेळा त्यांना मानाची वागणूक दिली जात नाही. महत्वाची कामे स्त्रियांना नाकारतात.

आपण रोज पेपरमध्ये सुनेला होणारा सासुरवास किंवा हुंडाबळी इ. बातम्या वाचतो तसेच शिकलेल्या मुलींना अजुनसुध्दा स्वतंत्र असा ठामपणे विचार मांडण्याची मुभा या समाजात नाही. मोठ-मोठ्या शहरांमध्ये स्त्री-मुक्ती चळवळीसारख्या संघटना आहेत. पण किती जणी स्त्रीयांच्या हक्काबाबत त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराबाबत आवाज उठवतात ? नावापुरती निघालेली महिला मंडळाची स्थिती काही वेगळी नाही. इथे येणाऱ्या बायकांना आपल्या साड्या, मोटार, आपली श्रीमंती याचं कौतुक असून तेवढ्यातच त्याच विश्व असतं.

२० व्या शतकातील प्रत्येक क्षेत्रात स्त्रीचे वेगळे रूप बघायला मिळाले. मग ते सामाजिक असो किंवा राजकीय उदा. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी, सुषमा स्वराज, नर्मदा बचाव आंदोलनाच्या मेधा पाटकर, भारताची गान कोकीळा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लता मंगेशकर असो किंवा 'बुकर' पारितोषिक विजेत्या अरूंधती रॉय.

जगात भारतीय स्त्रीचे सौंदर्य श्रेष्ठ आहे. ""Miss World" चा किताब मिळवणारी ऐश्वर्या रॉय, डायना हेडन व आताची युक्ता मुखी यासारख्यांनी आपल्या बुध्दीच्या व सौंदर्याच्या जोरावर अख्या जगाला वेड लावले.

२१ व्या शतकातील स्त्रीची प्रतिमा ही स्वतंत्र विचाराची, आपल्या हक्कांसाठी लढणारी, पुरूषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात काम करणारी, ताठ मानेने वावरणारी, मी ही एक माणूसच आहे अशी सांगणारी अशी असेल.

त्यामुळे तिला समान हक्क देवून, भेदभाव न करता तिच्या अस्तित्वाची दखल घ्यायला हवी, तसेच स्त्री अबला नसून ती सबला झाली आहे. ती स्व:ताच्या संरक्षणासाठी झटायला, प्रतिकार करायला व आलेल्या समस्येवर धैर्याने सामारे जाण्याची ताकद आता तिच्या मनगटात आली आहे हे विचारात घ्यावे.

यापुढेही ती 'प्रेममूर्ती', करूणा, वात्सल्य प्रेरणा असलेली त्यागीवृत्तीची, घरासाठी झटणारी अशी एक प्रतिमा असेल.


८ मार्चला आपण जागतिक महिलादिन साजरा करतो. पण किती प्रमाणात आपण तिला माणूसकीच्या दृष्टिकोनातून बघतो, किती अंशी तिचा विचार करतो, असे प्रत्येकाने मनात आणले तर स्त्री-कडे बघण्याचा नविन दृष्टिकोन तयार होईल. त्या दिवसांपासून स्त्रीसाठी येणारा प्रत्येक दिवस जणू तिच्या आयुष्यात महिलादिन म्हणून साजरा होईल.

चारित्र्य-निर्मिती हे शिक्षणाचे मुख्य अंग आहे. पण या गुणांच्या जोपासनेत जोपर्यंत भगिनींचे सहकार्य मिळत नाही तोपर्यंत तो समाज कर्धीही वर येणार नाही.

-महात्मा गांधी



कार्यानुभव योजना - शुभारंभ सोहळ्याप्रसंगी द्विप प्रज्वलन करतांना मान्यवर



विधानसभा निवडणूक पूर्व-जनमत सर्वेक्षण चाचणी अहवालाचे प्रकाशन करतांना. जिल्हा माहिती व संपर्क अधिकारी श्री. गणेश मुळे.



कॉलेज वृत्त विद्या विभाग शैक्षणिक साहित्य, दिल्ली



आंतरविद्यापीठ युवा संसद स्पर्धेसाठी साकारलेली अभिरूप संसद



आंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेचे उद्घाटन करताना श्री. अजीज अन्सारी (उप निदेशक जळगाव आकाशवाणी)



आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा-२०१० बक्षीस वितरण समारोहाच्या प्रमुख अतिथी व माजी विद्यार्थी श्री. विजय वाघोलकर मुख्य संपादक दै. लोकमत



संस्कृत विभाग

।। आ नो भद्राः कृतवो यन्तु विश्वतः ।।

– ऋग्वेद

आत्मशक्त्यैव देशस्य रक्षा भवति ना न्यतः।
इति बोधयते नित्यं कालिदासस्य भारती।।

विपक्ष
कु. चैताली अरुण डांगरीकर
अखिल भारतीय कालिदास महोत्सव (उज्जैन)
वादविवाद स्पर्धा (स्वर्णपदक पारितोषिक)

अयि मान्याः विद्वद्वरेण्याः,

'आत्मशक्त्यैव देशस्य रक्षा', किन्तु का नाम आत्मशक्तिः ? आत्मनि प्रत्ययं चेतः, उत वा अप्रत्ययं चेतः ? आम्, सम्यग् ज्ञातम् भवता मम प्रतिपादनविषयसारम्। यत् 'बलवदपि शिक्षितानाम् आत्मनि अप्रत्ययं चेतः' इति कथयमानस्य सशङ्कस्य कालिदासस्य प्रयत्नाः तु विदुषां परितोषाय। तद्विपरीतः भवभूतिः तु आत्मविश्वासेन प्रारम्भे एव गर्जति, 'कालो हि अयं निरवधिः विपुला च पृथ्वी'।

आत्मशक्त्या देशस्य रक्षा भवति वा न वा। इति तु अन्यः एव विषयः। कालिदासस्य भारत्या तादृशः बोधः समासादयितव्यः तर्हि मया नाम मुग्धचातकेन शुष्कघनगर्जिते अन्तरिक्षे जलपानम् इष्टम्।

कालिदासस्य 'आ परितोषाद्' नाम्नीं विचारधारां अनुसरन्तः कानिचन राष्ट्राणि ''अमेरिकादिकान् महतः कानिचन राष्ट्राणि अनुनयन्ति।

''अमेरिकेश्वरो वा रशियेश्वरो वा यः मनोरथान् पूरयितुं समर्थः। अन्यैर्नृपालैः परिदीयमानं शाकाय वा स्यात् लवणाय वा स्यात्''। एतादृशाः आत्मशक्ति - विरहिताः संजाताः।

कुत्र ते कारगिलस्थाः प्रत्यहं रक्षायोगाद् तपः संचिन्वानः सैनिकाः कुत्र वा 'किल अव्याजमनोहरा कालिदासगिरा।' याम् तपःक्षमं साधयितुं यः प्रभवति ध्रुवं स....।

कीदृशाः कालिदासस्य नायकाः ? अभिनव - मदलोलुपाः स्त्रीरत्नपरिभोगिनः। मदनः तान् अनिशं दहत्येव। यत्र कुत्र अनाघ्रातं पुष्पं दृश्यते इमे जनाः तत्र संगमोत्सुकाः तिष्ठन्ति एव। 'किं नु खलु यथा वयम् अस्याम्, इयम् अपि अस्मान् प्रति स्यात् ?' इति चिन्तायाम् निमग्नस्य राज्ञः अनन्यपरायणा दृष्टिः कृतिनं मधुकरम् असूयया पश्यन्ती एव।

'भूयिष्ठा अन्यविषया राज्यविषया न तु दृष्टिः' अस्य। कच्चिदुपेयोपायदर्शने व्यापृतं तस्य प्रज्ञाचक्षुः ?

मदनबाणहताः ते नायकाः कथं वज्रसारशरान् निपातयेरन्। शकुंतलाव्यापारात् आत्मानं निवर्तयितुं यः न शक्नोति तस्य राज्ञः नगरगमनं प्रति मन्दौत्सुक्येन एव भवितव्यम्। ''यदि राज्यकार्येषु अपि ईदृशी उपायनिपुणता आर्यपुत्रस्य तदि शोभनं भवेत्।'' इति नायकस्य देवी स्वयमेव कथयति, न अहम्।

अस्तु नायकानां कथा। कीदृश्यः वा नायिकाः ? हस्ते लीलाकमलमलके बालकुन्दानुविध्दाः। किं कुर्वन्ति ? आसेवन्ते मधुरतिफलम्। मदनक्लिष्टा, पर्याकुला, कातरीभूता, मधुकरेण अपि अभिभूयमाना किं वक्ष्यति ? ''नाथ, मां पराधीनां त्वयि गणय सतृष्णाम्।'' इति। अहो, यस्याः कस्याः भयेन, आत्मनः अपि प्रियं कर्तुं या न शक्नोति, सा स्त्री आधुनिके काले देशरक्षणार्थं विमानयानं अपि संचालयितुं सज्ञायाः स्त्रियः प्रति नैव आदर्शा भवेत्।

स्वामिनी, शक्तिमती, युयुत्सुः स्वतंत्रप्रज्ञा च स्त्री कालिदासस्य वाङ्मये कुत्र दृश्यते ? तत्र तु 'तन्वी श्यामा शिखरिदशना पक्वबिम्बाधरा मधुरा' एव दृश्यते। अत्र स्मर्यते भासः, तेन प्रतिमानाटके दर्शिता च कैकयी।

यस्याः आत्मसामर्थ्यम् ईदृशं महत्तरम्-यत् सा स्वामिघातिनी इति जनापवादः अपि सोदुम् शक्ता। ''आत्मानमात्मना यास्तु रक्षेयुस्ताः सुरक्षिताः।'' इति मनुना उक्तम्। न कालिदासेन।

पश्यतु भोः, कालिदासः तु कविताकामिन्याः विलासः। मन्दहासः न तु अट्टहासः। तर्हि चण्डमुण्डमथनी रक्तबीजाशनी, शुम्भनिशुम्भदैत्यदलिनी तस्य वाङ्मये कथं लभ्येत ? सा कालि तु तस्य नाम्नि एव अवशेषीभूता।

अस्तु, इतरे जनाः कीदृशाः ? ''ईदृशं नाम सुखोपनतं रूपं दृष्ट्वा को अन्यो विचारयति'' इति वक्ष्यमाणाः उत वा मोदकखादिकायां नाम अनायासे कर्मणि रममाणाः। च्युतकलिकां दृष्ट्वा तैः विभ्रमगीतं गायनीयम्। आत्मरक्षा, देशरक्षा नाम महतः विषयस्य परिकल्पना कथं करणीया ?

कालिदासस्य साहित्ये सर्वदा मधुमासः। तदपि पञ्चपञ्चाश्यधिकान् शरान् गृहीत्वा संचरति। तत्र अस्माभिः न व्याघ्रः अपि तु शृङ्गे कृष्णमृगस्य वामनयनम् कण्डूयमाना मृगी द्रष्टव्या। तेन मम अवस्था तु अर्कस्य उपरि शिथिलं च्युतमिव नवमल्लिकाकुसुमसदृशी भूता। अक्षिणी आकुलीकृत्य संदर्भान् अन्वेष्यन्ती अहम् अङ्गभङ्गविकला इव भूता, परम् अद्यापि तस्य 'ताम्' एव चिन्तयतोः अक्ष्णोः प्रभातम् आसीत्।

अधुना कालिदासकलाकृतीनां गणनाप्रसङ्गः आगतः। कतिपयाः ताः- सप्त। तत्र शृङ्गारपूर्णानि त्रीणि नाटकानि एकं च खण्डकाव्यम्। अपरं खण्डकाव्यं तु निसर्गवर्णनपरम्। पञ्चभिः कलाकृतिभिः अस्माकं प्रतिपाद्यविषयः तु पञ्चत्वम् एव नीतः। अहो यस्मिन् देशे एकेनापि मतेन राज्यं पातितं तत्र पञ्चपञ्चानाम् समूहः किं किं न कारयेत्। अस्तु, द्वे महाकाव्ये पश्यामः- तारकविनाशार्थम् कुमारसंभवं वर्णयितुं। उद्युक्तः कालिदासः तत्र शिवशक्त्योः मीलनस्य, तेषां शृङ्गारस्य समग्रवर्णनपरः संजातः। अधुना कनिष्ठिकाधिष्ठितः रघुवंशः। तत्र तु प्रथमग्रासे एव मक्षिकापातः। ''भुजार्जितानां दिगन्तसंपदाम्।'' इति वर्णिताः ते राजानः ऋषिं कथयन्ति-

''उपपन्नं ननु शिवम् सप्तस्वङ्गेषु यस्य मे।

दैवीनाम् मानुषीणाम् च प्रतिहर्ता त्वमापदाम्।।''

आत्मनः प्रयत्नानां विपाकः तैः राज्ञैः स्वीक्रियते किम् ? अहो, प्रजानाम् विनयाधाने रक्षणे न तेषां किमपि किमपि योगदानम्। किं ब्रह्मवर्चसम् एव श्रेष्ठम्, न प्रशासनकौशलम्। यस्मिन् राज्ञि अखिलं राज्यम् आयत्तम् सः एव पुत्रप्राप्त्यर्थम् ''स्थितः स्थितामुच्चलितः प्रयातां निषेदुषीमासनबन्धधीरः।'' एतादृशः धेन्वानुयायी संजातः। तस्याः धेनोः गर्भनलिका शिशुः इव का अपि तन्त्रशक्तिः अस्ति किं नाहं जाने।

अमात्येषु राज्यधुरं निवेषयन्तः सखिविलपने निमग्नाः ते राजानः यत्र दृश्यन्ते तत्रैव ''अपि स्वदेहात् किमुतेन्द्रियार्थात्'' इति वक्ष्यमाणः रामः अपि दृश्यते। भोः, कालिदासेन अस्माकम् आदर्शस्य राज्ञः सीता केवलं इन्द्रियार्था गृहीता ? द्वे प्रतिष्ठे कुलस्य मे इति श्रुतपूर्वम्। तर्हि यशोधनानाम् नृपाणाम् उपभोग्य-वस्तुरूपाः इति एव स्त्रियः प्रतिष्ठा।

आधुनिकं युध्दं वियति बहुतरं स्तोकमुर्व्यां प्रयाति। अतः तंत्रज्ञानं विज्ञानम् अद्य अतीव महत्त्वपूर्णं खलु। न पुराणकाले रन्तव्यम्।

''व्रजन्ति ते मूढधियः पराभवम्

भवन्ति मायाविषु ये न मायिनः। एतत् वक्ष्यमाणः भारविः अस्मान् शस्त्रशास्त्रसंभृतम् भवतु इत्यर्थे उपदिशति।

न अत्यन्तं सरलैः-भाव्यम् अधुना। यत् 'वनं हि रक्षते व्याघ्रैः।' एतादृशं कौटिल्यादीनां मन्वादिनां भारवेः च साहित्यं दृष्ट्वा अमुम् विषयम् अधिकृत्य कालिदासीयान् अपि विचारान् ज्ञातुं मम कौतूहलं प्रथम सपरिवाहम् आसीत् इदानीम् तु अङ्गैरनङ्गतप्तैः तेषां वृत्तान्तेन बिन्दुरपि न अवशिष्टः।

अस्तु कालिदासगिरा शरीरनिर्वापयित्री शारदी ज्योत्स्ना। तस्याः गिरायाः सारम् सुकुमारं सौन्दर्यान्वेषित्वे माधुर्ये एव भवेत्। अतः तदनुरूपं शृङ्गारः एव तस्मै रोचते।

आत्मशक्त्यैव राष्ट्रस्य रक्षा भवति नान्यतः।
इति बोधयते नित्यं कालिदासस्य भारती।।

सपक्ष
कु. दीप्ती नरेन्द्र रेंभोटकर
तृतीय वर्ष कला शाखा (स्पे. संस्कृत)
उज्जैन कालिदास महोत्सव
अखिल भारतीय संस्कृत वादविवाद स्पर्धा

नयविदिर्न दासे कालौ सदसच्चोपदर्शितम् पूर्वं एव भवतु पक्षः तस्मिन्न न भवेत् उत्तरः। अतः 'आत्मशक्त्यैव भवति राष्ट्रस्य रक्षणम्।' इति बोधयति कालिदासः नित्यम् इति अहं मन्ये। सौहार्दप्रसारितकरौ एकतः स्वीकृत्य अन्यतः कारगिल-प्रांते आक्रमकान् प्रेष्यता नवाझ शरीफ महोदयेन वंचिताः वयं जनाः। क्षोभोद्वेगे संजातेऽपि सीमारेखापावित्र्यम् नोल्लंघितमस्माभिः। प्रतिकूलायाम् अपि परिस्थित्याम् भारतीयया सेनया प्रदर्शितम् युयुत्सुत्वं तथा च धृतिसंयमौ दृष्ट्वा स्मराम्यहम् कालिदासोक्तिद्वयं-

ज्वलति चलितेन्धनोऽ ग्निर्विप्रकृतः पन्नगः फणां कुरुते।

प्रायः स्वं महिमानं क्षोभात् प्रतिपद्यते हि जनः।।

तथा च-रेखामात्रमपि क्षुण्णादामनोवर्त्मनः परम्।

न व्यतीयुः प्रजास्तस्य नियन्तुर्नेमिवृत्तयः।।

अत्र विद्यमानां अस्थिरां राजकीयां परिस्थितिं दृष्ट्वा धाष्ट्यमेवाचरितम् शरीफ महोदयेन। 'अचिराधिष्ठित-राज्यः शत्रुः प्रकृतिष्वरूढमूलत्वात् समुध्दर्तुम् सुकरः इति धिया प्रतिकूलाचरितानाम् तेषाम् समुन्मूलनम् संकल्पितम् भारतीयशासनेन। 'हनिष्यति वध्यम् रक्ष्यम् रक्षिष्यति' भारतीय सेना आत्तधन्वानम् दुष्यन्तं न स्मारयति किम् ? 'कः पौरवे वसुमतिम् शासति शासितरि दुर्विनीतानाम्' इति आत्मविश्वासेन गर्जयन् दुष्यन्तः,' कथं कार्यविनिमयेन मयि व्यवहरति अनात्मज्ञः' इति पृच्छन् अग्निमित्रः उत वा 'राजा कालस्य कारणम्' इति जानन् पुरूरवा वा कालिदासस्य नायकः।

आत्मशक्ति-परिपूरितान् तान् उपस्थितसंपरायो महेन्द्रोऽपि आनाकरथवर्त्मनाम् रघूणाम् अन्वयं कालिदासः वर्णयति।

केन हेतुना ?-

सर्वातिरिक्तसारेण सर्वतेजोभिभाविना।

स्थितः सर्वोन्नतेनोर्वीं क्रान्त्वा मेरुरिवात्मना।।

कीदृशी तेषाम् शरीरसंपद्-'आत्मकर्मक्षमं' देहं क्षात्रो धर्म इवाश्रितः' आकारसदृशा प्रज्ञा तैः धार्यते। यदि शास्त्रेष्वकुण्ठिता बुध्दिर्मौर्वी धनुषि चातता तर्हि अर्थसाधनम् सन्निहितम् एव इति विचारम् प्रदर्शयिता कालिदासः आत्मशक्तिः नाम केवला शस्त्रशक्तिः इति नैव मन्यते।

'अजस्रदीक्षाप्रयतः सः मद्गुरुः क्रतोरशेषेण फलेन युज्यताम्' इति इन्द्रं प्रार्थयति रघुः। आत्मशक्तिः नाम वीर्यातिशित्वं च वागर्थप्रतिपत्तिः च। यथा जसवंतसिंह-महोदयेन अमेरिकादयः देशाः सम्यक्तया प्रबोधिताः। अस्माकम् पक्षप्रतिपादनेन शत्रुराष्ट्रम् एकाकिनम् कृतवन्तः परराष्ट्रनीतिज्ञः। आत्मशक्तिः नाम मैत्रशक्तिः ब्रह्मवर्चसमपि।

प्रगततंत्रज्ञानाधीना आधुनिकी देशरक्षा। अस्माभिरपि अणुस्फोटाः करणीयाः न वा इति संदेहपदे वस्तुनि अंतःकरणप्रवृत्तयः प्रमाणीभूताः। आत्मशक्तिः नाम

निर्णयशक्तिरपि। अतः 'जुगोप आत्मानम् अत्रस्तः।' इति न्यायेन वा 'स्ववीर्यगुप्ता हि मनोःप्रसूतिः' इति उदाहरणात् वा अस्माभिः सामर्थ्यं वर्धयितुम् तंत्रज्ञानं स्वप्रज्ञया संपादयितुम् प्रयत्नाः पारिताः। आत्मबलेनैव आर्थिकनिर्बंधविषयेऽपि समर्थितः आपत्प्रतीकारः।

आत्मशक्त्या स्वकर्मणि कर्तव्यपरायणत्वं अपेक्ष्यते। कर्तव्यविषये जागरूकत्वं अपेक्ष्यते। अतः एव आत्मनिमग्नः दुष्यन्तः 'ममापि सत्त्वैरभिभूयन्ते ग्रहा इति परिदेवयति।

''अहन्यहन्यात्मन एव तावज्ज्ञातुं प्रमादस्खलितं न शक्यम्।

प्रजासु कः केन पथा प्रयातीत्यशेषतो वेदितुमस्ति शक्तिः।।''

इति येन राज्ञा ज्ञायते तत्र पर्यवस्थापनं सुलभम्। स्वाधिकारात् प्रमत्तत्वं पराधीनवृत्तित्वं आह्वयति। महिमानं अस्तं गामयति। प्रकृतिकृपणत्वं वर्जनीयं चेत् तर्हि जागरूकत्त्वेन भवितव्यम् इति कालिदासः न बोधयति किम् ? आत्मशक्तिपरिपूर्णाः रघुवंशिनः राजानः तथा च कर्तव्यपराङ्मुखः यक्षः द्वावपि चित्रितौ कालिदासेन सकारनकारात्मकौ। आत्मशक्तिः एव राष्ट्रस्य कारणम् बन्धमोक्षयोः। अतः 'रिक्तः सर्वो भवति हि लघुः पूर्णता गौरवाय' इति कथयता कालिदासेन पूर्णतासम्पादनार्थम् प्रयत्नः सूचितः।

राष्ट्ररक्षा न केवला चतुरंगसेनायत्ता। प्रत्येकेनापि नागरिकेन आत्मसम्मानपरिपूर्णेन भाव्यम्। 'न माम् देवी समानविद्यतः परिभावनीयम् अनुमन्तुम् अर्हति' इति वदतः नृत्याचार्यः वा 'अयि, राज्ञीशब्दभाजनम् आत्मानम् अपि तावत् चिन्तयतु भवती' इति बोधयति परिव्राजिका वा स्वोपात्ते कर्मणि सत्य-संधानपरत्त्वं आत्मशक्तिं द्रढयति। सामान्यः धीवरः अपि तया शक्त्या 'नार्हति भावो अकारणमारणो भवितुम्' इति प्रत्युत्तरति।

'मुक्तसाध्वसा सत्त्वस्था भव' अत्र सत्त्वस्था भव नाम किम् ? आत्मशक्तेः सामर्थ्यम् ज्ञात्वा अप्रमत्तेन भवितव्यम् इति एव ननु।

राज्ञा अवधीरतायाः तपोवनसंवर्धितायाः शकुंतलायाः अकैतवः कोपः राजानम् अपि संदिग्धबुद्धिं करोति। स्वराजधान्याम् सदसि स्थिते प्रथितचरितम् अपि राजानम् अनार्य इति संबोधयति। आत्मनो हृदयानुमानेन प्रेक्षसे इति अधिक्षिपति। कः इदानीम् अन्यो धर्मकञ्चुकिनस्तृणच्छन्नकूपोपमस्य तवानुकृतिं प्रतिपत्स्यते। इत्यपि गिरा तया निसृता। मधुकरेण अभिभूयमाना सा आपत्काले सत्त्वस्य सम्यक् प्रदर्शनम् करोति। 'उच्यताम् मद्वचनात् स राजा' इति परित्यक्ता मनस्विनी सीता सन्देशम् प्रेषयति।

तथा हि शीलमुदारदर्शने तपस्विनाम् अप्युपदिश्यताम् गतम् इति वर्णिता पार्वती। समाधिमास्थाय तपोभिरात्मनः अवध्यरूपताम् कर्तुम् इच्छती। फलोदयौयैव तपःसमाधये आत्मनः अरण्यनिवासनम् याचती पार्वती। मनस्विनी स्थिरचित्ता आहार्यनिश्चया पार्वती स्वशरीरमार्दवम् अनपेक्षमाणा, मुनीनाम् चरितम् गायती पार्वती, 'आत्मनः काञ्चनपद्मनिर्मितम् प्रकृत्या मृदु वपुः ससारम्' इति सिध्दम् करोति। ममात्र भावैकरसम् मनः स्थितम् इति आत्मनः स्थिरबुध्देः प्रत्ययः ददाति। उच्चैः पदलङ्घनोत्सुकानाम् तपः एव अवाप्तिसाधनम् इति पार्वती प्रेरयति। कः ''इप्सितार्थात् स्थिरनिश्चयम् मनः पयश्च निम्नाभिमुखम् प्रतीपयेत् ?''

पदे पदे कालिदासस्य साहित्ये वीरतायाः गौरवः दृश्यते। गंगा नाम सगरतनयस्वर्गसोपानपंक्तिः तत्र। आत्मशक्तिप्रेरितस्य भगीरथस्य भगीरथप्रयत्नानाम् च अयम् गौरवपूर्णोल्लेखः इति मन्ये। तथापि लोलापाङ्गैरेव कालिदासः रमते इति प्रतिपादयन्तः प्रतिस्पर्धिनः शृंगारात् भिन्नम् न कालिदासकाव्यम् इति आक्षिपन्ति।

निपुणम् उपक्रान्तम्। स्थाने खलु सज्जति दृष्टिः तेषाम्। अस्तु, परम् तस्मिन्नपि काव्ये क्षुद्रैः अतिक्रमणम् न सहते सः। संदिशति च-ते

ये संरम्भोत्पनरभसाः स्वाङ्गभङ्गाय तस्मिन्

मुक्ताध्वानं सपदि शरभा लङ्घययेयुर्भवन्तम्।
तान्कुर्वीथास्तुमुलकरकावृष्टिपातावकीर्णान्
के वा न स्युः परिभवफला निष्फलारम्भयत्नाः।।

अत्र अहं तु चिन्तयामि अस्तु शृंगारोऽपि का वा हानिः ?

सुसंपन्नम् शांतिपूर्णं जीवनम् यत्र तत्रैव विलासावसरः।
स्फोटकीभूतायाम् परिस्थित्याम् को वा शृंगाराय प्रभवेत् ?

ताम् हर्तुम् विबुधद्विषोऽपि न च मे शक्ताः पुरोवर्तिनीम्, इति आत्मविश्वासः यस्मिन् सः एव राजर्षिः अमात्येषु निवेशित- राज्यधुरा गन्धमादनवनम् विहर्तुं प्रभवति। तस्मिन् राज्ये नित्यज्योत्स्नाः प्रतिहततमोवृत्तिरम्याः प्रदोषाः भवेयुः इति किमत्र चित्रम्। भोः प्रतिस्पर्धिजनाः अंतःशुध्दस्त्वम् अपि भविता इतो दृष्टिः देया। उत वा सन्मार्गलोकनाय व्यपनयतु स वस्तामसीम् वृत्तिम् ईशः।।

न कश्चिदपि जानाति किं कस्य श्वो भविष्यति।
अतः श्वः करणीयानि कुर्यादद्यैव बुध्दिमान्।।

पढतो नास्ति मूर्खत्वं जपतो नास्ति पातकम्।
मौनिनः कल हो नास्ति न भयं चास्ति जाग्रतः।।

षड् दोषाः पुरुषेणेह हातव्या भूतिमिच्छता।
निद्रा तन्द्रा भयं क्रोध आलस्यं दीर्घसूत्रता।।

अन्नदानं परं दानं विद्यादानमतः परम्।
अन्नेन क्षणिका तृप्तिर्यावज्जीवं च विद्यया।।

सम्पूर्णकुम्भो न करोति शब्दम्
अर्धी घटो घोषमुपैति नूनम्।
विद्वान कुलीनो न करोति गर्वम्
जल्पन्ति मूढास्तु गुणैर्विशनाः।

नागुणी गुणिनं वेत्ति गुणी गुणिषु मत्सरी।
गुणी च गुणरागी च विरलः सरलो जनः।।

अक्रोधेन जयेत् क्रोधम् असाधुं साधुना जयेत्।
जयेत् कदर्थं दानेन सत्येनालोकवादिनम्।।

गणतन्त्रम् विजयताम्।

योगिता अत्तरदे
द्वितीय वर्ष कला

अयि मान्याः, विद्वतवरेण्याः, एकं सुभाषितं प्रस्तौमि।

''ऊर्णा नैष ददाति, नापि विषयो वाहस्य दोहस्य वा

तृप्तिर् नास्य महोदरस्य बहुशः घासैः पलायैः अपि।

हा कष्टम् ! कथमस्य पृष्ठशिखरे गोणी समारोप्यते ?

को गृह्णाति कपर्दकैः अमुमिति ग्राम्यैः गजो हास्यते।।''

गजवत् गणतन्त्रस्य अपि। महिमा यैः न ज्ञायते तैः एव गणतन्त्रम् उपहास्यते।

गणतन्त्रं नाम लोकानाम् राज्यम्, प्रजानाम् राज्यम्, नागरिकाणां राज्यम्। गणो नाम समूहः। कात्यायनः व्याख्याम् ददाति, 'कुलानाम् हि समूहस्तु गणः संपरिकीर्तितः। अद्यतनीयाम् लोकसत्ताक - राज्यपध्दत्याम् व्यक्तिस्वातंत्रस्य कल्पना अपि समाविष्टा, स्वीकृता अभिप्रेता किल। प्रजासत्ताकं नाम, न वा राज-प्रधानम् नैव हिटलरवत् आज्ञाप्रधानम्, अपि तु यत्र लोकनियुक्तः राष्ट्रप्रमुखः वर्तते तद् राज्यम्। गौतम बुध्दः आदर्शगणराज्यस्य सप्त प्रमुखान्, गुणान् वर्णयति। सः वदति, यावत् कालपर्यन्तम् एतानि पथ्यानि आचरितानि तावत् पर्यन्तम् लिच्छवीनाम् लोकसभा नियमेन सम्मिलति वारंवारं संमिलेत् तावत् पर्यन्तम् तस्याः सभायाः सभासदाः एकचित्तेन हृदयेन इव मंत्रितत्वात् राज्यप्रशासनं अकुर्वन् यावत् पर्यन्तम् वृध्दानाम्, अनुभविनाम्, योग्यानाम्, नेतृणां प्रति आदरम् प्रदर्शयित्वा तेषाम् मतानुसारेण आचरणं क्रियते तथा च क्षुद्रं, स्वार्थं, मानापमानं त्यक्त्वा तावत् पर्यन्तम् लिच्छवीनाम् प्रजातन्त्रम् शक्तिशाली स्यात्। तद् विपरीतम् चेत् तदा प्रजातन्त्रम् विनश्येत् एव इति गौतम बुध्दः अवदत्।

स्वातंत्र्यात् अनन्तरम् अस्माभिः तादृश्याः लोकसत्ताकपद्धत्याः स्वीकारः कृतः यत्र राजा कालस्य कारणं न भवति। तदा एषा प्रशासनपद्धतिः पारदर्शिका तथा च सर्वोत्तमा इति जनाः अमन्यन्त। इतरत्र यशस्वीभूतायाः अस्याः पध्दत्याः अंगीकारस्य निर्णयं अधुना अस्माभिः पुनरेकवारं विचारणीयः इति परिस्थितिः दृश्यते। यत् अस्याम् व्यवस्थायाम् वर्तमानाः त्रुट्यः प्रदर्शिताः भारतवर्षेण।

यद्यपि वेदवाङमये वर्तमानाः सभा, समिति, विद्वत् इत्यादयः शब्दप्रयोगाः प्रजासत्तायाः बीजं प्रदर्शयन्ति तथापि अत्र, लोकप्रशासनस्य पूर्वपरंपराः विद्यमानाः नासन्। उत वा खण्डिताः आसन्। भारतवर्षे प्रजासत्ताकस्य प्रसारदृष्ट्या बहवः समस्याः आसन्। ईदृशी पध्दतिः अन्नप्रश्नं दूरीकर्तुम् नैव समर्था भवेत् इति। आर्थिकी विषमता सामाजिकवास्तवम् क्लिष्टं करोति। अतः तत्र बहुक्लिष्टम् आव्हानं आसीत् अस्माकं पुरतः।

प्रजासत्ताकपध्दत्याः या व्याख्या प्रदत्ता वर्तते, तेन मानदण्डेन विचार्य सद्यःस्थितिः कीदृशी ? इति वयं कालेकाले अनुभवामः। सर्वसामान्यायाः जनतायाः हितस्य रक्षणम् कस्मिन् स्तरे वर्तते तद् तु ज्ञायते एव जनताम् प्रति कियती मात्रा न्यायस्य प्रदास्यते उत न जनैः अपि आत्मनः कर्तव्यम् वा उत्तरदायित्वम् च सम्यक्तया परिपाल्यते वा ? सार्वजनिके जीवने नागरिकरूपेण परिचरति सति मानवैः कीदृशानां नीतिमूल्यानाम् परिपालनम् क्रियते सः तु संशोधनस्य एव विषयः।

घटनात्मकदृष्ट्या अत्रस्था जनता आत्मनः प्रतिनिधिद्वारा प्रशासनं पश्यति। स तु जनतायाः अधिकारः एव। सर्वश्रेष्ठा इयम् जनता राज्यकर्तृन् प्रति तेषाम् कर्तव्यविषये प्रश्नम् कर्तुम् शक्नोति। अस्माकं घटनासमित्या बहूनां देशानाम्, राज्यघटनानाम् अभ्यासं कृत्वा, अगाधविचारविमर्शं कृत्वा, जनानाम् प्रतिक्रियाः याचित्वा, अनन्तरं स्वीकृता एषा राज्यघटना आदर्शा राज्यघटना इति। या लोकानाम् समन्वयस्य, कठोरतायाः तथा मृदुतायाः च संगमः।

येन देशेन स्वातंत्र्यम् लब्ध्वा पञ्चाशत् वर्षाणि व्यतीतानि तस्य देशस्य कीदृशी अद्य परिस्थितिः ? कोट्यावधीनाम् नागरिकाणां वनवासिनं जीवनम् उपोषणं, कुषोषणं वा ? ईदृशः एव किम् प्रजासत्ताकस्य अर्थः ? विकासपथि मार्गक्रमणा यदि कांक्ष्यते तर्हि सुस्थिरम् सक्षमं प्रशासनम् आवश्यकम्। अद्य तु यद् वा तद् वा भविष्यति प्रशासनम्। सत्तासंघर्षः तु सम्यक्तया परिपाल्यते।

कस्मिंश्चित् दिने अमेरिका देशे विद्यमानायाः प्रशासनपद्धत्याः विवरणवार्ता मया पठिता। तदनुसारम् तस्मिन् देशे सर्वसामान्यानाम् जनानाम् अधिकाराणाम् संरक्षणविषये प्रशासकीया यंत्रणा एव अधिका जागरूका वर्तते इति। यदि केन अपि कारणेन कस्य अपि नागरिकस्य अधिकाराणाम् संकोचः भवेत्, हानिः भवेत् तर्हि प्रकरणम् न्यायालये गच्छति। प्रशासनेन दण्डरूपेण नागरिकान् प्रदत्तस्य धनस्य मात्राम् दृष्ट्वा, प्रशासनम् एव अधुना जागरूकम् अभूत्। कुत्रापि कस्य अपि अधिकाराणाम् हानिः न भवेत् इति चिन्ता प्रशासनेन एव क्रियते। तत्र यातायातपद्धतिविषयकम् 'रोड ट्रान्स्पोर्ट' इति तथा च संरक्षणस्य तत्परा व्यवस्था इत्यादिविषयकम् अस्माभिः वारंवारं पठितम् एव। यद्यपि तत्र चौर्यादीनाम्, बलात्कारादीनाम्, घटनानाम् प्रमाणम् बहु वर्तते तथापि तत्रस्थायाः जनतायाः कृते मूलभूतानाम् आवश्यकतानाम् कृते संघर्षः न करणीयः भवति इत्यपि सत्यं एव। सत्यम् वा असत्यम् वा प्रकरणम् परम् राष्ट्राध्यक्षः नाम सर्वोच्चस्थाने विराजमाना व्यक्तिः अपि जनतायाः क्षमायाचनाम् करोति। भारतवर्षे एतत् तु कल्पनातीतम् एव। एतद् एव द्वयोः देशयोः मध्ये प्रवृत्योः मध्ये विद्यमानः मौलिकः भेदः।

धर्मनिरपेक्षम् तथा च समक्षरूपेण समर्थरूपेण राष्ट्रम् वर्धतां इत्यादीनि प्रजासत्ताकस्य मूलभूतानि उद्दिष्टानि। तेषाम् प्राप्त्यर्थम् प्रत्येकेन समाजघटकेन सर्वाः संकुचिताः वृत्तीः त्यक्त्वा राष्ट्रीयस्य दृष्टिकोणस्य अंगीकारः करणीयः तथा च सामाजिकम् उत्तरदायित्वम् अग्रक्रमेण स्वीकरणीयम्।

अनेन माध्यमेन समानता धारयितुम् नूतन-समाजनिर्मितिं कर्तुम् तम् तत्त्वं प्रत्यक्षे आनेतुम् वयम् सर्वे भारतीयाः भवेयुः बध्दपरिकराः। अयम् व्यापकम् दृष्टिकोणम् स्वीकृत्य वयम् सर्वे भारतीयम् प्रजासत्ताकम् प्रति शक्तिम् प्रदास्यामः। तद् दृढम् कुर्मः तत्र प्रयत्नम् कर्तुं सर्वान् स्मारयामः।

गणराज्यदिनम् नाम गंभीरतया प्रतिज्ञास्वीकरणस्य पवित्रदिवसः। भारतीयायाम् घटनायाम् विद्यमानान् उद्दिष्टान् अनुसृत्य नवसमाजरचनानिर्मितिम् प्रति दृढ-निर्धारस्य, संकल्पस्य दिनः। अस्माभिः फ्रेंच राज्यक्रांतिः, अमेरिकायाः स्वातंत्र्ययुध्दम्, तथा च रशियादेशे क्रांतेः अन्तरम् आगतानाम् सर्वोच्चानाम् मानवीयानाम् मूल्यानाम् उद्घोषः कृतः। एतद् मूल्य - स्थापनम्, अयम् आदेशः एष संकल्पः एषा प्रतिज्ञा, तस्मात् बध्दपरिकरत्वम् एतद् एव वैशिष्ट्यम्। विजयताम् गणतन्त्रम्।

॥ जय हिन्द ॥

चित्ते प्रसन्ने भुवनं प्रसन्नम्
चित्ते विषण्णे भुवनं विषण्णम्।

अतोऽ भिलाषो यदि ते सुखे स्यात्
चित्तप्रसादे प्रथमं यतस्व।।

अर्थात्
मन प्रसन्न-आनंदी असले म्हणजे सगळे जग प्रसन्न असते आणि मन विषण्ण खिन्न असले म्हणजे सारे जग उदास भासते. यासाठी हे मनुष्या, जर तुला सुखाची इच्छा असेल तर आधी मन प्रसन्न ठेवण्यासाठी प्रयत्न कर.

युध्दं हि निर्वाचनम्।

कु. रूपाली चंद्रकांत देशपांडे
द्वितीय वर्ष कला

मेदच्छेदकृशोदरं लघु भवत्युत्थानयोग्यं वपुः
सत्वानां अपि लक्ष्यते विकृतिमत् चित्तं भयक्रोधयोः।
उत्कर्षः स च धन्विनां यदिषवः सिध्यन्ति लक्ष्ये चले
मिथ्यैवं समरं वदन्ति विबुधाः क्रीडैव निर्वाचनम्॥

आशापिण्डं न मुञ्चमानाः अस्माकं नेतारः गलितेन अंगेन पलितेन मुण्डेन तथा च दशनहीनेन तुण्डेन, पक्षदण्डम् गृहीत्वा गृहाद्गृहम् प्रति यान्ति। मतानाम् याचकानाम् तेषाम् मस्तके निर्वाचनं नाम चक्रं एव भ्रमति ननु। 'मतम् मे-मृतम् मे' इति 'मे-मे' कुर्वन्ति। विषाणपरिवर्जितस्य बलीवर्दस्य हि बहु। अहं हि सम्मतो जनानाम् इति मन्यन्ते। तुळजापूर नगरे उत वा पंढरपूरग्रामे गत्वा देवान् नमन्ति, तपः कुर्वन्ति, अन्नदानं, जलदानं, क्षम्यताम्, पेयदानं कुर्वन्ति। मुखं पिण्डेन पूरयित्वा लोकान् वशं आनयन्ति। मधुरध्वनिं कारयन्ति। अहो केनापि नेत्रा कदाचित् राजनारायणारव्येन रासभरोहणं अपि कृतं इति श्रूयते। उत वा किं किं नो कुर्वन्ति ? अनया सत्तातृष्णया छागो हरितृणमुष्ट्या इव दूरं नीताः। तत्र एकं सुभाषितं वर्तते-

''एकं वस्तु द्विधा कर्तुं बहवः सन्ति धन्विनः।
धन्वी स मार एवैको द्वयोरैक्यं करोति यः।।''

"You haven't finished cleaning yet," she said, trying to change the subject.

"Amma tell me what a colleague is doing in a family photograph". insisted Sandhya.

Her mother looked at her and then at Indu who was trying hard to control her tears.

"Now, Sandhya did you say something to hurt her ? she said turning towards her angrily.

"It is not me but you and Grandma who have hurt her." retorted Sandhya.

"What do you mean ? asked her mother.

"That lady in the photograph is her mother, said Sandhya.

"Oh God!" exclaimed her mother, sitting down abruply. "No wonder, she looks like Sanjay, but we didn't know Jean was pregnant when she left for England."

But why didnt Sanjay Chacha search for them ? asked Sandhya.

"Oh! But he couldn't, you see." her voice petered out as she looked at Indu.

"Amma tell me-why tell me," demanded Sandhya.

"When you use that tone, you sound just like your Grandma, Think how dominating and stubborn she would have been when she was younger. Nothing was to be done against her wishes, so when Sanjay brought home a foreign bride, she was outraged."

She tried ways and means to create misunderstandinngs between them andmade Jean's life misearrable. They set up a separate establishment but she never fargave Jean for snatching her son, so when Jean left for England, Grandma moved in, she returned all the letters that came, then contrived with a cousin in England to send a false telegram stating that Jean had met with an accident."

It was years later we came to know that it was false, she herself told me oneday dejectedly when she failed in persuading Sanjay to remarry. But by then, it was too late to do anyting," said her mother brokenly.

"I am so sorry, child" said her mother turning to Indu

"Mom, we are going to have a real family Diwali this time. Indu give me your Mom's phone number" said Sandhya. She appeared to be planning something.

But shouldn't you ask Grandma ? said Indu, though her heart was singing with happiness at the thought of reunion with her father.

"You leave that to me, I will convince her, "Said Sandhya. She went marching towards Grandma's room.

Seeing Indu's troubled face, her mother said:

"Don't worry dear, even today Grandma mumbles to herself if only I had accepted his choice, he too would have had a family"

Sandhaya entered Grandma's room. She was sitting, talking to herself.

"Grandma, would you like a real family get-together this Diwali asked Sandhya.

"Yes dear, I would love it," she replied.

Would you like Sanjay Chacha married and with a family, and will you accept them for whoever they are ? she asked.

"Yes, yes-has Sanjay written

something ? I have suffered enough guilty pangs for what I did. I will bless the couple, be sure, whoever they are, "said Grandma eagerly.

"That's a promise, Gandma. Remember it and wait till tomorow," Sandhya said, refusing to reveal anything more.

When Sandhya's father heard everything, he couldn't believe his ears, "What a remarkable coincidencel Sanjay will be so happy." But Sandhaya told him not to tell him. "Dad let it be the Diwali gift for him," said Sandhya.

Indu was talking excitedly over the telephone, "Yes, Mom, it is true, he is still waiting for you, Catch the first flight you can. Rest in person. Love to you, mom," said Indu.

That night, no one in the house-hold could sleep. They talked and talked, waiting for the night to come to an end. Next day, they went to the airport to receive them.

Sanjay Chacha's flight was on time. As soon as Sanjay Chacha saw Indu, he looked as if a hurricane had passed over him.

"It can't be," he said disbelievingly."

"It is, you don't expect your daughter to look like someone else do you ?" Asked Sandhya.

"Sandhya, are you mad ? I don't have a daughter," said Sanjay, still unconsciously moving towards Indu.

"Yes the same soft golden hair, he said softly as he hesitatingly touched her hair. They all began to tell him the long-forgotten story all at once.

"There is one more surprise for you, Chacha," said Sandhya as Sanjay clasped tightly those hands Indu held out to him. happines choking his throat.

"The Panama flight from London has just landed," boomed the announcer's voice.

"Now, we will se our Jean Aunty", Said Sandhya, Unable to contain her excitement. Sanjay looked at her as if she were raving mad.

"Jean..Jean is dead," he said "No, she is not and here she," comes, said Indu running towards a middle-aged, golden-haired lady.

"Mom, welcome home," she said and threw her arms around her.

"Isn't that Dad, Mom ?" she aksed, pointing to Sanjay.

Jean looked up. For a moment, she felt as if the world had come to a standstill. They looked at each other and the next moment she was in his arms. Everyone was laughing. talking and wiping tears all at once.

Through the drive home, Indu and Sandhya were busy narating the events in bits and pieces like a jigsaw puzzle. Grandma was waiting at the doorstep. When she saw Jean alighting, she stood still with shock, her eyes travelled to Sanjay's radiant face. Then, slowly, she came down the steps, smiling.

"Bahu, get the Arti. Let's welcome our bride home" she said.....



महाविद्यालयीन वार्ता

भावपूर्ण निरोप



प्रा. पी. एन. हुपरीकर
इंग्रजी विभाग



प्रा. एल. एन. पाटील
रसायनशास्त्र विभाग




प्रा. जी. एस्. नेमाडे
रसायनशास्त्र विभाग



मेजर डॉ. मालती जावळे
एन.सी.सी.मधून सेवानिवृत्त



मेजर एस. एम. रडे
एन.सी.सी.मधून सेवानिवृत्त



डॉ. पी. टी. चौधरी
पी.एच.डी. प्राप्त

या वर्षातील सर्वोत्कृष्ट विद्यार्थीनी



वर्षा टोके
तृतीय वर्ष सायन्स



नेहा जैन
तृतीय वर्ष वाणिज्य

विद्यापीठ प्रतिनिधी




अमर पाटील
तृतीय वर्ष कला (भूगोल)


उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ नासिक
१२ वी गुणवत्ता यादीतील मानकरी




कु. पाटील सपना आधार
बोर्डात ५ वी विज्ञान शाखा



सचिन ढोवळे
बोर्डात ८ वा विज्ञान शाखा



राहुल किरण पाटील
बोर्डात १२ वा विज्ञान शाखा



अभिजीत डी. फेगडे
बोर्डात १५ वा विज्ञान शाखा



प्रीती चौधरी
बोर्डात १८ वी विज्ञान शाखा



राहूल रमणलाल डांगी
बोर्डात १९ वा विज्ञान शाखा



नेहा विश्वेश अग्रवाल
बोर्डात २६ वी विज्ञान शाखा



शितल अविनाश वाणी
बोर्डात ३ री वाणिज्य शाखा



अनघा पांडूरंग कुळकर्णी
बोर्डात ८ वी वाणिज्य शाखा



कु. मणियार सोनाली सुभाषचंद्र
बोर्डात ४ थी किमान कौशल्य



किरण मधुकर नेमाडे
बोर्डात १ ला विज्ञान शाखा
ऑक्टो ९९

गुणवंत छात्रसैनिकांची उज्ज्वल परंपरा



सार्जंट पूजा समदानी
'सी' सर्टिफिकीट उत्तीर्ण



सार्जंट जयश्री महाजन
'सी' सर्टिफिकीट उत्तीर्ण



कु. वैशाली वाणी
बेस्ट अंडर ऑफीसर.



सार्जंट पूनम केदार
एनआयसी सहभाग



सार्जंट भावना मोहिते
थलसेना कँप मध्ये सहभाग



सार्जंट कविता नांदगावकर
थलसेना कँप मध्ये सहभाग



रमा सिंह
'सी' सर्टिफिकीट उत्तीर्ण



संदिप रघुनाथ सानप
सिनीअर अंडर ऑफीसर,
ड्युक ऑफ एडीनबरोचा
आंतरराष्ट्रीय पुरस्कार



अमित अरुण जाखेटे
सिनीअर अंडर ऑफीसर
ऑल इंडिया कॅम्प नेतृत्व
ड्युक ऑफ एडीनबरो
ब्रान्झ पदक
'बी' सर्टफीकेट उत्तीर्ण




जितेंद्र शरद ठाकरे
सिनीअर अंडर ऑफीसर
'सी' सर्टफीकेट उत्तीर्ण



जे.यू.ओ. निखील आर. चौधरी
राष्ट्रीय कॅम्प मध्ये सहभाग.



नरेश बावस्कर
ज्युनीअर अंडर
ऑफीसर



एस.जी.टी. आशिष गुरव
वेल्फेअरचे शिष्यवृत्ती प्राप्त




सार्जंट सुनिल शिगाणे
बेस्ट कॅडेट-२०००



सार्जंट निवृत्ती पाटील
बेस्ट फायटर.



सार्जंट जितेंद्र गावीत
वार्षीक प्रशीक्षण
शिबीरात सहभाग



सार्जंट दिपक सोनवणे
बी.एच.सी. कॅम्प
दिल्ली येथे सहभाग.




सार्जंट कैलास भदाणे
बीएचसी कॅम्प दिल्ली
येथे सहभाग.



राहुल दिलीप चौधरी
सिनीअर अंडर ऑफीसर
आर.डी. कॅम्प दिल्ली
येथे सहभाग.

विशेष गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी



राजेंद्र दामोदर गाडगीळ
बी.सी.जे. विद्यापीठात प्रथम



कु. माधुरी मधुकर महाले
बी एस्सी संख्याशास्त्र
विद्यापीठात प्रथम



कु. वीणा विजय भोळे
एम.एस.सी (ऑर्गनिक केमेस्ट्री)
महाविद्यालयातून सर्वप्रथम.



वैशाली अनिल मराठे
बी.एस्सी. फिजिक्स
विद्यापीठात प्रथम

आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी खेळाडू




कु. वैशाली देविदास चौधरी
बास्केटबॉल




रणजित राणे
सॉफ्टबॉल



देवेंद्र चौधरी
सॉफ्टबॉल




शैलेष विश्वनाथ जाधव
टेबल-टेनीस



कु. प्रिया गुलाबराव साळुंखे
बॉलबॅडमिंटन



तृप्ती एकनाथ पाटील
बॉल बॅडमिंटन, सॉफ्ट बॉल



कोल्हे भावना पी.
व्हॉलीबॉल, सॉफ्टबॉल



मोहन अ. पाठक
टेबल-टेनिस



विजय काशिनाथ पाटील
व्हॉलीबॉल, ॲथलेटीक्स



सावंत योगेश रविंद्र
क्रिकेट




श्रीपाद अशोक जोशी
टेबल टेनिस

राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी




किशोर बडगुजर
रा.से.योजना ग्रुप लिडर.



मिलींद जी. बोटे
विद्यापीठ शिबीर सहभाग



दिनकर चंद्रकांत कोल्हे
विद्यापीठ शिबीर सहभाग



एन.एस.एस. - विद्यापीठ वसतीगृहात
श्रमदान करताना



फोर्ड फाऊंडेशन अंतर्गत सायकल रॅलीत
सहभागी झालेले विद्यार्थी.



'अजिंठा' संपादक मंडळ



युवती सभा
(वरिष्ठ महाविद्यालय)



युवती सभा
(कनिष्ठ महाविद्यालय)



नियोजन मंडळ



वसतिगृह कार्यकारीणी



साहित्य मंडळ



कला मंडळ



राष्ट्रीय सेवा योजना



राष्ट्रीय कॅम्प मध्ये सहभागी झालेले
छात्रसैनिक




बॉल बॅडमिंटन
जिल्हास्तर विजयी संघ



वार्षिक प्रशिक्षण शिबीरातील विजयी
छात्रसैनिक



बास्केटबॉल : मुले.
जिल्हास्तर विजयी संघ.



वार्षिक प्रशिक्षण शिबीरात सहभागी
छात्रसैनिक



टेबल-टेनिस मुले
जिल्हास्तर विजयी संघ.

विनम्र श्रध्दांजली



प्रा. डॉ. एकनाथ वाठ एक सच्चा स्नेही

– प्रा. पी. व्ही. वाणी

डॉ. एकनाथ मोतीरामजी वाठ. विदर्भातील एक व्यक्तिमत्व. खान्देशात येऊन फळलं, फुललं व येथेच कोमेजलं. १९७२ साली डॉ. वाठ प्राणीशास्त्र विभागात व्याख्याता म्हणून रुजु झालेत. केवळ त्यांच्यामुळे मुळजी जेठा महाविद्यालयात पोस्ट ग्रॅज्युएट क्लाससला सुरुवात झाली. प्रथम प्राणीशास्त्र नंतर फिजिक्स, केमिस्ट्री, वनस्पतीशास्त्र हे क्लासेस सुरु झालेत. त्याचे श्रेय केवळ डॉ. एकनाथ वाठ ह्यांनाच जात.

विद्यार्थ्यांत अतिशय लोकप्रिय प्राध्यापक म्हणून ते प्रसिध्द होते. विद्यार्थी कोणत्याही शाखेचा असो, वाठ सरांची ओळख नाही असा विद्यार्थी - विरळाच.

अन्यायाची चिड,चांगल्या गोष्टींच कौतुक, तेही मनापासून, हसरा चेहरा, गाण्याची, खाण्याची आवड, सतत दुसऱ्यासाठी झटणारे, एवढे विविध गुण एकाच व्यक्तित क्वचितच पहायला मिळतात.

लहानपणापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा कार्यकर्ता, त्यामुळे शिस्त ही अंगात भिनलेली होती. पुढे अ.भा.वि.प. चे अध्यक्ष, स्वामी विवेकानंद केंद्राचे काम अशा अनेक चांगल्या महत्वाच्या कामाला त्यांनी हातभार लावला.

त्यांचा मनमिळाऊ स्वभावाच वैशिष्ट्य अस होत की शेजारचा पानवाला असो,आईस्क्रिम विकणारा असो वा पावभाजीचा गाडीवाला असो,सगळ्यांशी सारख्याच अस्मितेन बोलणार, त्यांच्या नावाने हाक मारणार, अशी विशेष प्रतिमा त्यांनी केवळ कॉलेजातच नव्हे तर जळगांवांत उभी केली होती.

बुक बॉन्ड कॉलनीत त्यांच वास्तव्य. तेथील गणश उत्सव, रंगपंचमी, होळी अशा अनेक सणातून एकत्र येणे, त्या निमित्ताने सर्वांशी घनदाट परिचय करुन घेण, विविध कार्यक्रमांची आखणी करण अशी सर्व काम त्यांनी आनंदाने केलीत.

डॉ. एकनाथ वाठ हंसऱ्या चेहऱ्याच व्यक्तिमत्व होत. आयुष्यात अनेक कठीण प्रसंगांना तोंड द्याव लागल. सगळ्या संकटांना मोठ्या धीराने तोंड देऊन त्यातून मार्ग काढला. एवढ्या विशाल देहात मन मात्र फार हळव होत. कोणत्याही लहानशा कारणाने तो हळहळायचा.

संकटांची मालिका पाठीशी असतांना चेहऱ्यावर हास्य टिकवून ठेवण्याची कला डॉ. एकनाथ वाठला दिलेली नैसर्गिक देणगी होती.

वाठ सर आपण गेलात पण नेत्रदानाने दोघांना डोळस करुन मरावे परी किर्तीरुपे उरावे, आपण किर्तीरुपी व नेत्ररुपीही रहाल ह्याचा आम्हाला अभिमान आहे.

एक सच्चा मित्र, प्रेमळ वडील व कर्तव्यदक्ष प्राध्यापक गमावला ह्याच फार वाईट वाटत.

परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो एवढीच प्रार्थना.

महाविद्यालयीन वार्ता

विविध परीक्षांचे निकाल

मार्च-एप्रिल १९९९ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक मंडळाच्या आणि उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विविध परीक्षांचे आमच्या महाविद्यालयाचे निकाल

१२ वी कला	-	७९.८१
१२ वी वाणिज्य	-	८०.७६
१२ वी विज्ञान	-	७९.००
तृतीय वर्ष कला	-	६४.३०
तृतीय वर्ष वाणिज्य	-	६७.६०
तृतीय वर्ष विज्ञान	-	६६.६०
पदव्युत्तर कला	-	५५.५०
पदव्युत्तर वाणिज्य	-	५८.००
पदव्युत्तर विज्ञान	-	७०.००

सेवानिवृत्त प्राध्यापक

प्रा. पी. एन. हुपरीकर, प्रा. एल. एन. पाटील व प्रा. जी. एस. नेमाडे ह्यांनी यशस्वीपणे संस्थेची सेवा करून सेवानिवृत्ती स्विकारली. या सर्व ज्येष्ठ बांधवांना पुढील आयुष्य सुखसमाधानाचे जावो ही सदिच्छा !

विनम्र श्रध्दांजली



प्रा. डॉ. ह. श्री. साने

आपल्या महाविद्यालयातील माजी प्राध्यापक डॉ. ह. श्री. साने यांचे पुणे येथे दि. ८ एप्रिल २००० रोजी अकाली निधन झाले. हिन्दी विषयाचे ज्येष्ठ अध्यापक म्हणून ते सुपरिचित होते. त्यांच्या संशोधनाचा विषय 'यशपाल के उपन्यास' असा होता. आपल्या महाविद्यालयात १९६८ ते १९७३ दरम्यान अध्यापनाचे कार्य केल्यानंतर पुण्याच्या स. प. महाविद्यालयात डॉ. साने गेलेत. गेली काही वर्ष त्यांनी स. प. महाविद्यालयाच्या प्राचार्यपदाची धुरा यशस्वीपणे सांभाळली होती. यंदाच्याच स्नेह संमेलनाचे ते प्रमुख अतिथी होते, हा एक दैवयोग. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो हीच प्रार्थना !



मेजर शुभराम

आपल्या महाविद्यालयाशी संबंधित १८ महाराष्ट्र बटालीयनचे सुभेदार मेजर शुभराम यांचे दि. ३१ मार्च २००० रोजी वयाच्या ४९ व्या वर्षी, हृदयविकाराने, अकाली निधन झाले. त्यांनी भारतीय लष्करात ३२ वर्षे नोकरी केली. १९६५ व १९७१ सालच्या भारत-पाक युध्दात तसेच १९८७-८८ साली श्रीलंकेत पाठविण्यात आलेल्या शांतिसेनेत त्यांचा सहभाग होता. चार वर्षापूर्वीच ते एन.सी.सी. च्या सेवेत रुजु झाले होत. त्यांच्या अतुलनीय कार्याबद्दल ''ऑनररी लेप्टनंट'' हा किताब त्यांना २६ जानेवारी २००० रोजी राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान करण्यात आला. आपल्या महाविद्यालयावर त्यांचा विशेष लोभ होता. एक शिस्तप्रिय अन् तेवढंच नाजुक व्यक्तीमत्व म्हणजे मेजर शुभराम. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो हीच प्रार्थना.

स्तुत्य उपक्रम

राष्ट्रीय संस्कृत परिषद

युगाब्द ५१०१ (१९९९-२०००) हे वर्ष देशांत संस्कृत वर्ष म्हणून साजरे होत आहे. त्या निमित्ताने महाविद्यालयांत विविध उपक्रम घेण्यांत आले. मानव संसाधन विकास मंत्रालयाने राष्ट्रीय स्तरावरील संस्कृत परिषदेच्या आयोजनाकरीता उत्तर महाराष्ट्र विद्यापीठास रु. एक लाखाचे अनुदान मंजूर केले व विद्यापीठ परिक्षेत्रात पदव्युत्तर संस्कृत शिक्षणाची सोय फक्त आपल्या महाविद्यालयांत असल्यामुळे विद्यापीठाने मु.जे. महाविद्यालयांत ही परिषद घेण्याची परवानगी दिली. दि. १०,११ व १२ मार्च, २००० रोजी ''संस्कृत साहित्यातून प्रतिबिंबीत झालेले पर्यावरण विषयक विचार'' या विषयावर ही परिषद आयोजित करण्यांत आली. परिषदेचे अध्यक्ष डॉ. एस. एफ. पाटील (कुलगुरु, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ) होते तर निमंत्रक म्हणून प्राचार्य ए.जी.राव व कार्यवाहक म्हणून डॉ. सुवर्णा शेटे यांनी काम पाहिले. परिषदेचे उद्घाटन ज्येष्ठ संस्कृत पंडीत पद्मश्री व्ही. वेंकटाचलम् (माजी कुलगुरु, बनारस संस्कृत विश्वविद्यालय) यांचे शुभहस्ते झाले. डॉ. व्ही. एन. झा (संचालक, संस्कृत प्रगत अध्ययन केंद्र, पुणे विद्यापीठ) यांनी बीज भाषण केले. मु.जे. महाविद्यालयांत संस्कृत विषयाचे अध्यापन केलेले डॉ. ग.ह. तारळेकर, प्रा. म. मो. केळकर, प्रा. एस.एस. कुळकर्णी व जळगाव जिल्ह्यात शालेयस्तरावर संस्कृत भाषा संवर्धनाचे काम केलेल्या शिक्षकांचा प्रातिनिधीक सत्कार म्हणून वयोवृध्द शिक्षक श्री. ल. वा. मांडवगणे यांचा सत्कार प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यांत आला. परिषदेत देशाच्या विविध ठिकाणाहून ८० प्रतिनिधी हजर होते व विविध तांत्रिक सत्रात ४० शोध निबंध सादर झालेत. परिषदेचा समारोप प्रसिध्द उद्योगपती श्री. भंवरलालजी जैन यांचे शुभहस्ते झाला. यानिमित्ताने जळगावकरांसाठी ''भारतीय संस्कृती व पर्यावरण'' या विषयावर ज्येष्ठ संस्कृत अभ्यासक डॉ. एम.के. ढवळीकर यांचे जाहीर व्याख्यान आयोजित केले.

परिषदेच्या निमित्ताने खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीच्या वतीने व मातोश्री जमनाबाई पलोड ट्रस्टच्या आर्थिक सहकार्याने जिल्हा शालेय स्तरावर संस्कृत कथाकथन, समुहगान, चित्रकला, स्तोत्र पठण स्पर्धा घेण्यांत आल्या. एकूण ५५० विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला.

परिषदेच्या यशस्वितेसाठी जळगाव पिपल्स को-ऑप. बँक, जळगाव जनता सहकारी बँक, श्री. हेमचंद्र भंडारी, श्री. सी.पी. राणे, श्री. विनोद अग्रवाल व मेसर्स कॉम्प्युटर बीम यांनी भरीव आर्थिक सहकार्य दिले. तसेच उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील प्रा. डॉ. आर. एम. कोठारी, डॉ. डी.डी. हुंडीवाले, डॉ. यु.आर. कापडी, डॉ. इंगळे, बीसीयुडीचे संचालक डॉ. व्ही.सी. कोल्हे व इतर अधिकाऱ्यांनी अमोल सहकार्य केले.

चर्चासत्र

दि. १५ फेब्रुवारी २००० रोजी मराठी विषयातील पदवी-पदव्युत्तर स्तरावरील 'मराठी ग्रामीण आणि दलित साहित्य' ह्या संदर्भात एका दिवसाचे चर्चासत्र आयोजित आले होते.

प्रस्तुत चर्चासत्राचे उद्घाटन औरंगाबाद विद्यापीठातील नामवंत समीक्षक डॉ. बाळकृष्ण कवठेकर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रथम सत्रात ग्रामीण आणि दलित साहित्य-भूमिका आणि स्वरुप-ह्या विषयावर त्यांनी आपले विचार व्यक्त केले. दुसऱ्या सत्रांत अनुक्रमे धुळे येथील विद्यावर्धीनी महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख, प्रा. डॉ. सौ. नीला पांढरे यांचे दलित साहित्यातील आत्मकथने आणि औरंगाबाद येथील सेवानिवृत्त प्राध्यापक, डॉ. वासुदेव मुलाटे यांचे 'ग्रामीण साहित्यातील बदलत्या प्रेरणा' अशी दोन व्याख्याने आयोजित केली होती.

या चर्चासत्रात उ.म.वि. कार्यक्षेत्रातील मराठी विषयाचे अध्यापन करणारे प्राध्यापक उपस्थित होते. याच प्रसंगी आपल्या महाविद्यालयातील मराठीचे सेवानिवृत्त प्राध्यापक श्री. सु.का. जोशी व प्रा. डॉ. सौ. प्रमिला भिरुड यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यानुभव योजना

वाणिज्य विद्याशाखेतील पदवीस्तरावरील विद्यार्थ्यांना व्यावहारीक प्रात्यक्षिक ज्ञान मिळावे या उद्देश्याने ''कार्यानुभव'' ही योजना विद्यापीठाने आखलेली आहे. ह्या योजने अंतर्गत सध्याच्या साचेबंध शिक्षण पध्दतित बदल करुन विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष बी.कॉमचे शिक्षण घेत असतांना विविध व्यावसायिक, उद्योजक, पतसंस्था, बँका इ. मध्ये कार्यानुभव घेता येईल. या योजनेच्या निर्मितीमध्ये मु.जे. महाविद्यालयातील वाणिज्य शाखेच्या प्राध्यापकांचा महत्वाचा सहभाग आहे. कार्यानुभव योजनेचा शुभारंभ मु.जे. महाविद्यालय दि. २१ ऑक्टोबर, १९९९ रोजी डॉ. एस.एफ. पाटील, कुलगुरु, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांचे शुभहस्ते झाला. अध्यक्षस्थानी संस्थेचे प्रभारी अध्यक्ष श्री. बी. आर. चौबे होते. विविध व्यावसायिक व उद्योजक या कार्यक्रमास हजर होते. जळगाव जिल्ह्याच्या समन्वयाची जबाबदारी विद्यापीठाने मु.जे. महाविद्यालयावर सोपविली आहे. प्रा. डॉ. पी.टी. चौधरी यांची जिल्हास्तरीय समितीचे निमंत्रक म्हणून तर उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी म्हणून श्री. भालचंद्र पाटील. श्री. प्रकाश चौबे, श्री. भरत अमळकर, श्री. विजय बाविस्कर यांची स्तुत्य नियुक्ती विद्यापीठाने केली आहे. एका प्रयोगाचा प्रारंभ मु.जे. महाविद्यालयात होत आहे. ही सर्वांसाठीच अभिनंदनीय बाब आहे.

अर्थशास्त्र परिषद

१० एप्रिल हा कै. पां. वा. गाडगीळ यांच्या स्मृती दिनाचा योग साधून 'मराठी अर्थशास्त्र' परिषदेच्या पतीने आणि मु.जे. महाविद्यालय जळगांव, आयोजित एकदिवसीय परिषद IMR हॉलमध्ये संपन्न झाली. या परिषदेचा विषय 'आंतरराष्ट्रीय भांडवलाचे आजचे स्वरुप व भारताचे वित्तीय शिथिलीकरणाचे धोरण' असा होता. प्रमुख वक्ते माजी प्राचार्य चंद्रकांत केळकर (मुंबई) यांनी भुषविले तर अध्यक्ष पद प्रा. विनायक गोविलकर (नाशिक) ह्यांनी स्विकारले होते त्याचबरोबर व्यासपीठावर प्रा. व्य.सु. पाटणकर आणि प्राचार्य अनिल राव हे मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. गोखले यांनी केले. सुरवातीला प्रा. व्य.सु. पाटणकरांनी मराठी अर्थशास्त्र परिषदेचा आढावा घेतला. तर प्रमुख वक्ते प्राचार्य केळकर यांनी विषयांच्या संदर्भात असे मांडले की आंतरराष्ट्रीय भांडवली प्रवाहाची सैध्दांतीक अपेक्षा आणि प्रत्यक्षात व्यवहारात हा प्रवाह नियंत्रीत करणारी माध्यमे यात मोठी तफावत असल्याने तसेच आंतरराष्ट्रीय भांडवलाची अनिश्चितता, घातकता आणि स्फोटकता आणि अनपेक्षितपणे घडून येणारी संकटे ही त्यांची वैशिष्ट्ये असल्याने अविकसित अर्थव्यवस्था त्यांच्याकडील दुर्मिळ परकीय चलन साठ्यामुळे परकीय भांडवलामुळे येणाऱ्या आरिष्टांना यशस्वीपणे तोंड देऊ शकत नाही. आणि याला इतिहास असलेले अनेक पुरावे त्यांनी सोदाहरण स्पष्ट केले.

आंतरराष्ट्रीय भांडवली प्रवाहाचा धोका जरी त्यांनी स्पष्ट केला असला तरी भारताच्या बाबतीत आशावाद मांडलेला आहे. कारण भारताचे राष्ट्रीय उत्पन्न केवळ निर्यातीवर अवलंबून नाही तसेच आपले दक्षतेने केलेले रुपयाचे परिवर्तन भांडवलाच्या उड्डाणाला रोखणारे असल्याने आंतरराष्ट्रीय भांडवल भारताच्या दृष्टीने धोकादायक नाही अशी आश्वासकता व्याख्याना अखेर व्यक्त केली.

त्यानंतर प्रा. गोविलकरांनी अध्यक्षीय भाषण केले. तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. सौ. बिराजदार यांनी केले. या कार्यक्रमास अनेक मान्यवरांनी उपस्थिती दिली.

राष्ट्रीय युवा संसद प्रतियोगितेसां संघ निवड व प्रशिक्षण शिबीर.

केंद्र सरकारच्या संसदीय कामकाज मंत्रालयातर्फे

दरवर्षी राष्ट्रीय स्तरावर युवा संसद प्रतियोगिता आयोजित केली जाते. यंदाच्या प्रतियोगितेसाठी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने मुळजी जेठा महाविद्यालयात दि. १, २, आणि ३ फेब्रुवारी २००० रोजी राष्ट्रीय युवा संसद प्रशिक्षण व संघ निवड शिबीर घेण्यात आले. प्रशिक्षणाच्या शेवटच्या दिवशी शिबीरार्थींद्वारा ''अभिरुप संसद'' सादर केली गेली.

रसायनशास्त्र प्रज्ञा शोध परीक्षा

आपल्या महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागाने ''रसायनशास्त्र प्रज्ञा शोध परिक्षा'' १९९७ पासून सुरू केली. ही परीक्षा विज्ञान शाखेच्या प्रथम वर्ष रसायन शास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी असते. प्रत्येक महाविद्यालयातील स्पर्धकांतून प्रथम व द्वितीय अशी दोन बक्षीसे दिली जातात.

यंदाचे ह्या परीक्षेचे तिसरे यशस्वी वर्ष. दरवर्षी ह्या परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांची वाटत आहे. यंदा सुमारे ४०० विद्यार्थी परीक्षेस बसलेत. एकूण १४ महाविद्यालयांनी सहभाग दिला. यंदा नाहाटा कॉलेज भुसावळचा अनिरुध्द अग्रवाल प्रथम तर कला, वाणिज्य महाविद्यालय, चाळीसगावचा किरण साळुंखे द्वितीय व बेंडाळे महाविद्यालय, जळगावची कांचन राणेने तृतीय क्रमांक मिळवला.

सुविचार

- ''पायदळी चुरगळली गेली तरी फुले त्या पायांनाही सुगंधच देतात.''
- ''जो मूळ सोडून फांद्यांचा शोध घेतो तो आयुष्यभर भटकतच राहतो.''
- ''कर्तव्य पार पाडण्यातला आनंद हा त्रिभुवनातील सर्वश्रेष्ठ आनंद आहे.''
- ''पाप ही एकच गोष्ट अशी आहे की, जी लपविण्याचा प्रयत्न केल्यास वाढतच जाते आणि उघडही होत जाते.''
- ''ही जाणीव असू द्या की, एखाद्याच्या पाठीमागे त्याची निंदा करणे, हे पाप होय. हे पाप कधीही करु नका. मनामध्ये पुष्कळशा गोष्टी उद्‌भवतील, पण त्या सर्वच व्यक्त करुन जाल तर हळूहळू राईचा पर्वत बनेल. तुम्ही जर क्षमा कराल आणि विसरुन जाल तर सारे काही तिथेच समाप्त होवून जाईल.''
- ''अधिक मित्र हवे असतील, तर दुसऱ्यांच्या गुणांचे मनापासून कौतुक करा.''
- ''जे जगाला द्याल ते फुकट जाणार नाही, आणि हृदय ओतून जे द्याल त्याची किंमतच करता येणार नाही.''

वार्षिक अहवाल १९९९-२०००

राष्ट्रीय सेवा योजना

राष्ट्रीय सेवा योजनेच्या या शैक्षणिक वर्षातील उपक्रमाची सुरुवात ज्युनियर व सिनियर महाविद्यालयातील स्वयंसेवकांच्या प्रशिक्षणाने करण्यात आली. प्रशिक्षणाचे आयोजन दोन दिवस करण्यात आले. प्रशिक्षणाच्या कालावधीत मा. प्राचार्य अनिल राव, उपप्राचार्य डॉ. एस.एस.राणे, उपप्राचार्य एम.डी.बोंडे व उपप्राचार्य पी.एल.कोल्हे, राष्ट्रीय सेवा योजनेचे माजी कार्यक्रम अधिकारी प्रा.व्ही.जे. चौधरी, डॉ.ए.एस.भोळे यांचे मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण देन्यात आले. रा.से. योजनेच्या कार्यक्रमाची सदस्यांची निवड करुन मागील वर्षाच्या कार्याचा आढावा व या वर्षातील उपक्रमाचे नियोजन करन्यात आले.

१) परिसर स्वच्छता सुशोभिकरण उपक्रम :-

राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे महाविद्यालयाच्या ३२ एकराच्या परिसरात स्वच्छता व सुशोभिकरण करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला. मागच्या वर्षातील गाजर गवत निर्मुलनाचा एक भाग म्हणून या वर्षभरात महाविद्यालय परिसरातील गाजर गवत नष्ट करण्यात विशेष यश मिळाले, महाविद्यालयातील मुख्य इमारत, कॉमर्स इमारत, ग्रंथालय, भूगोल विभाग, पी.जी.विभाग, वस्तीगृह व संशोधन केंद्राचा परिसर स्वच्छता करण्यात आमच्या रा.से. योजनेतील स्वयंसेवकांनी विशेष उल्लेखनिय कार्य केले आहे. परिसर सुशोभिकरणांत लागवड केलेल्या वृक्षांचे संगोपन, मेहेंदीची लागवड व संगोपन, वृक्षांना विशिष्ट पध्दतीने आकार देणे, मेहेंदीची कटाई, इ. कामे स्वयंसेवकांनी केली. परिसरातील पालापाचोळा गोळा करुन परिसरात कंपोष्ट खत तयार करण्याच्या गतवर्षाच्या प्रकल्पाला या वर्षात चांगले यश मिळाले. या खताचा वापर परिसरातील झाडांना , मेहेंदी व बगीच्यातील फुलझाडांना करण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजनेत 'वृक्ष मित्र मंडळ' स्थापन करुन तीन वर्ष पूर्ण झाल्यामुळे या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला. वृक्ष दत्तक योजना या वर्षापासून रा.से.यो. तर्फे राबविण्यात आली. परिसरात गतवर्षी लागवड केलेल्या झाडांना स्वयंसेवकांनी दत्तक घेवून वृक्षसंगोपनाची जबाबदारी पार पाडली.

२) नियोजीत खेडेगाव - कानसवाडा :-

कानसवाडा हे चौथ्यांदा पुनर्वसन झालेले आदिवासी गाव तापी नदीच्या दऱ्या खोऱ्यात वसलेले जळगाव शहरापासून चौदा किलोमिटर अंतरावर वसलेले गाव आहे. मु.जे. महाविद्यालयाने कानसवाडा हे गाव दत्तक घेतले आहे. दत्तक गाव घेण्याअगोदर या गावातील झोपड्या कोणतेही नियोजन नसल्यामुळे विखुरलेल्या होत्या. महाविद्यालयाचे प्राचार्य, कार्यक्रम अधिकारी, भूगोलविभाग प्रमुख, सरपंच, ग्रामस्थ यांची बैठक घेवून गावाच्या क्षेत्राचे नियोजनबध्द नकाशा भूगोल विभागाने तयार करुन रस्ते आखणी, प्लॉटचे वाटप, शाळा, समाजमंदीर, क्रीडांगण, मंदिर, खळवाडी यांचे नियोजन करण्यात आले. रस्त्याची आखणी, रस्ते तयार करणे, गटाराचे खोदकाम, समाज मंदिर व मंदिराचा पायाभरणी, वृक्षारोपण इत्यादी नियाजनबध्द कामे रा.से.यो. च्या स्वयंसेवकांच्या मदतीने कार्यक्रम अधिकारी यांनी करुन घेतले आहे. गावात आमच्या प्रेरणेने समाज मंदिर, महादेव व हनुमान मंदिर, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व गटारी, प्रशस्त शाळा, इंदिरा आवास योजना, भजनीमंडळ, महिलामंडळ इत्यादी स्थापन झालेले आहे. गावांत आमच्या पथनाट्याच्या कार्यक्रमातून जनजागृतीचे कार्य कानसवाडा, शेळगाव, भोलाणे या परिसरात सुरु आहे कानसवाडा दत्तक घेण्याआगोदरची सामाजीक परिस्थिती आणि आजची सामाजिक बदल उल्लेखनिय आहे.

३) फोर्ड फाँडेशन :-

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व फोर्ड फाँडेशन परिसर

विभिन्नता उपक्रमांतर्गत महाविद्यालयाच्या परिसरात शोभिवंत फुलझाडे व मेहेंदी लागवडीच्या उपक्रमात रा.से.यो. चे स्वयंसेवक सहभागी झाले होते. मुख्य इमारतीसमोरील बगीच्याचे नियोजन व संगोपनाचे कार्य ३० युवकांनी हाती घेतलेले आहे. या उपक्रमासाठी महाविद्यालयातील भूगोल विभाग व वनस्पतीशास्त्र विभागाचे विशेष सहकार्य आम्हाला लाभले. या उपक्रमाचा एक भाग म्हणून प्रा.सुरेश तायडे, विलास पारधी, प्रीती सरोदे महेश वाघ यांना विशेष प्रशिक्षणासाठी पाटणादेवी व नंदुरबार येथे पाठविण्यात आले.

४) विद्यापीठ सागवान प्रकल्प :-

उत्तर महाराष्ट्राचे कुलगुरु मा.डॉ.एस.एफ.पाटील यांच्या प्रेरणेने हाती घेण्यात आलेल्या विद्यापीठ सागवान प्रकल्पात आमच्या महाविद्यालयातील स्वयंसेवक वृक्षसंगोपन कार्यात सहभागी झाले. विद्यापीठ परिसरातील लागवड केलेल्या सागवान झाडांना माती, खत, पाणी व त्यांचे संगोपन करण्यासाठी आमचे विद्यार्थी गटागटाने विद्यापीठात जात होते. या उपक्रमात मा.डॉ.कोठारी, मुख्य अभियंता डॉ.सी.पी.पाटील, गार्डनिंग ऑफिसर एस.आर.पाटील, प्रा.विलास चव्हाण

संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

५) एडस् पंधरवाडा :-

१ डिसेंबर ९९ ते १५ डिसेंबर ९९ या कालावधीत एडस् पंधरवाडा कार्यक्रमांतर्गत एडस् जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन महाविद्यालय परिसरात व दत्तक गाव कानसवाडा येथे करण्यात आले. चित्र प्रदर्शन, व्याख्याने, निबंधस्पर्धा, प्रश्न मंजूषा, एडस् सामान्य ज्ञान स्पर्धा, पथनाट्य, इत्यादी माध्यमातून एडस् या भयंकर रोगाला प्रतिबंध करण्यासाठी जनजागृतीपर कार्यक्रम हाती घेण्यात आले. या कार्यक्रमात जिल्हा रुग्णालय जळगाव, भारत सरकार क्षेत्रीय प्रसार कार्यालय यांचे मार्गदर्शन लाभले.

६) जनजागृती उपक्रम :-

रा.से.यो. तील स्वयंसेवकांत सामाजिक बांधीलकीची जाणीव जागृती निर्माण होण्यासाठी आम्ही ''आजोबांशी गप्पा'' हा उपक्रम हाती घेतला. केशव स्मृती प्रतिष्ठान ने स्थापन केलेल्या 'मातोश्री' वृध्दाश्रमाला भेटीचा कार्यक्रम राबविण्यात आला. या ठिकाणी श्री. विलास कुळकर्णी यांनी आजच्या युगातील वृध्दांच्या समस्या व उपाय या विषयी मार्गदर्शन केले. आश्रमातील बगीच्यात श्रमदान करताना आजाबांशी गप्पा मारण्याची संधी आमच्या विद्यार्थ्यांना मिळाली. कॅरम, बुध्दीबळ इत्यादी खेळ या दिवशी चांगले रंगले. विद्यार्थ्यांनी आश्रमातील आजोबांचे आशिर्वाद घेतले.

७) वंदे मातरम् कार्यक्रम :-

रा.से.यो. च्या स्वयंसेवकांनी नविन सहस्त्रकाचे स्वागत करण्यासाठी वंदे मातरम् कार्यक्रम राबविला. या उपक्रमात स्वयंसेवकांनी महाविद्यालयाच्या चौकात पथनाट्य, चित्रप्रदर्शन, भारुड या माध्यमातून एडस्, पर्यावरण, राष्ट्रीय एकात्मता, व्यसनमुक्ती या विषयावर जनजागृतीचे कार्य केले. वंदेमातरम् कार्यक्रमाचा एक भाग म्हणून स्वयंसेवकांनी आजच्या ज्वलंत समस्या व उपाय यावर गटवार चर्चेचे आयोजन केले होते. २५ विद्यार्थ्यांचे गट पाडून प्रत्येक गटाने आपले मत सादर केले. 'नवीन सहस्त्रकातील युवकांसमोरील आवाहने' या गटवार चर्चेत सत्यजित नेमाने, अनुराधा जोशी, मिलींद बोटे, चंद्रशेखर काळे, महेश वाघ, यांनी त्यांच्या गटाचे प्रातिनिधीक मत सादर केले. ३ जानेवारी २००० रोजी भूगोल विभागात रक्तदानाचा कार्यक्रम राबविण्यात आला. रा.से.यो. तील ३१ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. विवेकानंद जयंतीदिनी नेहरु युवा केंद्र जळगाव व रा.से.यो. तर्फे युवक रॅलीत महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी झालेत. या प्रसंगी प्रा.विलास चव्हाण विद्यार्थी कल्याण उ.म.वि. यांचे मार्गदर्शन लाभले. याशिवाय महाविद्यालयात स्वरचित काव्य मैफिलीचे आयोजन करण्यात आले.

८) युवक व्यक्तिमत्व विकास प्रकल्प :-

रा.से.यो.त सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्व विकास प्रकल्प राबविण्यात आला. या उपक्रमात मा. उपप्राचार्य एस.एस.राणे यांनी व्यक्तिमत्व विकासाचे धडे दिले. डॉ.किसन पाटील, प्रा.शरदचंद्र छापेकर, श्री. विजय मोहरीर, संघटक जिल्हा ग्राहक मंच, जळगाव, डॉ.उल्हास कडूसकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. रा.स.यो. तर्फे आयोजित केलेल्या सर्व कार्यक्रमांचे नियोजन, सुत्रसंचलन, स्वागत आभार इत्यादी सर्व कार्यक्रम विद्यार्थ्यांनी केले हेच आमच्या प्रकल्पाचे यश आम्ही मानतो.

विशेष हिवाळी शिबीर :-

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी शिबीराचे आयोजन उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, बांभोरी येथे करण्यात आले. शिबीराचे उद्घाटन डॉ.स.मा.कापडी, केमिकल सायन्स विभाग उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या हस्ते डॉ.एस.एस.राणे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. श्रमसंस्काराचा एक भाग म्हणून उ.म.वि. परिसरातील रस्त्यांच्या दोन्ही बाजूंचे पट्टे गवत काढून साफ करण्यात आले. वसतीगृहाचा परिसर सुशोभिकरणासाठी सपाटीकरण, वृक्षसंगोपीकरण, परिसर स्वच्छता इत्यादी कार्यक्रम हाती घेण्यात आले. या उपक्रमात वसतीगृह अधीक्षकांचे विशेष सहकार्य व मार्गदर्शन लाभले. शिबीराच्या कालावधीत व्यक्तिमत्व विकासांतर्गत डॉ. उल्हास कडूसकर, प्रा.डॉ.पी.टी.चौधरी, डॉ.के एम.पाटील, श्री. रमेश कोळी, अधीक्षक, अग्नीशामक दल, नगरपालिका जळगाव, माननीय सरफराज तडवी, उपसंचालक क्षेत्रिय प्रसार कार्यालय जळगाव यांची भाषणे व प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले. दररोज होणाऱ्या गटवार चर्चा विशेष रंगत होत्या. आपातकालीन परिस्थितीवर मात करण्यासाठी जळगाव नगरपालिका अग्नीशामक दलाच्या वतीने प्रात्यक्षिके चित्तथरारक होती. शिबीराच्या कालावधीत नियोजनबध्द समारंभाचे आयोजन कसे करावे याविषयी डॉ.ए.एस.भोळे, प्रा.सुरेश तायडे यांनी मुलांना मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांनी नियोजन केलेला प्रात्यक्षिकांचा समारंभ विशेष ठरला. शिबीराच्या कालावधीत डॉ.एस.एफ.पाटील, कुलगुरु, उ.म.वि., डॉ.व.ही.कोल्हे, संचालक, बी.सी.यु.डी, डॉ.कोठारी, प्रा.विलास चव्हाण, श्री. सुधीर भटकर, श्री.सी.टी.पाटील व महाविद्यालयातील ४७ प्राध्यापकांच्या भेटीमुळे शिबीरार्थी मुलांचा उत्साह द्विगुणीत झाला. शिबीराचा समारोप मा.डॉ.चिंचोलकर, फोर्ड फौंडेशन उ.म.वि., प्रा.विलास चव्हाण, डॉ.हुंडीवाला, प्राचार्य अनिल राव यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

विद्यार्थ्यांचे यश :-

राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक विद्यापीठस्तर शिबीरात सहभागी झाले होते. दिनकर कोल्हे, व मिलींद बोटे हे विद्यार्थी उत्तर महाराष्ट्रातील विद्यापीठातील शिबीरात सहभागी झाले होते. गांधी विचार परिषद उपविभागांतर्गत चोपडा येथील शिबीरात विलास पारधी व सुकदेव सडगी सहभागी झाले. मु.जे. महाविद्यालयाचा सर्वोत्कृष्ट विद्यार्थी म्हणून रा.से.यो. ची गटप्रमुख वर्षा टोके हिची निवड झाली ही उल्लेखनिय बाब आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचा गटप्रमुख अमर पाटील याची महाविद्यालय विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून निवड झाली. रा.से.यो. च्या महाविद्यालय परिसर, जळगाव शहर, दत्तक गाव कानसवाडा येथे राबविताना महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक वर्ग व शिक्षकेतर कर्मचारी कानसवाडा गावचे सरपंच, श्री.नारायण सोनवणे, ग्रामस्थ, सरकारी अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.ए.एस.भोळे प्रा.विद्या व्यवहारे, प्रा.पालवे, प्रा.पी.बी.चौधरी, प्रा.करुणा सपकाळे, रा.से.यो. तील गटप्रमुखांचे विशेष सहकार्य लाभले.

प्रा.एन.डी.चौधरी **प्रा.एन.व्ही.भारंबे**
कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना.

विद्यार्थी आणि विद्यार्थिनी वसतिगृह

सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षात विद्यार्थी विद्यार्थिनींच्या वसतिगृहात एकूण ३२५ विद्यार्थी, विद्यार्थिनींची निवासाची उत्तम व्यवस्था होती. ह्यावर्षी विद्यार्थिनींच्या नवीन वसतिगृहाच बांधकाम पूर्ण होत आहे. त्यामुळे पुढील वर्षी जास्तीत जास्त विद्यार्थिनींची राहण्याची व्यवस्था होईल.

वसतिगृहात परंपरेप्रमाणे अनेक विधायक आणि सृजनशील उपक्रम घेण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांना चालना मिळाली. वसतिगृहातील विद्यार्थी विद्यार्थिनींचा शारीरिक आणि मानसिक विकास व्हावा या दृष्टीने डॉ.प्रकाश पाटील यांचे 'आपले आरोग्य आणि त्वचेची निगा' या विषयावर उद्‌बोधक व्याख्यान आयोजित केले होते. विद्यार्थिनींसाठी डॉ.सौ.सरोदे यांचे मार्गदर्शन लाभले. ते खेड्यापाड्यातून येणाऱ्या विद्यार्थिनींसाठी हितावह ठरले. विद्यार्थ्यांना राष्ट्र आणि संस्कृती याची जाणीव व्हावी म्हणून श्री. सौमित्र गोखले यांचे ''सांस्कृतिक राष्ट्रवाद'' या विषयावर भाषण झाले त्यावेळी वक्त्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे समाधानही केले.

विद्यार्थी-विद्यार्थिनींनी वर्षभरात स्वतः अनेक कार्यक्रमांची आखणी करुन त्यात ते सहभागी झाले. विद्यार्थ्यांनी कथाकथन काव्यवाचन इ. कार्यक्रम उत्कृष्टपणे आयोजित केले होते. तर विद्यार्थिनींनी सांस्कृतिक कार्यक्रमाबरोबर वादविवाद, बुध्दिमत्ता चाचणी, सहभोजन इ. कार्यक्रम राबविले. या कार्यक्रमांमुळे विद्यार्थी-विद्यार्थिनी कार्यक्रमांचे नियोजन कसे करावे, हे शिकले तसेच त्यांच्या अंगी बोलण्याचं धाडस आलं, एकतेची भावना वाढीस लागली.

वसतिगृहाच आगळ वेगळ वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थी-विद्यार्थिनींनी स्वतंत्रपणे क्लबपध्दतीने चालवलेली मेस. वसतिगृहाच्या उज्वल परंपरेप्रमाणे याही वर्षी मेसमधील कर्मचाऱ्यांना स्नेहापोटी विद्यार्थ्यांकडून भेटवस्तु देण्याचा कार्यक्रम आयोजित केला गेला. त्या कार्यक्रमाला विद्यापीठातील मुलांच्या वसतिगृहाचे रेक्टर डॉ.सुधीर चिंचोलकर उपस्थित होते. त्यांच्या हस्ते भेटवस्तु वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. तसेच त्यांचे मार्गदर्शनपर भाषण ही झाले. नंतर सहभोजनाचा कार्यक्रम झाला.

'कमवा आणि शिका' या योजनेअंतर्गत गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी सहकार्य केले जाते. यावर्षी सदर योजने अंतर्गत मेसमध्ये काम करणाऱ्या व मु.जे. महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या किरण चव्हाण (एम.ए. हिंदी) या विद्यार्थ्यास पाटील-पोतनीस पारितोषिक देण्यात आले.

वसतिगृहाचे कामकाज यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी प्राचार्य अनिल राव तसेच सर्व उपप्राचार्य यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. विद्यार्थी प्रतिनिधी आणि कर्मचारी यांनी सर्व कामकाजास उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. वसतिगृहात बंधुभावाचे व खेळीमेळीचे वातावरण राहिले त्यामुळे सर्व अभिनंदनास पात्र आहेत.

प्रा.डॉ.सौ.एम.एम.जावळे — विद्यार्थिनी वसतिगृह प्रमुख

प्रा.डॉ.एस.एस.राणे — विद्यार्थी वसतिगृह प्रमुख

नियोजन मंडळ,

१९९९-२००० या शैक्षणिक वर्षातील मु.जे. महाविद्यालयाच्या नियोजन मंडळाचा अहवाल सादर करतांना मला आनंद होत आहे. यावर्षी नियोजन मंडळाचे उद्‌घाटन उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य आणि अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिवाजीराव सावंत यांचे हस्ते झाले. यावेळी प्रा.सावंत यांचे 'भारत-काल आणि आज' या विषयावर व्याख्यान झाले. आपल्या अभ्यासपूर्ण व्याख्यानात त्यांनी स्वातंत्र्योत्तर काळातील भारतातील आर्थिक परिस्थितीचा आढावा घेतला आणि कोणकोणत्या कारणांमुळे भारतीय अर्थव्यवस्था विकासाचा मोठा दर कां गाठू शकली नाही याचे विवेचन केले. तसेच भविष्यकाळात भारतीय अर्थव्यवस्था आणखी प्रगतिशील होण्याच्या दृष्टीने कोणकोणत्या गोष्टींचा अवलंब केला पाहिजे याचे मार्गदर्शन केले.

नियोजन मंडळाच्या वतीने दूसरे व्याख्यान रिझर्व बँकेचे अधिकारी माननीय श्री. दीपक नामजोशी यांचे ठेवण्यात आले होते. त्यांच्या व्याख्यानाचा विषय 'Reserve Bank Of India-A Friend, Guide and Philosopher' असा होता. त्यांनी आपल्या व्याख्यानात रिझर्व बँकेच्या सर्वसाधारण कामकाजाची तसेच विशेषतः बँकेच्या विनिमय व्यवहारांची सखोल माहिती सांगितली. तसेच सरकारची उध्दिष्ट्ये रिझर्व बँक आपल्या धोरणातून कशी साधण्याचा प्रयत्न करते याचे विवेचन केले.

नियोजन मंडळाच्या वतीने तिसरे व्याख्यान पाचोरा कॉलेजमधील अर्थशास्त्राचे प्रा.अरुण पिसे यांचे ठेवण्यात आले होते. त्यांच्या व्याख्यानाचा विषय 'सेट परीक्षेची तयारी' असा होता. पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थ्यांना सेट परीक्षेसंबंधी माहिती व्हावी या उद्देशाने हे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

अशारितीने नियोजन मंडळाच्या वतीने तीन वेगवेगळ्या विषयांवर विविध तज्ञ मान्यवरांची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती-आणि त्याचा लाभ पदवी व पतव्युत्तर वर्गातील विद्यार्थ्यांना झाला. (नियोजन मंडळ विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सर्वांगीण विकासासाठी नेहमीच वेगवेगळे उपक्रम राबवीत असते. या सर्व व्याख्यानांना विद्यार्थी वर्गाचा प्रचंड प्रतिसाद लाभला.)

नियोजन मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सर्व कार्यक्रमांना पुढील सर्व सभासद प्राध्यापकांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

१) प्रा.जे.एम.अग्रवाल
२) प्रा.पी.एम.कोठारी
३) प्रा.पी.आर.चौधरी
४) प्रा.डॉ.सौ.शोभा नेमाडे
५) प्रा.एन.एस.बोरसे
६) प्रा.अविनाश निकम

प्रा. महेश बडवे
चेअरमन, नियोजन मंडळ.

वाद-विवाद मंडळ

१९९९ ते २००० या शैक्षणिक वर्षाकरता मु.जे. महाविद्यालय, जळगांव तर्फे वाद-विवाद मंडळाचा अहवाल सादर करीत असतांना आनंद होत आहे. या वर्षात विविध ठिकाणी सादर झालेल्या वाद-विवाद आणि वक्तृत्व स्पर्धेत विजयी स्पर्धकांचा आढावा पुढील प्रमाणे-

१) दि. २९,३० ऑक्टोबर १९९९ रोजी चाळीसगांव येथे झालेल्या वादविवाद स्पर्धेत उत्तेजनार्थ बक्षीस सचिन जोशी (एम.ए.सिनी.) यास मिळाले. तसेच वक्तृत्व स्पर्धेचे तिसरे पारितोषिकही याच विद्यार्थ्यास प्राप्त झाले.

२) ५ डिसेंबर १९९९ रोजी आरोग्य विभाग जळगांवतर्फे 'एडस्-नियंत्रण' उपक्रमाअंतर्गत घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत मंगेश महाजन (जर्नेलिझम) यांस प्रथम क्रमांकाचे बक्षिस मिळाले. या स्पर्धेचा विषय होता 'नव्या सहस्त्रकातील एडस्चे आवाहन'!

३) २७ डिसेंबर १९९९ ला व.वा.वाचनालय, अत्रे प्रतिष्टान, तर्फे-'उमेदवारास किमान शैक्षणिक पात्रतेची आवश्यकता' या विषयावर वादविवाद स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेमध्ये सचिन जोशी (एम.ए.सिनी.) याने उत्तेजनार्थ बक्षिस मिळवले. तर कु. वृषाली पाठक (एफ.वाय.बी.ए.) या विद्यार्थिनीनेही सहभाग घेतला होता.

४) दि. ३-१-२००० मध्ये सामाजिक वनिकरण विभाग जळगांव, यांच्या वतीने आयोजित वक्तृत्व स्पर्धेत मंगेश त्र्यंबक महाजन (जर्नेलिझम) यास प्रथम क्रमांकाचे पारितोषिक (५००रु.) प्राप्त झाले. स्पर्धकाने सामाजिक वनीकरण चळवळीत वृक्षसंरक्षणात जनतेचा क्रियाशील सहभाग या मुद्यावर विचार मांडले.

५) १५ जाने. २००० रोजी चोपडे येथील सौ.शरदचंद्रिका पाटील-आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेत मंगेश महाजन यास तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

डॉ. सौ. बिराजदार एस.टी.
चेअरमन

युवती-सभा (कनिष्ठ महाविद्यालय)

जळगाव, मुळजी जेठा कनिष्ट महाविद्यालयातील युवती-सभेचे उद्घाटन जळगाव येथील महिला महाविद्यालयाच्या प्राचार्या सौ.मंगला जंगले यांच्या शुभ हस्ते झाले. त्यावेळी युवती सभेचे प्रयोजन सांगून युवती सभेद्वारे विद्यार्थिनींच्या कला गुणांना कोणकोणत्या प्रकारचे उपक्रम राबविले जातात. याविषयी युवती सभेच्या अध्यक्षा प्रा.करुणा सपकाळे यांनी प्रास्ताविक केले.

त्यानंतर १४ सप्टेबर या दिवशी हिन्दी दिनानिमित्त महाविद्यालयात, युवती सभेतर्फे युवा मंचच्या अध्यक्षा सौ.उमा शर्मा यांनी हिन्दी दिनाचे महत्व पटवून दिले.

कनिष्ट महाविद्याल्याच्या विद्यार्थिनींसाठी संस्कार भारती तर्फे रांगोळी प्रशिक्षण वर्गाचे तीन दिवस आयोजन केले होते. तीन दिवस चालणाऱ्या या वर्गाला गीता रावतोळे, नयना कासखेडीकर व अनिता नाईक यांनी मार्गदर्शन केले. शिबिरासाठी युवती सभेच्या अध्यक्षा प्रा.करुणा सपकाळे तसेच प्रा.सौ.लता पाटील, प्रा.सौ.उषा सावंत, प्रा.सौ.ललिता वाणी, प्रा.सौ.रेखा मुजुमदार, प्रा.श्वेता खडसे यांनी परिश्रम घेतले.

प्रा.करुणा सपकाळे
अध्यक्षा, युवती सभा

युवती-सभा कार्यकारीणी सदस्य

१) प्रा. सौ.उषा सावंत
२) प्रा. सौ.लता पाटील
३) प्रा. सौ.ललिता वाणी
४) प्रा. सौ.रेखा मुजुमदार
५) प्रा. सौ.सुजाता देशपांडे
६) प्रा. श्वेता खडसे

जिमखाना विभाग (वरीष्ठ महाविद्यालय)

१९९९-२००० या शैक्षणिक वर्षात आमच्या महाविद्यालयाच्या विविध खेळात खेळाडुंनी समाधानकारक कामगिरी बजावली आहे. आमच्या महाविद्यालयाने आंतर महाविद्यालयीन १८ संघांमध्ये भाग घेतला होता.

१) टेबल टेनिस :- या स्पर्धा जळगाव येथील यु.एम.सी.सी. कॉलेज येथे संपन्न झाल्या. त्यात आमच्या संघाने पी. जी. जिमखाना या संघाचा ३-१ ने पराभव करुन अंतीम सामना जिंकला. त्यात १)श्रीपाद जोशी २) श्री शैलेश जाधव ३) मोहन पाठक यांची विभागीय संघात निवड झाली.

२) बास्केटबॉल (स्त्री/पुरुष) :- या स्पर्धा जळगावच्या नुतन मराठा कॉलेज येथे संपन्न झाल्या. आमच्या महाविद्यालयाचे दोन्ही संघ उपविजयी राहुन कु. वैशाली चौधरी, कु. जागृती चौधरी व कु. वैशाली वाणी, श्री सुनिल पाटील, श्री मुकेश ठाकुर, श्री प्रमोद चौधरी व श्री आनंद कुकरेजा यांची जळगाव विभागाच्या संघात निवड झाली.

३) बॉल बॅडमिंटन :- या स्पर्धेचे आयोजन आमच्याच महाविद्यालयात करण्यात आले. यात पुरुषांचा संघ विजयी तर महिलांचा संघ उपविजयी राहीला. यातील श्री अतुल सिंग हाडा, श्री रणजित राणे व श्री रियाजअली सैय्यद, कु. तृप्ती पाटील, कु. प्रिया साळूंखे, कु. स्नेहल कानडे यांची जळगाव विभागाच्या संघात निवड झाली.

४) हॅण्डबॉल (पुरुष) :- या स्पर्धा धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर येथे संपन्न झाल्या. अंतीम सामन्यात फैजपूर विरुध्द पराभव झाला. आमच्या संघातील अनिल बडगुजर, संदीप पाटील, शिरीष शिरसाळे, व सत्यजित नेमाने या खेळाडूंची जळगाव विभागाच्या संघात निवड झाली.

५) बुध्दीबळ :- या स्पर्धा जे. टी. महाजन इंजिनिअरिंग कॉलेज फैजपूर येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यात १८ संघांनी भाग घेतलेला होता. आमचा संघ १५ पैकी १२ १/२ गुण मिळवून उपविजयी झाला. यांत श्री आशिष मलबारी यांची जळगाव विभागाच्या संघात निवड झाली.

महाविद्यालयातील ज्या खेळाडूंची विभागीय संघात निवड झाली ते खेळाडू खालील प्रमाणे -

१) फुटबॉल :- श्री जयदीप रविंद्रसिंग पाटील.
२) बॅडमिंटन :- श्री प्रशांत जवखेडकर, कु. पुजा कुळकर्णी.
३) कबड्डी :- श्री ठाकरे किरण पांडुरंग.
४) खो खो :- श्री सैंदाणे अनंता, कु. भावना कोल्हे, कु. आशा बावीस्कर.
५) बास्केटबॉल :- कु. जागृती चौधरी, कु. वैशाली वाणी, श्री सुनिल पाटील, श्री आनंद कुकरेजा, श्री मुकेश ठाकुर, श्री प्रमोद चौधरी.
६) हॉकी :- शेख रफिक, शेख तनवीर, इम्रानखान, दाऊदखान.
७) मैदानी स्पर्धा (लांबउडी) :- कु. उषा आयाती.

१९९९-२००० या शैक्षणिक वर्षात आमच्या महाविद्यालयातील खालील खेळाडूंनी विविध खेळामध्ये सहभाग घेतला व त्यात नैपुण्य दाखवून उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संघात सहभागी होऊन आपल्या क्रीडागुणांचे प्रदर्शन केले.

''जिमखाना-डे १९९९-२०००''

वर्षभरातील संपन्न होत असलेल्या विविध क्रीडास्पर्धांमध्ये नैपुण्य मिळविणाऱ्या खेळाडुंचे कौतुक व गौरव करण्याच्या मुख्य हेतुने महाविद्यालयात

अ.नं.	खेळाडुचे नाव	खेळाचे नाव	विद्यापीठ/स्थळ
१)	श्री श्रीपाद अशोक जोशी	टेबल टेनिस	ग्वाल्हेर विद्यापीठ
२)	श्री शैलेश विश्वनाथ जाधव	टेबल टेनिस	ग्वाल्हेर विद्यापीठ
३)	श्री मोहन अशोक पाठक	टेबल टेनिस	ग्वाल्हेर विद्यापीठ
४)	श्री विजय काशिनाथ पाटील	ॲथलेटिक्स	ग्वाल्हेर विद्यापीठ
५)	श्री विजय काशिनाथ पाटील	व्हॉलीबॉल	अमरावती विद्यापीठ
६)	कु. भावना पंडीत कोल्हे	व्हॉलीबॉल	परभणी विद्यापीठ
७)	कु. स्नेहल विजय कानडे	सॉफ्टबॉल	रोहतक विद्यापीठ
८)	कु. तृप्ती एकनाथ पाटील	सॉफ्टबॉल	रोहतक विद्यापीठ
९)	कु. प्रिया गुलाबराव साळुंखे	सॉफ्टबॉल	रोहतक विद्यापीठ
१०)	कु. भावना पंडीत कोल्हे	सॉफ्टबॉल	रोहतक विद्यापीठ
११)	श्री देवेंद्र चौधरी	सॉफ्टबॉल	रोहतक विद्यापीठ
१२)	श्री रणजित अरविंद राणे	सॉफ्टबॉल	रोहतक विद्यापीठ
१३)	श्री योगेश रविंद्र सावंत	क्रिकेट	भोपाळ विद्यापीठ
१४)	कु. वैशाली देविदास चौधरी	बास्केटबॉल	तिरुअनंतपुरम मद्रास विद्यापीठ.

''जिमखाना-डे'' साजरा करण्याचे आयोजन केले जाते. ह्यावर्षी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी संचालक मा.प्रा.पी.जी.अभ्यंकर व रेल्वेत कार्यरत असलेले श्री मधु भावसार, उत्कृष्ट हॉकी खेळाडू यांना आमंत्रित केले होते. या दोन्ही मान्यवरांचा प्रा. नारायण खडके यांनी थोडक्यात परीचय करुन दिला. व त्यांच्या शुभ हस्ते विद्यापीठ खेळाडू, विभागीय खेळाडू तसेच विजयी व उपविजयी संघांचे खेळाडू यांना स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य अनिल राव होते. याच प्रसंगी जिमखाना कमेटीतील सर्व प्राध्यापकांचा पुष्प व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. जिमखाना विभागात कार्यरत असलेले श्री मोहन तायडे यांची प्रयोगशाळा सहाय्यक पदी पदोन्नती झाल्याबद्दल प्रा.पी.जी.अभ्यंकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्र संचलन व आभार प्रदर्शन प्रा. नारायण खडके यांनी केले.

जिमखाना विभागाच्या विशाल कारभारात मला मा. प्राचार्य अनिल राव उपप्राचार्य पी.एल.कोल्हे, डॉ.एस.एस.राणे, एम.डी.बोंडे तसेच जिमखाना कमेटी सदस्य प्रा.चारुदत्त गोखले, प्रा.बी.एम.महाजन, प्रा.संजय हिंगोणेकर, प्रा.बी.आर.रडे, प्रा.एम.एम.परदेशी, प्रा. कु.कल्पना नंदनवार, प्रा.कु.पालवे, प्रा.सौ.प्रज्ञा जंगले, प्रा.एम.एम.बडवे, प्रा.ए.पी.चौधरी, डॉ.आर.टी.चौधरी, कार्यालयातील कुलसचिव एम.जी.नारखेडे, श्री विजय भोळे, श्री अशोक पाटील श्री डी.पी.चौधरी, श्री एन.बी.शिंपी व श्री ए.सी.मन्सुरी, श्री मोहन तायडे व श्री संतोष मनुरे यांचे विशेष सहकार्याबद्दल तसेच वेळोवेळी विद्यार्थ्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे.

प्रा. नारायण शंकर खडके,
क्रीडा विभाग प्रमुख,
मु.जे. महाविद्यालय, जळगाव.

जिमखाना (कनिष्ठ महाविद्यालय)

११ वी व १२ वी मध्ये शिकत असलेले विद्यार्थी प्रत्येक वर्षी क्रीडा स्पर्धेत बहुसंखेने भाग घेत असतात. सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षामध्ये सुध्दा विद्यार्थ्यांनी वैयक्तिक तसेच सांघीक क्रीडा स्पर्धेत भाग घेतलेला आहे. त्यांच्या जय-पराजयाचे मुल्यांकन खालील प्रमाणे :-

तालुका पातळीवर बास्केटबॉल (मुले), बॅडमिंटन (मुले), बॅडमिंटन (मुले), बुध्दीबळ (मुली), टेबल टेनिस (मुले) हे संघ विजयी झालेत तर बुध्दीबळ (मुले) ह्या संघातून दर्शन परदेशी व स्वप्नील पाटील ह्या दोन खेळाडूंची उत्कृष्ट खेळाडू म्हणून निवड झाली. तसेच सदरचे संघ विजयी झालेत.

पोहणे व बेसबॉल ह्या स्पर्धा तालुका पातळीवर होत नाहीत; त्या जिल्हास्तरावर खेळल्या जातात. जे संघ तालुका पातळीवर विजयी होतात. त्यांना जिल्हास्तरावर खेळण्याची संधी मिळत असते. त्यानुसार आपले वरील संघ जिल्हास्तरावर खेळलेत व वरील सर्वच्या सर्व संघ जिल्हा स्तरावर विजयी झालेत.

विभागीय स्तरावर पोहण्याच्या स्पर्धेत आपल्या महाविद्यालयातील खालील विद्यार्थी विजयी झालेत.

१) निखील चंद्रकांत सुरतवाला--२०० मीटर बॅक स्ट्रोक व १०० मी. बटर फ्लाय

२) राहित भागवत पाटील- १०० मी. बॅक स्ट्रोक

३) प्रशांत अरविंद फाळके- १०० मीटर फ्रीस्टाईल

४) सौरभ महेंद्र कोठारी- १०० व २०० मी. ब्रोस्ट स्ट्रोक

५) परेश दिलीप लड्ढा- २०० मीटर बटर फ्लाय

या शैक्षणिक वर्षाच्या कालावधीत जिमखाना समिती चेअरमन प्राचार्य ए.जी.राव, समिती सदस्य, व उपप्राचार्य एम्.डी.बोंडे, उपप्राचार्य एस्.आर.राणे, उपप्राचार्य पी.एल.कोल्हे तसेच क्रीडा प्रेमी मित्र या सर्वांचे बहुमोल मार्गदर्शन व सहकार्य लाभले. यामुळेच मी, कनिष्ठ जिमखान्याचे कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडू शकलो. याबद्दल मी सर्वांचा ऋणी आहे.

प्रा.पी.डी.तळेले.
क्रीडा प्रमुख.

ग्रंथालय वार्ता

ग्रंथालय अधिक समृध्द होण्यासाठी या वर्षी पुस्तकांसाठी १,९९,००० रु.चे नियोजन करण्यात आले होते. त्यातुन १३०९ ग्रंथाची खरेदी करण्यात आली. या शिवाय ग्रंथालयात विविध विषयांवरील एकूण १६० नियतकालिका येत आहेत.

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना निवांतपणे ज्ञानार्जन करण्यासाठी प्रशस्त जागा व मुबलक पाठ्यपुस्तके उपलब्ध व्हावीत या दृष्टीने ग्रंथालयाने स्वतंत्र वाचन कक्षाची सोय केलेली असून वाचन कक्षात सर्व प्रकारची क्रमिक पुस्तके, वर्तमानपत्रे, प्रश्नपत्रिका संच, स्पर्धा परीक्षा साठी लागणारी पुस्तके इ. उपलब्ध करुन दिली. जातात. या सर्वांचा जास्तीत जास्त लाभ विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी वाचन कक्ष सकाळी ७ वाजे पासुन रात्री १० वाजे पर्यंत अखंड सुरु असते. या संधीचा फायदा अधिकाधिक गरजू व अभ्यासु विद्यार्थी घेत असतात.

विद्यापीठ अनुदान मंडळाकडुन मंजुर झालेल्या अनुदानातुन व कॉलेज कार्यकारी मंडळाने मंजुर केलेल्या निधीतुन ग्रंथालयाच्या तिसऱ्या मजल्याचे बांधकाम प्रगतिपथावर आहे. ग्रंथालयाचे कामकाज सुविहीतपणे वर्षभर चालू असते. प्राचार्य ए.जी. राव उपप्राचार्य श्री. पी.एल. कोल्हे उपप्राचार्य श्री. एम.डी. बॉडे उपप्राचार्य श्री. एस.एस. राणे लायब्ररी इनचार्ज प्रा. एस.एम. छापेकर, ग्रंथालय समितीतील सदस्य प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी वर्ग, ग्रंथालय कर्मचारी व अन्य विभागातील कर्मचारी वर्ग या सर्वांचे मनःपूर्वक सहकार्य लाभले. या बद्दल त्यांचे हार्दिक आभार.

श्री. प्र.दे. बऱ्हाटे.
ग्रंथपाल, मु.जे. महाविद्यालय, जळगांव.

साहित्य मंडळ (अहवाल)

ह्या वर्षी साहित्य मंडळाचे उद्घाटन दि. २१-८-९९ रोजी पुणे येथील सुप्रसिध्द साहित्यिक, विचारवंत डॉ. श्री. प्र.ल. गावडे यांच्या हस्ते झाले. उद्घाटन प्रसंगी त्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर - व्यक्ती आणि काव्य ह्या विषयावर अतिशय अभ्यासपूर्ण विचार मांडले.

दि. १-१०-९९ रोजी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कलाशाखेचे अधिष्ठाता डॉ. रविकीरण झोळ यांचा 'हसवाहसवी' हा विनोदात्मक कार्यक्रम आयोजित केला होता.

मुंबई येथील पॅराफलेजिकल संस्थेच्या अध्यक्षा सौ. सुलभा वर्दे यांनी आपली संस्था आणि तेथील उपक्रम यासंबंधी विद्यार्थ्यांना माहिती दिली. सुप्रसिध्द ललित साहित्यिक प्रा. रविंद्र पिंगे यांनी मला आवडलेली पुस्तके ह्या विषयावर विद्यार्थ्यांना मौलिक असे मार्गदर्शन केले.

सध्या नाशिक येथे वास्तव्यास असलेल्या 'मराठी' विषयाच्या प्राध्यापिका आणि ग्वाल्हेर येथील महाविद्यालयातून सेवानिवृत्त झालेल्या आपल्या महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थीनी प्रा. डॉ. सौ. जोशी यांनी आपल्या महाविद्यालयीन जीवनातील अनुभव सांगून विद्यार्थ्यांना भावी जीवनाच्या वाटचालीत उपयुक्त ठरतील, असे विचार मांडले.

डोंबिवली येथे झालेल्या अ.भा.वि. परिषदेने आयोजित केलेल्या ''प्रतिभा-संगम'' ह्या विद्यार्थी-साहित्य संमेलनात आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थिनी कु. मानसी राजे हिच्या स्वरचित कथेला कथाकथन स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. कु. मानसीचे मनःपूर्वक अभिनंदन!

प्रा. सौ. चारुता गोखले
अध्यक्ष, साहित्य मंडळ.

एन्.सी.सी.

१९९९-२००० या शैक्षणिक वर्षात राष्ट्रीय छात्र सेनेच्या २६६ विद्यार्थी व ५४ विद्यार्थीनींनी छात्रसेनेच्या प्रशिक्षणाचा लाभ घेतला. वर्षभरात N.C.C. प्रशिक्षणाबरोबरच अनेक सामाजिक कार्यांमध्ये ते सहभागी झालेत. उदा. वृक्षारोपण, रक्तदान, पल्स पोलीओ अभियान, ग्रामीण भागाचे सर्वेक्षण, स्वच्छता इत्यादी.

दरवर्षी प्रमाणे या वर्षीही आपल्या महाविद्यालयाच्या क्रिडांगणावर प्रजासत्ताक दिनाच्या वेळी दिल्ली येथे होणाऱ्या कॅम्पच्या प्रोसीजर मधील महिला बटालीयन लेव्हलचा ''ग्रुप सिलेक्शन'' कॅम्प घेण्यात आला. त्यात आपल्या महाविद्यालयाचे छात्र सैनिक मोठ्या संख्येने सहभागी झालेत. या शिबीरातून पुढे आकोला येथील कॅम्पकरीता SUO राहुल चौधरी, UO निखील चौधरी, UO समीर घोडेस्वार, SGT रविन्द्र घुगे, जितेन्द्र गावित व इतर २० विद्यार्थी तसेच SGT भारती भारंबे, अल्पना टेकाडे व इतर २० विद्यार्थीनी गेल्यात. या विद्यार्थीनींनी द्वितीय क्रमांक मिळविला.

या वर्षी बेसिक लीडरशीप कॅम्प (ग्रुप सिलेक्शन) यवतमाळ येथे घेण्यात आला. त्यात आपल्या महाविद्यालयातील २० विद्यार्थी सहभागी झालेत. विद्यार्थीनींचा बेसीक लीडरशीप कॅम्प अमरावती येथे घेण्यात आला. त्यात भावना मोहिते हिला 'मेडीकल' या विषयात सुवर्णपदक तसेच कविता नांदगांवकर या विद्यार्थीनीस 'सिग्नल' या विषयात सुवर्णपदक मिळाले व या दोघी विद्यार्थीनी राज्यस्तरावरील कॅम्पसाठी निवडल्या गेल्या.

विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय स्तरावरील एकात्मता शिबीर आंध्रप्रदेश मधील वरंगळ येथे पार पडले. त्यात आपल्या महाविद्यालयातील २६ विद्यार्थी तसेच एन्.सी.सी. ऑफीसर मेजर एस्.एम्. रडे हे सहभागी झालेत. या कॅम्पमध्ये संपूर्ण देशातील ७२५ छात्रसैनिक हजर होते. ऑल इंडीया कॅम्पचे नेतृत्व आपल्या महाविद्यालयाचा छात्रसैनिक SUO अमित जाखेटे याने केले. तसेच गार्ड ऑफ ऑनरचे प्रथम पारितोषिक ही आपल्याच महाविद्यालयाला मिळाले. विद्यार्थीनींचा राष्ट्रीय एकात्मता कॅम्प आंध्रप्रदेशातील करनुल येथे घेण्यात आला. त्यात आपल्या महाविद्यालयातील पूनम केदार व भावना मोहिते या सहभागी झाल्यात. पूनम केदार हिने कबड्डी चे नेतृत्व केले, तसेच तिला निबंध स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचे बक्षिस मिळाले.

महाविद्यालयात 'सद्भावना दिवस' तसेच एन.सी.सी. दिवस ही मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून १८ महाराष्ट्र बटालीयनचे कमांडींग ऑफीसर लेफ्टनंट कर्नल केशरीसिंग हे उपस्थित होते.

महाराष्ट्र सरकारतर्फे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. एस्.एफ. पाटील यांना अमरावती ग्रुपचे ग्रुप कमांडर कर्नल डी.डी.पी. थोरात यांच्या हस्ते 'कर्नल कमांडर' हा बहुमान देण्यात आला. या प्रसंगी दिलेल्या मानवंदनेत आपल्या ५३ छात्रसैनिकांचा सहभाग होता. व या परेडचे नेतृत्व S.U.O. अमीत जाखेटे यांनी केले. याच समारंभात आपल्या महाविद्यालयातील पाच विद्यार्थी व दोन विद्यार्थीनींना शिष्यवृत्ती देण्यात आली.

प्राचार्य अनिल राव यांच्या मार्गदर्शनाखाली व अमरावती ग्रुप चे ग्रुप कमांडर कर्नल डी.डी.पी. थोरात यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या छात्रसैनिकांसाठी ''ऑप्सटीकल ग्राऊंड'' चे भूमीपूजन करण्यात आले.

विधानसभा व लोकसभा निवडणूक प्रक्रीयेत आपल्या छात्रसैनिकांनी केलेल्या कामाबद्दल शासनाकडून प्रमाणपत्र देण्यात आलेत. या वर्षीचे वार्षिक प्रशिक्षण शिबीर 'कानळदा' येथे घेण्यात आले. यात आपल्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करुन प्रथम क्रमांक पटकाविला व 'चॅम्पीयनशीप ट्रॉफी' जिंकली. संपूर्ण कॅम्पचे नेतृत्व कॅम्प सिनीअर SUO अमित जाखेटे याने केले. विद्यार्थीनींचे वार्षिक प्रशिक्षण शिबीर अमरावती येथे आयोजित करण्यात आले होते. यात २२ विद्यार्थीनी सहभागी झाल्यात आणि फायरींग, मेडीकल, प्रथमोपचार व ड्रील यामध्ये बक्षिसे मिळवीलीत.

दिल्ली येथे होणाऱ्या दोन्ही राष्ट्रीय स्तरावरील शिबीरामध्ये आपल्या छात्रसैनिकांचा सहभाग व आपल्या महाविद्यालयाचे केलेले प्रतिनिधित्व ही नक्कीच गौरवास्पद बाब आहे. १९९९ साली दिल्ली येथे झालेल्या BLC. Camp मध्ये SGT कैलास भदाणे, SGT दिपक सोनवणे तसेच SGT कविता नांदगांवकर या तीघांची निवड झाली. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी २६ जानेवारीला दिल्ली येथे होणाऱ्या शिबीरामध्ये SUO राहुल चौधरी याने आपले महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करुन आपली परंपरा कायम ठेवली. नेहमीप्रमाणे ''ड्युक ऑफ एडिरबर्ग'' चे आंतरराष्ट्रीय मेडल आपल्याच महाविद्यालयाला मिळाले ही खरोखरच कौतुकास्पद बाब आहे.

या शैक्षणिक वर्षात 'बी' आणि 'सी' सर्टीफिकेटचा निकाल ९०% लागला. त्यात बहुतांशी विद्यार्थ्यांना 'ए' व 'बी' ग्रेड मिळाली. SUD अमित जाखेटे हा 'B' सर्टीफिकेट 'A' ग्रेड मध्ये उत्तीर्ण होवून अमरावती ग्रुपमध्ये सर्वप्रथम आला. तसेच 'C' सर्टीफिकेटमध्ये SUO जितेन्द्र ठाकरे 'बी' ग्रेड मिळवून सर्वप्रथम आला, हे विशेष उल्लेखनीय.

२६ जानेवरी २००० रोजी सकाळी मा. प्राचार्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर वर्षभराच्या कामगिरीचा आढावा घेण्यात आला. व विशेष प्राविण्य प्राप्त केलेल्या छात्र सैनिकांना मा. प्राचार्यांच्या हस्ते मेडल देण्यात आलेत. तद्नंतर जिल्हा पोलीस ग्राऊंडवर होणाऱ्या परेडमध्ये आपले छात्रसैनिक सामील झालेत. या परेडचे नेतृत्व फ्लाटून कमांडर म्हणून SUD अमित जाखेटे याने तर 2IC-संदीप सानप हा होता. विद्यार्थीनींच्या फ्लाटूनचे नेतृत्व JUO वैशाली वाणी हिने केले तर 2-IC रुपाणी पाटील ही होती.

या व्यतिरीक्त वर्षभरात छात्रसैनिकांनी विविध उपक्रमांमध्ये उस्फूर्त भाग घेतला. मा. कुलगुरु डॉ. एस.एफ. पाटील यांच्या उपस्थितीत विद्यापीठ परिसरात वृक्षारोपण केले. ६० विद्यार्थ्यांनी 'उनपदेव' येथे झालेल्या सायकल एस्पीडीशन मध्ये भाग घेतला. त्यात मेजर एस.एम. रडे आणि कॅप्टन आर.आर. भालसिंग हे दोन्ही एन्.सी.सी. ऑफीसर यांचाही सहभाग होता.

हे सर्व कार्यक्रम राबविण्यात आम्हाला मा. प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक वर्ग व कर्मचारी वर्ग यांचे नेहमी प्रोत्साहन व सहकार्य मिळत राहिले. त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

मेजर
डॉ. प्रा.सौ. मालती जावळे

मेजर
प्रा. एस.एम. रडे

कॅप्टन
प्रा. आर.आर. भालसिंग

परिसर विविधता प्रकल्प अहवाल

गेल्या दोन वर्षापासून आमच्या महाविद्यालयात उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या माध्यमातून अमेरीकेच्या फोर्ड फाऊंडेशन या सेवाभावी संघटने मार्फत ''परिसर विविधता प्रकल्प'' राबविले जात आहेत. फोर्ड फाऊंडेशन द्वारा चालविले जाणारे समाज कार्य पुर्णत्वाकडे नेण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमधील विविधता कायम ठेऊन त्यांच्यातील भेदभाव मिटवून, त्यांच्यात एकत्वाची जाणीव निर्माण व्हावी आणि त्यांच्यातील कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने हे प्रकल्प राबविले जातात. ह्या प्रकल्पातंर्गत महाविद्यालयात विविध विषयावर निबंध लेखन स्पर्धा, परिसर सुशोभिकरण, अनेकविध सांस्कृतिक कार्यक्रम रक्तदान शिबिर, फुडफेस्टिव्हल, व्याख्याने असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमांचे संचालन चांगल्या प्रकारे व्हावे यासाठी विविध समित्या स्थापन करन्यात आलेल्या आहेत.

या वर्षाच्या प्रथम सत्रात निबंध लेखन स्पर्धा समितीद्वारा निबंध स्पर्धेचे आयोजन दिनांक २७-१२-९९ रोजी करण्यात आले होते. स्पर्धेत १५ विद्यार्थी सहभागी झाले होते त्या पैकी-

प्रथथम क्रमांक - कु. आराधना सिंह - द्वितीय वर्ष विज्ञान.

द्वितीय क्रमांक - विकास पुंडलीक निकम - द्वितीय वर्ष कला.

तृतीय क्रमांक - मुरलीधर अशोक चौधरी - एम.ए. प्रथम वर्ष.

यांना मिळाला. वार्षिक स्नेहसंमेलना प्रसंगी प्रमुख पाहुणे प्राचार्य ह.श्री.साने यांच्या शुभहस्ते यशस्वी स्पर्धकांना पारितोषिक प्रदान करण्यात आले. स्पर्धकांच्या निवड कार्याची अवघड जबाबदारी प्रा. सुरेश तायडे आणि त्यांच्या समितीच्या अन्य सदस्यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

दि. ३१-१०-९९ ते २-११-९९ या दरम्यान चाळीसगाव येथील राष्ट्रीय महाविद्यालयाने पाटणादेवी परिसरात ''निसर्ग व व्यक्तीमत्व विकास'' शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरासाठी आमच्या महाविद्यालयाच्या वतीने महेश वाघ-द्वितीय वर्ष वाणिज्य, अविनाश निकम-प्रथम वर्ष कला आणि प्रीती सरोदे-द्वितीय वर्ष कला यांनी संघव्यवस्थापक प्रा. सुरेश तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली भाग घेतला होता.

नंदूरबार येथील जी.पी.टी. कॉलेजच्या वतीने दि. १७-११-९९ ते २३-११-९९ या कालावधीत ''राष्ट्रीय गिरीभ्रमण'' शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबिर महाराष्ट्रातील सुप्रसिध्द पर्यटन स्थळ व थंड हवेचे ठिकाण म्हणून नावाजलेल्या तोरणमाळ येथे आयोजित करण्यात आले होते. सातपुडा पर्वतराजीच्या निसर्गरम्य वातावरणात गिरीभ्रमणाचा हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. या शिबिरासाठी आमच्या महाविद्यालयातून जितेन्द्र शरद ठाकरे या विद्यार्थ्याची निवड करण्यात आली होती. दि. २३-११-९९ रोजी संपन्न झालेल्या समारोप व बक्षिस वितरणाच्या कार्यक्रमाप्रसंगी जितेन्द्र ठाकरे यास बेस्ट ट्रेकरचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. समारोपाप्रसंगी फोर्ड फाऊंडेशनच्या प्रमुख श्रीमती शारदा नायक नवी दिल्ली या आवर्जुन हजर होत्या.

आमच्या महाविद्यालयातील प्राध्यापकांचे तीन दिवसीय निवासी शिबिराचे आयोजन दिनांक २६-११-९९ ते २८-११-९९ या दरम्यान जळगाव येथील सुप्रसिध्द ''जैन हिल्स'' येथे करण्यात आले होते. या शिबिरास मा. प्राचार्य ए.जी.राव तसेच उपप्राचार्य एस.एस.राणे, एम.डी.बोंडे आणि अन्य ३५ प्राध्यापकांनी हजेरी लावली होती. या वास्तव्य शिबिराचे उद्घाटन शिक्षक आमदार अशोक मोडक, मुंबई यांचे हस्ते पार पडले. समारोपा प्रसंगी पुणे विद्यापीठाचे माजी प्र. कुलगुरु डॉ. श.ना. नवलगुंदकर उपस्थित होते. या शिबिरास माजी प्राचार्य एम.ए.झांबरे तसेच मा. प्राचार्य के.बी.पाटील, जयहिंद महाविद्यालय धुळे, प्रा. कपोले, नंदुरबार तसेच जैन इरिगेशनचे मा. अशोकभाऊ जैन इत्यादी मान्यवरांनी सदिच्छा भेट देऊन मार्गदर्शन केले. या शिबिरात प्रार्थना, विचारपुष्प, व्यायाम, सांस्कृतिक कार्यक्रम, विविध विषयांवर चर्चा इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्रा. शरद छापेकर, प्रा. नंदकुमार भारंबे, प्रा. सुरेश तायडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

दिनांक १८,१९,२० डिसेंबर रोजी नवापुर येथील महाविद्यालयाच्या वतीने आदिवासी विद्यार्थ्यांसाठी ''रोजगार मार्गदर्शन व प्रशिक्षण शिबिर'' आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या मा. कुलगुरु डॉ. एस.एफ. पाटील यांचे शुभ हस्ते करण्यात आले. या शिबिरासाठी आमच्या महाविद्यालयातून रविकुमार ठाकूर, विलास पारधी आणि कु. प्रीती सरोदे यांची निवड करण्यात आली होती. संघ व्यवस्थापकाची जबाबदारी प्रा. सुरेश तायडे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली. या शिबिरात उपरोक्त विद्यार्थ्यांनी ''आदिवासींसमोरील २१ व्या शतकातील आव्हाने'' या विषयावर शोध निबंध सादर केले व शिबिरात आयोजित केलेल्या विविध गुणदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होऊन श्रोत्यांची प्रशंसा मिळविली. समारोपा प्रसंगी कु. प्रीती सरोदे तसेच प्रा. सुरेश तायडे यांनी मनोगत व्यक्त करुन उपस्थितांची मने जिंकली. या प्रसंगी मा. प्राचार्य के.बी.पाटील, मा. अ.घ.वसावे अध्यक्ष जि.प. नंदुरबार आणि उ.म.वि.चे

विद्यार्थी कल्याण मंडळाचे प्रमुख प्रा. विलास चव्हाण यांची उपस्थिती विशेषत्वाने जाणवली.

मु.जे. महाविद्यालय - फोर्ड फाऊंडेशनच्या वतीने व्याख्यानमाला आयोजित करण्यात आलेली आहे. या मालेचे प्रथम पुष्प गुंफण्याचा पहिला मान खंडवा (म.प्र.) येथील सुप्रसिध्द लेखक मा. प्रा. श्रीराम परिहार यांना देण्यात आला. ''साहित्य आणि राष्ट्रीय एकात्मता'' या विषयावर त्यांनी अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. पाहुण्यांचा परिचय आणि सूत्रसंचालन प्रा. ए.बी. पाटील यांनी केले.

विद्यावर्धिनी महाविद्यालय-धुळे यांच्या वतीने निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी पत्रकारिता शाखेतील विद्यार्थी मंगेश महाजन याने शोध निबंध सादर केला.

दिनांक ३-१-२००० रोजी महाविद्यालयात परिसर विविधता प्रकल्पांतर्गत फुड फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले होते. त्यात विद्यार्थीनींच्या १४ गटांनी भाग घेतला होता. मुख्य इमारती समोरील रम्य व आल्हाददायक वाटणाऱ्या बगीच्यात विविध पक्वानांचे स्टॉल्स् उभारले होते. स्टॉल्स्वरील चटपटीत व खुमासदार खाद्य पदार्थांचा प्राध्यापक तसेच विद्यार्थ्यांनी आस्वाद घेऊन मनमुराद आनंद लुटला. फुड फेस्टिव्हलच्या यशस्वीतेसाठी प्रा. कु. भारंबे आणि त्यांच्या समितीने बरेच परिश्रम घेतले.

परिसर विविधता प्रकल्पातंर्गत दि. ३-१-२००० रोजी सक्तगट तपासणी आणि रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात ३५ विद्यार्थी आणि ५ प्राध्यापकांनी रक्तदान केले. रक्तदान करणाऱ्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्रा. बी.के.परदेशी, प्रा. जयंत मगर यांनी विशेष परिश्रम घेतले.

जळगाव येथील डॉ. आण्णासाहेब बेंडाळे महिला महिविद्यालयाद्वारा दिनांक ५ ते ८ फेब्रुवारी २००० पर्यंत अनुभव शिक्षण सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यात आमच्या महाविद्यालयांतील विद्यार्थीनी कु. रुद्राणी पाटील, कु. अर्चना वायकोळे, कु. अश्विनी चौधरी, इत्यादी विद्यार्थीनींनी भाग घेतला होता.

प्रा. सौ. मानुधने
समन्वयक

प्रा. एम.एम. परदेशी
समन्वयक

परिसर विविधता प्रकल्प
मु.जे. महाविद्यालय-जळगाव.

नाट्यशास्त्र विभाग

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना कलेचे शास्त्रशुद्ध शिक्षण मिळावे आणि त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून गतवर्षीपासून आपल्या महाविद्यालयात नाट्यशास्त्र विभाग सुरू करण्यात आला. कला शाखेतील विद्यार्थ्यांना नाट्यशास्त्र या विषयाच शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली. नाट्यशास्त्र हा विषय ऐच्छिक असून परिक्षेसाठी ५० गुण (लेखी) व ५० गुण प्रात्यक्षिकासाठी ठेवण्यात आले आहेत. गेल्या वर्षी प्रथम वर्ष कला या वर्गापासून सुरूवात करण्यात आली व यंदा द्वितीय वर्ष कला य वर्गाला सुरूवात झाली. या विषयाचे शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

या विषयाचा अभ्यासक्रम डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागाचे प्रमुख व यंदाच्या अखील भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष श्री.लक्ष्मणराव देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या समितीने तयार केला आहे.या विषयाचे शिक्षण घेतांना नाटक म्हणजे काय ? रंगभूमी म्हणजे काय ? भूमिकेचा अभ्यास कसा करावा ? अभिनयाचा सर्वांगिण अभ्यास, नाट्य तंत्राची ओळख, अभिनयासाठी आवश्यक असणारी प्रात्यक्षिके, व्यायाम, वाचा शुद्धतेसाठी निरनिराळे प्रयोग, वेगवेगळ्या नाटकांचा अभ्यास, रंगभूमिचा इतिहास अश्या वैशिष्ट्यपूर्ण व नाट्यकलेच्या अभ्यासास आवश्यक अश्या दृष्टीकोनातून तयार करण्यात आला. हा विषय शिकविण्यासाठी प्रा. श्री. महेशचंद्र जोशी व मानद् व्याख्याता म्हणून श्री. हेमंत कुळकर्णी काम करीत आहेत.

या विषयाचे शिक्षण घेतांना केवळ वर्गात शिकणे इतपत मर्यादित नसून विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे नाटकाच्या दृष्टीकोनातून आवश्यक असणारे सराव करून घेतले गेले. आवाजाच्या तयारीसाठी स्वर साधना, निवडक नाटकातील उताऱ्यांचे वाचन, योगासने, नाटकातील तंत्राची ओळख व तंत्रसाहित्याची हाताळणी इंप्रुव्हायजेशन्स्, एकांकिकांची निमिर्ती इ. असा सर्वांगिण अभ्यास करून घेण्यात आला. ह्याचा उपयोग विद्यार्थ्यांना लेखी व प्रात्यक्षिक परिक्षेत झाला. गतवर्षिच्या प्रथम वर्ष कला परिक्षेचा नाट्यशास्त्राचा निकाल हा जवळजवळ ९०% लागला. विद्यार्थ्यांनी उत्तम गुण मिळविले.

पुणे विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी 'पुरूषोत्तम करंडक' आहे. मुंबईतील विद्यार्थ्यांसाठी 'उन्मेश' आहे. तशी खान्देशातील विद्यार्थ्यांसाठी एकांकिका स्पर्धा असावी. खान्देशात नाट्य कलावंत व दिग्दर्शक तयार व्हावेत यासाठी मु. जे. महाविद्यालयाच्या नाट्यशास्त्र विभागातर्फे आंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा घेण्यात आली. या एकांकिका स्पर्धेचे हे प्रथम वर्ष.

या स्पर्धेचे उद्घाटन जळगाव आकाशवाणी केंद्राचे प्रमुख श्री. अजीज अन्सारी यांनी केले. यास्पर्धेत बेंडाळे महाविद्यालय, मणियार लॉ कॉलेज, नूतन मराठा महाविद्यालय आणि प्रताप महाविद्याल अमळनेर सहभागी झाले होते. या स्पर्धेला परीक्षक म्हणून श्री. सतिष देशमुख व जळगांव आकाशवाणिचे नाट्य विभाग प्रमुख श्री. सुनिल शिनखेडे हे लाभले होते. स्पर्धेतील पारितोषिक वितरण समारंभ दै. लोकमतचे कार्यकारी संपादक श्री. विजय बाविस्कर यांच्या हस्ते करण्यात आला.

मु. जे. महाविद्यालयाच्या रंगमंचावरून अनेक गुणी कलावंत पुढे आलेले आहेत. रंगभूमी, चित्रपट, दूरदर्शन अश्या विविध कला क्षेत्रात आपले नाव झळकवत आहेत. महाविद्यालयाच्या विविध स्पर्धांमधून हे कलावंत चमकले आहेत. जेव्हा महाविद्यालयीन स्तरावर नाट्यस्पर्धा जोर धरते तेव्हा शहरात या चळवळीला जोर येतो. त्यामुळे महाविद्यालयीन स्तरावर नाट्यउपक्रम वाढवणे हे शहरातील नाट्य चळवळ विकसीत होण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. या स्पर्धेमुळे नाट्यक्षेत्राच्या अपेक्षा उंचावल्या आहेत.

संज्ञापन व वृत्तविद्या विभाग

उत्तर महाराष्ट्र परिसरातील एक शैक्षणिक गरज म्हणून गेल्या तीन वर्षापासून सुरू आलेल्या संज्ञापन व वृत्तपत्र विभागाची यशस्वी वाटचाल सुरू आहे. या शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीला हस्त लिखाणांत 'साप्ताहिक इंद्रधनुष्य', 'क्षितीज', आणि 'वुईकली मिरर' या नियतकांचे उद्घाटन श्री. अजीज अंसारी

(अन्सारी) केन्द्र निर्देशक - आकशवाणी जळगांव यांच्या हस्ते करण्यात आले.

मतदानपूर्व निवडणूक सर्वेक्षण-

या वर्षात घेण्यात आलेल्या लोकसभा व विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीचे औचित्य साधून लोकसभा व सहा विधानसभा मतदार संघाच्या मतदानपूर्व निवडणूक सर्वेक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यात विभागाच्या सर्व विद्यार्थ्यांनी, प्रत्येक मतदार संघात जाऊन मतदानपूर्व सर्वेक्षण केले. या जनमत सर्वक्षणातून निघालेले निष्कर्ष आणि प्रत्यक्ष निवडणूक निकाल अगदी तंतोतंत ठरले हे विशेष उल्लेखनीय.

पत्रकार दिन-

'६ जोनवारी' हा पत्रकार दिन म्हणून साजरा करण्यात आला. त्यात महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी दै. लोकमतचे उपसंपादक श्री. संजय भोकरडोळे यांना महाराष्ट्रसरकारतर्फे 'दर्पण' पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून श्री. सुरेश उज्जैनवार, उपसंपादक दै. सकाळ हे होते.

मान्यवरांच्या भेटी-

वृत्तपत्र विद्या विभागास मा. डॉ. वि. ल. धाउरकर वृत्रपत्र विद्या विभाग प्रमुख - डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांनी भेट दिली व 'प्रगत पत्रकारीता' या विषयावर घेण्यात आलेल्या चर्चेत मार्गदर्शन केले.

'जबाबदार पत्रकारिता' या विषयावर घेण्यात आलेल्या चर्चासत्रात श्री. विजय कुळवेकर - संपादक, दै. सकाळ पूणे यांनी मार्गदर्शक केले.

परिसंवाद-

दिल्ली येथील ''इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ मास कम्युनिकेशन'' या संस्थेत 'वृत्तपत्राचे बदलते स्वरूप व नवीन आव्हाने'' या विषयावर एक परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. त्यात डॉ. हेमंत जोशी यांनी मार्गदर्शन केले. याच संस्थेत झालेल्या 'प्रगत पत्रकारीता' या चर्चासत्रात डॉ. शिवाजी सरकार (आय.एम.सी.) यांचे मार्गदर्शन लाभले.

विभागातील सर्व विद्यार्थी या परिसंवादात व चर्चासत्रात सहभागी झाले होते. त्याचप्रमाणे दिल्ली येथील ''यू. एन. आय.''आणि ''प्रेस कौंसिल ऑफ इंडिया'' **या संस्थांना भेट दिली व तेथील कार्यपद्धती संबंधी माहिती करून घेतली.**

संसद भवनास भेट-

मा. प्रमोद महाजन - संसदीय कामकाज मंत्री व वाय. जी. महाजन, खासदार जळगांव मतदार संघ यांच्या सहकार्याने विभागातील विद्यार्थ्यांनी संसद भवनास भेट दिली व तेथील कामकाज कसे चालते यासंबंधी तसेच लोकसभागृह, राज्यसभागृह आणि सेंट्रल हॉल या संबंधी माहिती करून घेतली.

''एडस्'' पंधरवाड्याच्या निमित्ताने आरोग्य विभाग व जिल्हा एडस् नियंत्रण समिती यांच्या संयूक्त विद्यमाने ''एडस् : नव्या सहस्त्रकातील आव्हान''या विषयावर महाविद्यालयात घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत वृत्तपत्र विद्या विभागातील विद्यार्थी, मंगेश महाजन - प्रथम क्रमांक, संदीप चौधरी - द्वितीय क्रमांक तसेच रविन्द्र ठाकूर - तृतीय क्रमांकाचे मानकरी ठरले.

संशोधनाच्या दिशेने

या शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीलाच आपल्या महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र, प्राणिशास्त्र आणि रसायनशास्त्र या तीन विभागातील प्रयोग शाळेस उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाकडून संशोधन दर्जा प्राप्त झालेला आहे यामुळे आता या तीन विषयात संशोधन करण्याची संधी उपलब्ध झालेली आहे. ही अत्यंत समाधानाची बाब आहे.

सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षात विद्यापीठ अनुदान आयोजित फॅकल्टी डेव्हलपमेंट या योजनेअंतर्गत आपल्या महाविद्यालयातील प्रा. सौ. जी. एम. राणे यांची वनस्पती शास्त्रात तर प्रा. डी. सी. चव्हाण यांची अर्थशास्त्रात डॉक्टरेट करण्यासाठी निवड झाली.

विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे यंदा पुरस्कृत झालेले प्राध्यापकांचे संशोधन प्रकल्प.

Sr.No.	Title of Research Project	Name of Lecturer
1.	Analytical study of Application of Methods of Human Resource	Principal A.G.Rao.
2.	The Image of India in the Novels of Ruth-Prawer Jhabvala	Prof. Mrs. Pradnya Rane.
3.	The study of Problems of English language in higher education	Prof. Mrs. Rajni Bonde.
4.	The Impact of the Financial Sector Reforms on the Performance	Prof. Shekhar Sonalkar.
5.	Evaluation of the Strategies of Teaching Units of Basic Gram	Prof. P.H.Huprikar.
6.	Jaina Philosophy - Critical Analysis of Sabda-Theory in Jaina	Prof. Dr. Miss Suvarna Shete.
7.	Socio-Literary study of Women's Folk-Songs	Dr. Vidya Vyavahare.
8.	Evaluation of some Indegenious Plants for possible insecticidal property.	Prof. S. M. Jawale.
9.	रावेर तालुक्यातील 'वही' या लोक वाङमयाचा अभ्यास	प्रा. डॉ. किसन पाटील
10.	मराठी नाटकातील स्थित्यंतर (१९८०-२०००)	प्रा. सौ. चारुता गोखले
11.	डॉ. आंबेडकरांच्या चळवळीतील राष्ट्रवादी जनजीवनाचा वेग	प्रा. देवेन्द्र इंगळे
12.	स्वातंत्र्योत्तर हिंदी काव्य-नाटकोमें 'मन्धीता'	प्रा. डॉ. वासंती साळवेकर

प्राध्यापकांचे विशेष कार्य

Dr. P.T. Chaudhari

- Awarded Ph.D. of Pune University,

  Title of the Thesis - "An Analytical study of the Monopoly Cotton Procurement Scheme in Maharashtra State."
- Compleited a Minor Research Project & Submitted a final Report to the UGC, Western Regional Office, Poona.
- Research paper published in "Indian Management" The Journal of All India Management, May . 1999 Title- 'Business Education : Indian & American Scenario.'
- Article Published in "Kisan World" March 1999 Title : "Entrepreneurship Development and Women"
- Attended All India Commerce Conference & presented a Research paper entitled - "Business Education : Indian & American Scenario" (29, 30 & 31st Oct.99)
- Attended Maharashtra State Commerce Conference, at Nagpur on Jan.9 & 10, 2000 & presented a Research Paper on Business Education.

Prof. S. M. JAWALE.

Head Of Zoology Dept. of our college presented paper on "Effect of paper mill effluent on development of frog embryo". at U.G.C. sponsered "National conferance cum-workshop on Wetland conservation" held at P.G.Dept. of Zoology, S.R.Rathi Science college Washim, in colloboration of Zoology Dept. of Amravati University and Association of Aquatize Biologist HYdrabad, on 23-25 October 1999. The conferance was inagurated by Hon. Vice-Chaucellar of Amravati University Dr. Deshmukh and Dr. Jain Reginal Secretary UGC was present as chief guest for the function.

Prof. Dr. A.H. Bhole

(Geography Dept.)

Attended National Conference held at Coimtur (Tamilnadu) from 25th Dec. 1999 to 1st Jan. 2000 and presented a research artical. "Role of environment on Socio-economic development of tribals in Jalgaon district". This reserach paper is accented for publication in national level research journal.

Prof. Dr. O.H. Mahajan

(Physics Dept.)

Participated in "International Symposium on Luminescence and its Applications" organised by Applied Physics Department, Faculty of Technology and Engineering, M.S. University of Baroda, Baroda during 7th to 10th Feb. 2000, and presented a paper entitled 'Examination of the Fluorescence of Nacl:Ca:Sr.

प्रा. अविनाश निकम (अर्थशास्त्र विभाग)

शहादा जिल्हा-नंदुरबार येथील पुज्य सानेगुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे सजन इसन पाटील कला, गिरधर बाटकू पटेल विज्ञान व शहादा तालुका खरेदी विक्री संघ वाणिज्य महाविद्यालयात संपन्न झालेल्या ''तापी खोरे सिंचन विकास प्रकल्प'' विषयावरील राज्यस्तरीय परिसंवादात आपला शोधनिबंध सादर केला.

(दिनांक १० फेब्रुवारी २०००)-

विषय - तापी पाटबंधारे विकास महामंडळ-महत्वाकांक्षी ''वाघूर प्रकल्प''.

डॉ. सौ. शोभा नेमाडे

१) मार्च १९९९, 'सहकारी विश्व' या मासिकात लेख प्रकाशित. विषय-'जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक'

२) मे १९९९, 'योजना' या मासिकात लेख प्रकाशित. विषय-'बाल कामगार : एक गंभीर समस्या'.

डॉ. ई. एम. वाठ

प्राणिशास्त्र विभागातील प्रा. डॉ. एकनाथ एम. वाठ, प्रपाठक यांचे मार्गदर्शनाखाली प्रा. राजश्री प्र. वायकोळे, Lecturer, कोटेचा महिला महाविद्यालय, भुसावळ यांना "Effect of toxicants on Physialogy and Biology on Prorobnanch-Melania Terabela (Gray)"

या विषयांवर संशोधन करुन उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव ने पी.एच.डी. (Doctor of Philosophy) प्रदान केली. प्राणिशास्त्र विषयांत त्या विद्यापीठाच्या Ph.D. मिळविणाऱ्या पहिल्या विद्यार्थीनी आहेत.

प्रा. डॉ. किसन पाटील (मराठी विभाग)

- अध्यक्ष-४थे खानदेशस्तरीय साहित्य संमेलन-जळगांव

२९ नोव्हेंबर १९९९

- ''कविता माझी मी कवितेचा'' (कविता संग्रह) पुस्तक प्रकाशित

(मयुर प्रकाशन-जळगांव)

- महाराष्ट्र तत्वज्ञान परिषद, अमळनेर-या राज्यस्तरीय परिषदेत '' भारतीय संस्कृतीचे उपासक-साने गुरुजी'' ह्या विषयावरील शोध निबंध सादर.

- ''सामान्य ज्ञान'' या विषयाचे पुस्तक प्रकाशित (निराली प्रकाशन पुणे)

- 'ग्रामीण आणि दलित साहित्य' चर्चासत्रात ''फुले-आंबेडकर विचारांचा परिवर्तनवादी साहित्यावरील प्रभाव'' या विषयावरील शोध निबंध सादर.

अभिनंदनीय वाटचाल

प्रा. अविनाश निकम

अर्थशास्त्र विभागातील प्रा. अविनाश निकम उ.म.वि. ने घेतलेल्या SET परीक्षेत उत्तीर्ण झालेत. त्यांचे हार्दिक अभिनंदन !

श्री. एस. बी. इंधाटे

आपल्या महाविद्यालयातील संख्याशास्त्र विभागातील शिक्षकेतर कर्मचारी श्री. एस.बी.इंधाटे हे हिन्दी या विषयात एम.ए. ची परीक्षा B+ या श्रेणीत उत्तीर्ण झालेत. त्यांचे हार्दिक अभिनंदन.

सन १९९९-२००० या वर्षासाठी विविध शिष्यवृत्ती/पारितोषिक मिळविणारे मानकरी

अ. क्र.	पारितोषिक /शिष्यवृत्ती	तपशील	रुपये	शिष्यवृत्ती/पारितोषिक मिळविणाऱ्या विद्यार्थ्याचे नांव
०१.	पी.व्ही. रत्नपारखी पारितोषिक	प्रथम वर्ष कला आणि विज्ञान या दोन्ही शाखातून महाविद्यालयातून सर्व प्रथम येणारा विद्यार्थी	२८६	कु. गोएंका अवंती पवन
०२.	डॉ. के. व्ही. पराडकर पारितोषिक	१२ वी विज्ञान या परीक्षेत जीवशास्त्र य विषयांत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी	५५	कु. अग्रवाल नेहा विश्वेश
०३.	फाऊंडर मेंबर नानासाहेब दावलभक्त पारितोषिक	१२ वी विज्ञान या परीक्षेत जीवशास्त्र (बी-ग्रुप) घेऊन सर्वाधिक गुण मिळविणारा व वैद्यकिय शाखेत प्रवेश घेणारा विद्यार्थी	१२०	कु. अग्रवाल नेहा विश्वेश
०४.	डी.यु. वाणी पारितोषिक विद्यार्थी	१२ वी विज्ञान या परीक्षेत गणित या विषयात सर्वाधिक गुण मिळविणारा	५५	कु. पाटील सपना आधार ढोबळे सचिन विनायक
०५.	डी.आर नाडकर्णी पारितोषिक	१२ वी विज्ञान या परीक्षेत महाविद्यालयांतून सर्वप्रथम येणारा विद्यार्थी	५५	कु. पाटील सपना आधार.
०६.	तापीराम भगवान चौधरी आणि रमाबाई चौधरी (थोरगव्हाण) पारितोषिक	१२ वी विज्ञान या परीक्षेत महाविद्यालयातून सर्वप्रथम येणारा विद्यार्थी	५५	कु. पाटील सपना आधार.
०७.	गुरु-मातृ-पितृ स्मृती एम.डी.वाणी पारितोषिक	इ.१२ वी सायन्समध्ये महाविद्यालयांतून सर्वप्रथम येणारा विद्यार्थी	१००	कु. पाटील सपना आधार.

०८.	वि.वा.गंधे आणि सत्यभामा गंधे पारितोषिक	तृतीय वर्ष कला (मराठी स्पे.) या परीक्षेत महाविद्यालयातून सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी	३१९	जगताप चंद्रकांत वासुदेव
०९.	प्रा.म.ना.अदवंत शिष्यवृत्ती	तृतीय वर्ष कला (मराठी स्पे.) या परीक्षेत महाविद्यालयातून सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी	७७	जगताप चंद्रकांत वासुदेव
१०.	नर्मदाबाई नवलराम पाटील पारितोषिक	तृतीय वर्ष कला (मराठी स्पे.) या परीक्षेत महाविद्यालयातून सर्वाधिक (ॲग्रीमेट) गुण मिळविणारा विद्यार्थी	२२०	जगताप चंद्रकांत वासुदेव
११.	रामभाऊ प्रभुदेसाई पारितोषिक	तृतीय वर्ष कला (मराठी प्रधान) द्वितीय व तृतीय वर्षातील मराठी या विषयांत गुण मिळविणारा विद्यार्थी	११०	जगताप चंद्रकांत वासुदेव
१२.	बारजिभे शिष्यवृत्ती पारितोषिक	१२ वी कला परीक्षेत इंग्रजी या विषयात महाविद्यालयातून सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी	११०	कु. तांबोळी अर्चना रमेश
१३.	सौ.शांताबाई पाटील शिष्यवृत्ती	उच्च माध्य.(१२ वी) कला परीक्षेत सर्वप्रथम येणारा आणि याच महाविद्यालयातून प्रथम वर्ष या वर्गात प्रवेश घेणारा विद्यार्थी	१२५	लोखंडे संतोष काशिनाथ
१४.	तापीराम भगवान चौधरी आणि रमाबाई चौधरी (थोरगव्हाण) पारितोषिक	१२ वी कला परीक्षेत महाविद्यालयातून सर्व विद्यार्थिनीत सर्वप्रथम येणारी विद्यार्थिनी	५५	कु. पाठक अश्विनी सुरेश
१५.	सौ. लीला महादेव अदवंत पारितोषिक	उच्च माध्य.(१२ वी) कला या परीक्षेत महाविद्यालयातून सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी	११०	जाधव सुशिल श्रीमंत
१६.	सौ.शांताबाई पाटील (हैद्राबाद) शिष्यवृत्ती	महाविद्यालयातून ११ वी कला या वर्गात प्रवेश घेणारा व १० वी च्या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी	१२५	कु.बारी रंचना लोटू पवार राजू मधुकर

१७. सौ.शांताबाई पाटील (हैद्राबाद) पारितोषिक	१२ वी वाणिज्य या परीक्षेत महाविद्यालयांत सर्वाधिक गुण मिळविणारा व प्रथम वर्ष वाणिज्य या वर्गात याच महाविद्यालयात प्रवेश घेणारा विद्यार्थी	१२५	कु. वाणी शितल अविनाश
१८. पाटील-पोतनीस पारितोषिक	१२ वी ते पदव्युत्तर वर्गामधील उत्तम चारित्र्य, वर्तवणूक व चांगली शैक्षणिक पात्रता असणारा (अपेक्षित आवश्यक नाही) महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांना कॉलेज मेस मध्ये स्वतःच्या मदतीसाठी काम विद्यार्थी	११०	चव्हाण किरण आत्माराम
१९. विमल पिता भोजू चौधरी पारितोषिक	तृतीय वर्ष विज्ञान (प्रधान रसायनशास्त्र) या परीक्षेत महाविद्यालयातून सर्वाधिक गुण मिळविणारी विद्यार्थिनी	१२५	महाजन जयश्री विठ्ठल
२०. महादेव काशिनाथ थत्ते पारितोषिक	तृतीय वर्ष विज्ञान (केमिस्ट्री प्रिन्सिपल) या परीक्षेत महाविद्यालयातून सर्वप्रथम येणारा विद्यार्थी (विदाऊट बॅकलॉग)	११०	पाटील संजय देविदास
२१. घनःशाम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक	बी.एस्सी. वर्गात सर्वप्रथम येणारा विद्यार्थी	२५१	पाटील संजय देविदास
२२. सौ.शांताबाई पाटील (हैद्राबाद) शिष्यवृत्ती	उच्च माध्य.(१२ वी विज्ञान) या परीक्षेत महाविद्यालयांत सर्वाधिक गुण मिळविणारा व प्रथम वर्ष विज्ञान वर्गात याच महाविद्यालयांत प्रवेश घेणारा विद्यार्थी	१२५	कु दोशी तेजल नविन
२३. प्रा. अं. गं. चिपळूणकर पारितोषिक	तृतीय वर्ष कला(इंग्रजी) या परीक्षेत महाविद्यालयातून सर्वाधिक गुण मिळविणारा व याच महाविद्यालयांत एम.ए.(इंग्रजी) वर्गात प्रवेश घेणारा विद्यार्थी.	११०	चौधरी मुरलीधर अशोक
२४. सौ.शांताबाई पाटील (हैद्राबाद) शिष्यवृत्ती	या महाविद्यालयांत ११ वी विज्ञान या वर्गात प्रवेश घेणाऱ्या व शालांत परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी	१२५	कु. आगीवाल भाग्यश्री शरद व गोएंका अजित हरीशकुमार

२५. मनुभाई देसाई पारितोषिक	या महाविद्यालयांत प्रवेश घेणाऱ्यांमध्ये शालांत परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी	११०	कु. आगीवाल भाग्यश्री शरद गोएंका अजित हरीशकुमार
२६. सौ.शांताबाई पाटील (हैद्राबाद) पारितोषिक	या महाविद्यालयांत ११ वी वाणिज्य या वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये शालांत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी	१२५	मित्तल रश्मी घनःशाम
२७. सौ.शांताबाई पाटील (हैद्राबाद) पारितोषिक	तृतीय वर्ष वाणिज्य या परीक्षेत महाविद्यालयांतून सर्वप्रथम येणारा विद्यार्थी	१२५	कु. आहुजा रिटा दर्शनलाल
२८. घनःशाम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक	बी.कॉम.वर्गात सर्वप्रथम येणारी विद्यार्थीनी	२५१	कु. आहुजा रिटा दर्शनलाल
२९. कै.बाबुराव लेले पारितोषिक	तृतीय वर्ष कला या परीक्षेत इंग्रजी (आवश्यक) या विषयांत महाविद्यालयातून सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी	११०	कु. चौधरी भावना नामदेव
३०. घनःशाम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक	बी.ए. वर्गात सर्वप्रथम येणारी विद्यार्थीनी	२५१	कु. चौधरी भावना नामदेव
३१. सौ.लीला महादेव अदवंत पारितोषिक	प्रथम वर्ष कला या परीक्षेत महाविद्यालयातून सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी	११०	कु. पाटील अर्चना यशवंत
३२. शरद डी. प्रधान पारितोषिक	तृतीय वर्ष विज्ञान संख्याशास्त्र (प्रधान) या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी	११०	कु.महाले माधुरी मधुकर
३३. डॉ. शं. रा. पुणतांबेकर पारितोषिक	तृतीय वर्ष कला या परीक्षेत हिंदी (प्रधान) विषय धरुन सर्वाधिक गुण मिळविणारा (अग्री.मार्क्स) विद्यार्थी	२२०	पाटील योगेश युवराज
३४. श्री. मो. स. भावे पारितोषिक	प्रथम वर्ष वाणिज्य या वर्गातून वार्षिक परीक्षेत अर्थशास्त्र या विषयांत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी	१०१	कु.मंधवाणी पूजा गुरुमुखदास

३५. प्रा. मो. स. भावे पारितोषिक	तृतीय वर्ष कला या वर्गातून अर्थशास्त्र हा विशेष विषय घेऊन (द्वितीय व तृतीय वर्षातील अर्थशास्त्राचे एकूण पेपर) सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी	१०१	चौधरी उमाकांत यशवंत
३६. प्रा. मो. स. भावे पारितोषिक	एम.ए. अर्थशास्त्र (संपूर्णस्तर) या वर्गातून सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी	२०१	वराडे सोनाली दिनकर
३७. घनःशाम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक	एम.ए. वर्गात सर्वप्रथम येणारा विद्यार्थी	५०१	चौधरी केशव प्रभाकर
३८. घनःशाम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक	एम.ए.वर्गात सर्वप्रथम येणारी विद्यार्थिनी	५०१	कु. पारीख निशा लक्ष्मीनारायण
३९. घनःशाम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक	एम.एस्सी. वर्गात सर्वप्रथम येणारा विद्यार्थी	५०१	साळुंके संजीवकुमार मोतीराम
४०. घनःशाम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक	एम.एस्सी. वर्गात सर्वप्रथम येणारी विद्यार्थीनी	५०१	कु. भोळे वीणा विजय
४१. घनःशाम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक	एम.कॉम.वर्गात सर्वप्रथम येणारा विद्यार्थी	५०१	वाघ विजय श्रावण
४२. प्रा. पी. जी. अभ्यंकर गौरव समिती पारितोषिक	एम. कॉम.परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी	३०१	वाघ विजय श्रावण
४३. घनःशाम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक	एम.कॉम. वर्गात सर्वप्रथम येणारी विद्यार्थीनी	५०१	कु.ठक्कर दिपा रामजी
४४. घनःशाम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक	बी.ए. वर्गात सर्वप्रथम येणारा विद्यार्थी	२५१	पाटील सुनिल दोधू
४५. कै. प्रा. एस. डी. सिरसीकर पारितोषिक	महाविद्यालयांत भूगोल या विषयांत तृतीय वर्षी विशेषस्तरावर सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी	२००	पाटील सुनिल दोधू

४६. घनःशाम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक	बी.एस्सी. वर्गात सर्वप्रथम येणारी विद्यार्थीनी	२५१	कु.काळे सुवर्णा अशोक
४८. घनःशाम काशिराम पाटील (आमोदे) पारितोषिक	बी. कॉम. वर्गात सर्वप्रथम येणारा विद्यार्थी	२५१	जैन राहूल सुरेश
४९. प्रा. पी. जी. अभ्यंकर गौरव समिती पारितोषिक	बी. कॉम. परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी	२०१	जैन राहूल सुरेश ६-१-२०००
५०. सौ. स्मिता व प्रा.अरविंद ग. कर्णिक पारितोषिक	महाविद्यालयांत टी.वाय.बी.एस्सी. (प्राणिशास्त्र) या विषयांत प्रथम येणारा विद्यार्थी/विद्यार्थिनी	१००	कु.बदामी तस्नीम हुसैनी
५१. कै.शरदचंद्र दामोदर पाटील पारितोषिक	तृतीय वर्ष बी.एस्सी. वनस्पतीशास्त्र (प्रमुख) या विषयांत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी/विद्यार्थिनी	२००	कु.सेठीया आरती गुजराजजी
५२. प्रा.एल.एन.पाटील पारितोषिक	बी.एस्सी.(केमिस्ट्री प्रिन्सिपल) या विषयांत महाविद्यालयांतून सर्वप्रथम येणारा/येणारी विद्यार्थी/विद्यार्थिनी व याच महाविद्यालयांत एम.एस्सी. (ऑर्ग्यॅनिक केमिस्ट्री) या वर्गात प्रवेश घेणारा/घेणारी विद्यार्थी/विद्यार्थिनी	५००	कु.समदाणी पूजा वल्लभदासजी
५३. कै.छोटू शेनफडू मराठे व कै.ज्ञानेश्वर नरसिंग पाटील पारितोषिक	टी.वाय.बी.ए.(इतिहास) प्रमुख विषयांत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी	१०१	पाटील प्रदिप श्रावण
५४. कै. सौ. पार्वतीबाई पारितोषिक	पदव्युत्तर एम.ए. (भाग-१ व भाग-२) मिळून संस्कृत विषय घेऊन सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी	१०१	उमेदवार उपलब्ध नाही
५५. कै. सौ. पार्वताबाई पारितोषिक	पदव्युत्तर एम.ए. (भाग-१ व भाग-२) मिळून मराठी विषयांत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी	१०१	चौधरी सतिश विनायक
५६. प्रा. शालीग्राम नवलराम पारितोषिक	एम.ए.(मराठी स्पेशल) या वर्गात सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी	३००	चौधरी सतिश विनायक

५७. कै.शंकरराव कुळकर्णी पारितोषिक	पदव्युत्तर एम.ए.(भाग-१ व भाग-२) मिळून हिंदी विषयांत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी	१०१	कु.वाघोदे संगीता विकास
५८. कै.शंकरराव कुळकर्णी पारितोषिक	पदव्युत्तर एम.ए.(भाग-१ व भाग-२) मिळून इंग्रजी विषयांत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी	१०१	कु.भावे सिमा विजय
५९. सौ.जिजाबाई शालीग्राम पारितोषिक	१२ वी कला शाखेतील मराठी या विषयांत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी	२००	कु.बडगुजर शुभांगी रामदास
६०. कै. श्रीधर महादेव गोखले यांच्या स्मृती प्रित्यर्थ पारितोषिक	बी.सी.जे. परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी	२५१	गाडगीळ राजेंद्र दामोदर
६१. कै.श्रीधर महादेव गोखले यांच्या स्मृती प्रित्यर्थ पारितोषिक	एम.सी.जे. परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी	२५१	पाटील प्रकाश माधवराव
६२. प्रा.श्रीरंग राजे स्मृती पारितोषिक	एफ.वाय.बी.कॉम. परीक्षेत इन्ट्रॉडक्शन टू कॉम्प्युटर ॲन्ड क्वान्टीटेटीव्ह मेथड या विषयात सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी	२५१	शाह हितेश रजनीकांत
६३. प्रा. श्रीरंग राजे स्मृती पारितोषिक	एस.वाय.बी.कॉम परीक्षेत कॉम्प्युटर ॲप्लिकेशन ॲन्ड बिझिनेस कम्युनिकेशन या विषयांत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी	२५१	शिंपी विनायक अरुण
६४. खेर गंभीरमल पारितोषिक	सर्वोत्कृष्ट विद्यार्थी	२७५	कु.वर्षा टोके कु. नेहल जैन

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा, मार्च, १९९९ मध्ये झालेल्या परीक्षेत गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांची यादी (सायन्स शाखा)

अ.क्र. विद्यार्थ्यांचे नाव	गुणवत्ता जनरल मेरीट क्रमांक	यादीतील व्यावसायिक गट(विज्ञान) शाखा क्रमांक
१) कु. पाटील सपना आधार	०५	०२
२) ढोबळे सचिन विनय	०८	०६
३) पाटील पंकज सुधाकर	०८	०६
४) पाटील राहूल किरण	१२	०९
५) फेगडे अभिजित देविदास	१५	१२
६) चौधरी प्रिती रघुनाथ	१८	०५
७) डांगी राहूल रमणलाल	१९	-
८) अग्रवाल नेहा विश्वेश	२६	११
वाणिज्य शाखा		
१) वाणी शितल अविनाश	०२	कॉमर्स
२) कुळकर्णी अनघा पांडुरंग	०८	कॉमर्स
किमान कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रम.		
१) मणियार सोनाली सुभाषचंद्र	०४	(एमसीव्हीसी)

विषयनिहाय गुणवत्ता यादी.

१) मंडोरे आशुतोष सुरेशचंद्र	एस.पी. ८७ गुण बोर्डात प्रथम
२) फेगडे अभिजित पांडुरंग	फिजिक्स १०० पैकी १०० गुण मिळवून बोर्डात प्रथम
३) चौधरी प्रीती रघुनाथ	फिजिक्स १०० पैकी १०० गुण मिळवून बोर्डात प्रथम.
४) शेख जुनेक अहमद अख्तर	फिजिक्स १०० पैकी १०० गुण मिळवून बोर्डात प्रथम.
५) अग्रवाल नेहा विश्वेश	जीवशास्त्र १०० पैकी १०० गुण मिळवून बोर्डात प्रथम

ऑक्टो. ९९ मध्ये आलेल्या विद्यार्थ्याचे नांव

१) नेमाडे किरण मधुकर - ऑक्टो. ९९ मध्ये नाशिक बोर्डात सायन्स विभागातून सर्वप्रथम आलेला विद्यार्थी.
पत्ता - ईश्वर कॉलनी, जळगांव.

पदवी व पदव्युत्तर स्तरावरील यश

एप्रिल/मे १९९९ मध्ये झालेल्या परीक्षेत मु.जे. महाविद्यालयातील १९ विद्यार्थी विद्यापीठात पहिल्या तीन विद्यार्थ्यांमध्ये गुणानुक्रमाने उत्तीर्ण झालेत.

परीक्षा	विद्यार्थ्यांचे नाव	विषय	गुणानुक्रम
पदवीस्तर-			
बी.ए.	कु. चौधरी भावना नामदेव	राज्यशास्त्र	तृतीय
बी.एस्सी.	कु. मणियार सुनिता दामोदर	कॉम्प्युटर सायन्स	प्रथम
	कु. किसवाणी कांचन भगवान	कॉम्प्युटर सायन्स	तृतीय
	कु. काळे सुवर्णा अशोक	गणित	प्रथम
	कु. कदम अर्चना प्रसाद	मायक्रोबॉयॉलॉजी	द्वितीय
	कु. बुऱ्हाणपुरवाला हौनाब खुर्शिद	मायक्रोबॉयॉलॉजी	तृतीय
	कु. मराठे वैशाली अनिल	फिजिक्स	प्रथम
	कु. महाले माधुरी मधुकर	स्टॅटिस्टिक्स्	प्रथम
बी.कॉम.	कु. आहुजा रिटा दर्शनलाल	कॉमर्स	द्वितीय
	कु. बाफना स्मिता अशोककुमार	कॉमर्स	तृतीय
बी.सी.जे.	गाडगीळ राजेंद्र दामोदर	जर्नालिझम	प्रथम
	पाटील दिनकर शिवाजीराव	जर्नालिझम	द्वितीय
	कु. वाणी रुपाली स्नेहकुमार	जर्नालिझम	तृतीय
पदव्युत्तर-			
एम.ए.	कु. पारीख निशा लक्ष्मीनारायण	भूगोल	प्रथम
	चौधरी केशव प्रभाकर	भूगोल	द्वितीय
	पाटील उमेश विक्रम	भूगोल	तृतीय
	लोहार पितांबर प्रल्हाद	राज्यशास्त्र	तृतीय
एम.कॉम.	वाघ विजय श्रावण	कॉमर्स	द्वितीय
एम.सी.जे.	पाटील प्रकाश माधवराव	जर्नालिझम	द्वितीय



विद्यापीठ स्तरीय युवा संसद प्रशिक्षण शिबीरात-
माननीय आमदार एकनाथराव खडसे
यांचे स्वागत करतांना प्राचार्य राव



वाणिज्य शाखेतील विद्यापीठ स्तरीय
कार्यानुभव योजनेचा शुभारंभ करतांना-
कुलगुरु डॉ. एस्. एफ. पाटील



ग्रामीण व दलित साहित्य-
या विषयावरील चर्चासत्रात
मार्गदर्शन करतांना
डॉ. कवठेकर, औरंगाबाद.

KNOWLEDGE IS POWER